# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १५

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०३.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१३ची मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.०३.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२.मा.पवार संगीता शाम
२३.मा.ऊबाळे सुलभा रामभाऊ
२४.मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५.मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६.मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८.मा.भारती फरांदे
२९.मा.आर.एस.कुमार
३०.मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३.मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४.मा.नंदा विकास ताकवणे
३५.मा.नेटके सुमन राजेंद्र
३६.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३७.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३८.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३९.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४०.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४१. मा.लोंढे गणेश नारायण
४२.मा.शमीम पठाण
४३.मा./ड.संदीप गुलाब चिंचवडे
४४.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४५. मा.अपर्णा निलेश डोके
४६.मा.अनंत सुभाष को-हाळे
४७. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४८.मा.जयश्री वसंत गावडे
४९. मा.पवार मनीषा काळूराम
५०. मा.प्रसाद शेट्टी
५१. मा.अविनाश (दादा) टेकावडे

५२. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५४. मा.शेख अस्लम शैकत
५५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५७. मा.वाबळे संजय मल्हारराव
५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५९. सौ.गवळी सुनिता (ताई) पांडूरंग
६०. मा.सुपे आशा रविंद्र
६१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६२. मा.गोफणे अनुराधा देविदास
६३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६५. मा.महेशदादा किसन लांडगे
६६. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६७. मा.लोंढे शुभांगी संतोष
६८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६९. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७०. मा.सावळे सिमा रविंद्र
७१. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७२. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७३. मा.पालांडे सुजाता सुनिल
७४. मा.बहल योगेश मंगलसेन
७५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७६. मा.गिता सुशील मंचरकर
७७. मा.कैलास महादेव कदम
७८. मा.छाया जगन्नाथ साबळे
७९. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
८०. मा.आसवाणी सविता धनराज
८१. मा.वाघेरे सुनिता राजेश
८२. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम

८३. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८६. मा.काळे विमल रमेश
८७. मा.पाडाळे निता विलास
८८. मा.विनोद जयवंत नढे
८९. मा.कैलास गबाजी थोपटे
९०. मा.विमलताई सुरेश जगताप
९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९२. मा.बारणे निलेश हिरामण
९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९५. मा.बारणे माया संतोष
९६. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९८. मा.कलाटे स्वाती मयुर
९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ
१००. मा.चौंधे आरती सुरेश
१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०४. मा.जवळकर वैशाली राहुल
१०५. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०६. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०७. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०८. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१११. मा.प्रशांत शितोळे
११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास
११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११६. मा.शेंडगे आशा सुखदेव
११७. मा.मोटे किरण बाळासाहेब
११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११९. मा.संजय केशवराव काटे
१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२२. मा.पाटील सुजित वसंत
१२३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सहआयुक्त,मा.पवार,मा.मुंढे, मा.कुलकर्णी,मा.गावडे,मा.टेकाळे,मा.दुरगुडे–सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.काची-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गायकवाड-प्र. आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.डॉ.पवन सावळे-अति.वैद्य.अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.चव्हाण,मा.शरद जाधव, मा.कपिले,मा.साळवी, मा.पठाण,मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.सय्यद,मा.शिर्के,मा.निकम-कार्य. अभियंता, मा.भोसले-प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.),मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(योगा चॅम्पियनशीप मिळवणारे श्री.संदीप जनार्दन भापकर, अभिनेत्री सुवर्णा कमलाकर काळे, चैतन्य दिलीप आफळे, एक लाख रुग्णांच्या डोळ्यांची ऑपरेशन्स व मोफत औषध उपचार केलेले डॉ.मनोहर कृष्ण डोळे, पृथ्वीराज शेखर लांडगे, वाजके, श्रीनिवास, सागर बनसोडे, सचिन बनसोडे तसेच पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्रीमती निशा पाटील यांचा मा.महापौर,

मा.अति.आयुक्त, मा.पदाधिकारी, मा.गटनेते, मा.नगरसेवक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)

-----------

(१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३९अ (१) मधील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी नव्याने आणखी एक अतिरिक्त आयुक्त या अभिनामाचे पद नव्याने निर्माण करण्यास मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८९ प्रतिकूल –०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध, अपंग, व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल -८९ प्रतिकूल –०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.योगेश बहल **:-** मा.महापौर साहेब, संपूर्ण शहरात चर्चा आहे. ख-या अर्थाने मनपाच्या सर्व सदस्यांच्या मनामध्ये रुखरुख आहे. काल रात्री १२.०० पर्यंत थांबून अंदाजपत्रकाला मान्यता दिली. त्यात काही उपसूचना दिल्या. त्यात ***LBT*** च्या अनुषंगाने १२०० कोटी उत्पन्न अपेक्षित धरले आहे. या सभागृहात अनेक ज्येष्ठ सहकारी, सन्मा.नगरसेवक उपस्थित आहेत. निवडणूक होऊन एक वर्ष झाले आहे. ख-या अर्थाने वेगवेगळ्या तरतूदींच्या अनुषंगाने राज्य सरकारने महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याखाली कलम ३ नुसार महानगरपालिकेची निर्मीती केली. त्याच्या कलम ५ नुसार घटनेच्या ७४ व्या घटनादुरुस्तीला अनुसरुन महानगरपालिकांना वेगळा दर्जा देण्यात आला असताना कलम ५ नुसार सर्व महापालिकांत कायद्याखाली ***and have perpetual succession & a common seal*** असा

स्वायत्त दर्जा असताना, त्यांना सर्व अधिकार असताना नियमावली करणे, घटना बदलणे, कर कसे असावेत, किती असावेत याचे कमाल व किमान प्रमाण शासन ठरवते. हा आमचा संपूर्ण अधिकार असताना, महापालिकेचा अधिकार असताना, स्वायत्त संस्थेचा अधिकार असताना, याच्यावर एक प्रकारे अशा प्रकारचे नोटीफीकेशन काढून राज्य शासनाने या स्वायत्ततेला घाला घातला आहे, लोकशाहीला घाला घालत असताना ***LBT*** लागू करायची आहे. ***LBT*** ज्या ठिकाणी लागू झाली आहे, त्या महापालिकांची अवस्था पहा. मीरा-भाईंदर महापालिका सोडली तर २/३ महापालिकांतील परिस्थिती अतिशय दयनीय आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचा आर्थिक कणा जकात असून ७० टक्के जकातीवर चालणारी मनपा आहे. एवढी मोठी रिस्क घेत असताना कायद्याअन्वये याची दरसूची आमच्यापर्यंत यावी. ते दर आपण ठरवावेत नंतर त्याला अंतिम मान्यता देण्यात यावी. नियमावलीत कोणत्या वस्तूला किती जकात असावी याचा निर्णय महापालिकेने घेतला. नंतर राज्य शासनाने मान्यता दिली आहे. असा प्रकार ***LBT*** लावत असताना का नाही***?*** कोणत्या वस्तूला काय दर असावेत, आज इंडस्ट्रीजची परिस्थीती पाहत आहोत. सूचना सुद्धा केल्या की, उद्योजक टिकले पाहीजेत. उद्योगधंदे राहीले तर महापालिका चालेल. दर तुलनात्मक असणार आहेत. महसूलासाठी प्रचंड पैसा लागत असताना, ९४४ कोटी भांडवली खर्च करत असताना, २०२४ कोटींचे बजेट करत असताना, एवढी तरतूद करत असताना, एवढी रिस्क घ्यायची का***?*** त्याला मान्यता द्यायची का***? LBT*** करायचा असेल तर कशा पद्धतीने असणार आहे. व्यापा-यांची निदर्शने झाली. पक्ष कोणताही असो, सन्मा. सदस्यांचा जितका मानसन्मान आहे, तो त्यांना कळाला पाहीजे, त्यांना मिळाला पाहीजे. ***LBT*** चे नोटीफीकेशन काढून सरळ आमच्यावर लादणार असाल तर ते आम्ही कदापि खपवून घेणार नाही. महापालिकेच्या महासंघाने न्यायालयात धाव घेतली आहे. ***LBT*** करायचे असेलतर कायद्याअन्वये घटनेमध्ये हक्क दिलेला आहे. त्यानुसार ***LBT*** मध्ये किती दर लावावा, कोणत्या प्रकारे असावा यासाठी रितसर विषय असावा. राज्य शासनाच्या योजनेत दुरुस्ती करुन विषय आमच्यासमोर यावा. मी विनंती करतो, महापौरांनी अधिका-यांना तशा प्रकारच्या सूचना द्याव्यात. ***LBT*** म्हणजे नेमके काय आहे. त्यात काय दर लावणार, उद्योजकांना वस्तूंवर किती पैसा लादणार. सामान्यपणे महापालिका क्षेत्रात अनेक कंपन्या आहेत. त्यात टेल्कोसारख्या कंपन्या यांच्याकडून स्टील,लोखंडाची वाहतूक असेल तर त्यावर कसा कर लावणार याची सविस्तर माहिती देण्यात यावी अशी विनंती करतो.

मा.आर.एस.कुमार **:-** मा.महापौर साहेब, या सभागृहाचा अधिकार आहे. ***LBT*** म्हणजे काय**?** चार्जेस किती करणार हे ठरवण्याचा हक्क आमचा आहे. सरकारला मान देतो. त्यांच्या ऑर्डर ओबे केल्या पाहीजेत. बरोबर आहे. त्यांनी काढलेल्या ऑर्डर आमच्यासमोर ठेवून आमची मते घ्यायला पाहीजेत. आम्हाला विश्वासात घ्यायला पाहीजे. जे समाजगर्जना पेपरमध्ये आले आहे त्यात सावंत साहेबांबद्दल छापून आलेले आहे. विनंती करायची आहे, सावंत साहेब हे मनपातील सिनिअर अधिकारी आहेत. यात जे काही आरोप केले आहेत, त्यात तथ्य आहे का**?** हे आत्ता सांगू शकाल का. जे गंभीर आरोप केले आहेत, त्याच्या पाठीमागे काय झाले आहे माहित नाही. कायदा सल्लागार म्हणून त्यांना अपॉईंट करत असताना त्यासाठी लागणारी क्वालीफिकेशन त्यांच्याकडे नव्हती. ते १० वर्षे त्यांच्याकडे सनद सुद्धा नव्हती. कायदा सल्लागार म्हणून त्यांना अपॉईंट केले. त्यांचा सर्टीफीकेटची डेट सुद्धा चुकीची आहे. एवढे झाले असेल तर पेपरमध्ये डिसकस करण्यापेक्षा सभागृहाचा अधिकार आहे. त्यांच्याबद्दल एवढे आरोप करतो ते खरे आहेत का नाही. पुढील मिटींगमध्ये सभागृहाला स्टेटमेंट पाहीजे. सर्वांच्या वतीने विनंती करतो. पुढील मिटींगमध्ये त्यांच्या अपॉईंटमेंटचे क्लॅरीफीकेशन द्यावे.

मा.श्रीरंग बारणे ***:-***मा.महापौर साहेब, या शहरात १ एप्रिलपासून ***LBT*** लागू करण्यासंदर्भात ज्येष्ठ सहकारी मा.योगेश बहल यांनी आपले मत व्यक्त केले. त्याला पाठींबा देतो. परंतू या संदर्भात सन्मा.आयुक्त आणी सन्मा. मुंढे साहेबांनी गेल्या एक महिन्यापासून मनपात बैठका घेऊन सभागृहात सदस्यांना कोणत्याही प्रकारची कल्पना न देता, माहीती न सांगता व्यापाऱ्यांपुढे सादरीकरण केले. त्यांना बोलावून सांगितले, पेपरमध्ये तशा प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध केल्या. त्यानुसार ***LBT*** लागू करत असताना किती उत्पन्न होईल, ***LBT*** लागू केल्यानंतर किती रक्कम भरावी लागेल याचा आराखडा तयार केला. सभागृहात विषय चर्चेला येतो. त्या सभागृहाला मात्र आयुक्त व सन्मा. मुंढे साहेबांनी ***LBT*** प्रमुख म्हणून सर्व सदस्यांना मात्र अंधारात ठेवले. सातत्याने याबाबत बोलत राहीलो. मा.योगेश बहल यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर शंका उपस्थित होते, सत्ता असणा-या सर्वांत मोठ्या पक्षाला सुद्धा विश्वासात न घेता मनमानी कारभार प्रशासन करीत आहे. हे पुन्हा एकदा दाखवून दिलेले आहे. लोकल बॉडी टॅक्स लागू करत असताना प्रामुख्याने उत्पन्नाच्या साधनांनुसार केलेले आहे. शासनाने जरी सांगितले ***LBT*** लागू करा तरीदेखील महापालिकेला अधिकार आहे लागू करावा किंवा नाही. बी.पी.एम.सी.

अक्टमधील नियम ७४ नुसार अधिकार दिलेला आहे. या शहरातील सर्वसामान्य नागरीकांवर आजपर्यंत अन्याय झालेला आहे. छोटे-मोठे व्यापारी, व्यावसायिक यांच्यावर देखील अन्याय होतो आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकाच्या बैठकीत अनेक सदस्यांनी सुद्धा हा मुद्दा उपस्थित केला होता. १ एप्रिल पासून ***LBT*** लागू करणार अशी घोषणा आयुक्तांनी केलेली आहे. आपण प्रामुख्याने या घोषणेला छेद देऊन जोपर्यंत सभागृहात हा विषय येत नाही तोपर्यंत ***LBT*** शहरात लागू करु नये अशी सूचना करतो. दुसरा मुद्दा मा.आर.एस.कुमार यांनी उचलला आहे. याबाबत सांगतो, तुम्ही आम्हाला देखील ज्येष्ठ आहात. आपण वक्तव्य केले त्याचा छेद करत नाही. परंतू ज्या अधिकाऱ्याने ३० ते ४० वर्षे सेवा केली, नोकरी केली. त्याच्या रिटायरमेंटच्या काळात आयुक्तांनी हा नवीन पायंडा पाडला आहे. डॉ.जगदाळे यांच्याबाबतीत हेच केले. महापालिकेतील प्रमुख पदांवर काम करत असताना चूका शोधून कारवाई झाली असेल तर सेवा पूर्ण करत असताना शेवटच्या काळात पनिशमेंट करण्याच्या घटना जाणीवपूर्वक घडत असतील तर प्रामाणिकपणे जो नोकरीच्या माध्यमातून सेवा करतो, त्याला कुठेतरी त्रास होतो. वाईट वाटते. याचा गांभिर्याने विचार करावा. ही कारवाई होत असताना आयुष्याचा शेवटचा कालावधी असतो. संस्थेची सेवा केली प्रामाणिकपणे सेवा केली, त्यात काही त्रुटी राहील्या असतील तर सेवेत असताना त्या कालावधीत दाखवल्या गेल्या पाहीजेत. त्या दूर केल्या पाहीजेत. त्याला पनीशमेंट मिळाली पाहीजे. जाता-जाता अन्याय होत असेल तर ते चुकीचे आहे. अशा बातम्या आल्यानंतर कोणी पदावरील मनुष्य सक्षमपणे भूमिका घेण्याबाबत याच्यात मी मा.आर.एस.कुमार यांच्या वक्तव्याला बिल्कूल छेद करत नाही. अशा प्रकारच्या घटना पुढील काळात होऊ नयेत. त्याचा गांभिर्याने विचार व्हावा असे माझे मत आहे.

मा.प्रशांत शितोळे ***:-*** मा.महापौर साहेब, खरेतर आज महापालिकेचे प्रमुख उत्पन्न कर रुपाने मोठ्या प्रमाणात उत्पन्न अपेक्षित धरतोय. ज्यातून उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होणार आहे त्या ***LBT*** लोकल बॉडी टॅक्स या विषयाबाबत किती अनभिज्ञ आहोत हे समजले. ख-या अर्थाने प्रशासनाने त्यांच्याकडून सभागृहात कोणताही निर्णय करु शकतो अशी भूमिका त्यांच्या मनात आहे. त्याचा खरेतर वेगळा इश्यू सभागृहासमोर निर्माण केलेला आहे. संपूर्ण जगात आपल्या महापालिकेचा गवगवा उद्योगनगरी असा आहे. देशातील नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठमोठ्या इंडस्ट्रीज आपल्या परिसरात पिंपरी, चिंचवड, भोसरी, चाकण, रांजणगाव इथे आहेत.

तिथे हजारो लाखो नागरीक काम करतात. त्यांची उपजिविका या उद्योगनगरीवर अवलंबून आहे. इथे कोणत्या पद्धतीने टॅक्स लागू करावा, करआकारणी केली जावी, कोणत्या पद्धतीने राहणीमान असावे, या सर्व गोष्टींचा विचार करुन हे सभागृह शहराच्या गरजा ठरवते. मात्र नक्कीच प्रशासनाची शंभर टक्के चूक आहे. मी खरेतर सर्वांच्या अनुषंगाने प्रशासनाचा निषेध करु इच्छितो. चांगल्या प्रश्नांवर पक्ष व इतर मतभेद बाजूला सारुन विरोधी व सत्ताधारी एकत्र आल्याशिवाय राहणार नाही. उद्याच्या काळात चांगले वाईट परिणाम शहराला भोगावे लागतील. शासकीय अधिकारी म्हणून तुम्ही नगरीतून जाल. आम्हाला लोकप्रतिनिधी म्हणून आमच्या अधिकाऱ्यांना इथे परिस्थितीला तोंड देणे गरजेचे आहे. शंभर टक्के तुमच्या प्रत्येक गोष्टीला हो म्हणणे आम्हाला शक्य होणार नाही. परदेशी साहेब आज इथे नाहीत, का नाहीत हे माहित नाही. त्यांची कारकीर्द अशी चालत असेल तर सभागृह हे कदापि खपवून घेणार नाही. प्रत्येक मनपाला स्वायत्त मनपा म्हणजे काय? तुम्हाला तुमचे अधिकार राखून ठेवले आहेत. इथे शहरात चांगल्या वाईट गोष्टी करु शकतो. उत्पन्न वाढत असेल तर त्याचे स्त्रोत असतील तर जास्त कामे करु शकतो. शासनाने एखादा निर्देश लागू केला तर ती शास्ती लागू होत असताना त्याचे वाईट परिणाम एखाद्या काळात भोगावे लागतील. ***LBT*** हा आजचा विषय नाही. जकात बंद करु नका अशी आमची कित्येक वर्षांपासून मागणी आहे. ५ महापालिकांना ***LBT*** लागू झाल्यानंतर त्यांची परिस्थिती काय झाली, शासनाने किती अनुदान दिले. त्यांतील कर्मचारी संघटनांनी कोर्टातून स्टे मिळवला. पुन्हा जकात लागू झाली. पुन्हा मनपाचे काम पूर्ववत झाले. स्थानिक व्यापाऱ्यांना किती फटका बसला. स्थानिक उद्योग किती कमी झाले. ***LBT*** ने तुमच्या अधिकारांत वाढ होणार आहे. प्रत्यक्षात दरवाजा ठोठवणार आहेत. तुमची बाजू शंभर टक्के चूकीची आहे. बाकीचे काही सांगू नका. सभागृहाला माहीती देणे आवश्यक आहे. सभागृहाने मान्यता दिल्यानंतर त्याप्रमाणे कामकाजाला सुरुवात होणार आहे. त्या १३३ नगरसदस्यांना एकदा सुद्धा सांगू नये ही शरमेची बाब आहे. वाईट काम करताय ते विसरू नका. चांगले काम करत असाल तर शहराच्या दृष्टीकोणातून महत्वाचे आहे. ***LBT*** तून जेवढे अपेक्षित उत्पन्नापेक्षा ३० ते ४० टक्के कमी मिळाले तर शासन पैसे देणार का? त्यांनी पैसे दिले नाहीतर शहराचा विकास कसा होणार? अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही याचा शंभर टक्के सारासार विचार झाला पाहीजे. व्यापारी व राजकीय लोक यांची सांगड घालून त्याचा सारासार विचार करुन ते सहन करण्याइतपत असावेत. आज ३ टक्के दर लागू करतो. त्याचे दर ४ ते ५

टक्के झाले तर जकात बरी असा सूर व्यापा-यांकडून आल्याशिवाय राहणार नाही. सर्वांना विचारात घेऊन सदस्यांसमोर ***LBT*** ही करप्रणाली काय आहे याचे सविस्तर विश्लेषण होणे गरजेचे आहे. जे तुम्ही करावे. येत्या काही दिवसांत ***LBT*** लागू करण्याचा निर्णय अपेक्षित आहे तशी मा.योगेश बहल यांनी विनंती केल्याप्रमाणे या संपूर्ण कर प्रणालीची माहिती मिळाली पाहीजे. नंतर याबाबत निर्णय घेतला जाईल. प्रशासनाने ज्या पद्धतीने कारभार केले त्याचा निषेध करतो.

मा.भाऊसाहेब भोईर ***:-*** मा.महापौर साहेब, मा.योगेश बहल यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. प्रशासकीय बाजू घेत असतात. आज निश्चित प्रथम लोकाभिमुख म्हणाले. त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांच्या भूमिकेचे समर्थन करतो. या पार्श्वभूमिवर हे घडत असताना कोणताही एखादा निर्णय होत असतो त्यावर निश्चितच दोन मतप्रवाह असतात. लोकशाहीच्या जिवंतपणाचे हे लक्षण असते. जकात रद्द होणार. एका गोष्टीची आम्हाला फार भीती निर्माण झाली आहे, यापुढे काय. टेंडरचे काय, छोट्या मोठ्या ठेकेदारांचे काय होणार. आत्ता बजेटमध्ये दाखवलेल्या मूळ रकमेपेक्षा ३३०० उत्पन्न वाढ जास्त दाखवली आहे. जकात रद्द झाल्यानंतर आर्थिक संकट येणार त्याचबरोबर ***LBT*** आल्यानंतर १५० ते २०० कोटींची वाढ दाखवली. एकावेळी दोन गोष्टी बोलत नाही ना अशी वेळ आमच्यावर येऊ नये. किमान आत्मचिंतन करावे. व्यापा-यांमध्ये ४/५ मतप्रवाह आहेत. ते सर्वजण गोंधळलेल्या अवस्थेत आहेत. नगरसेवक म्हणून विचारले तर आमचे अज्ञान दिसून येते. डायरेक्ट शासनावर आरोप करण्यापेक्षा, कोणत्याही महापालिकेचा संदर्भ देण्यापेक्षा, प्रत्येक महापालिकेची भौगोलिक, सामाजिक परिस्थिती, वातावरण वेगळे असते. त्याचा फार अभ्यास करण्यापेक्षा आपल्या महापालिकेची वस्तुस्थिती समजून त्या माध्यमातून भविष्यात येणा-या कोणत्याही गोष्टींवर मात करता येईल. ***LBT*** मुळे उत्पन्न घटणार, आर्थिक टंचाई येणार आहे. भविष्यात १५० कोटींची एवढी वाढ सूचवली आहे. या पार्श्वभूमीवर शासनावर उखडपाखड करण्यापेक्षा, डायरेक्ट निर्णय घेण्यापेक्षा महापालिका माध्यमातून सर्वपक्षीय समितीच्या माध्यमातून संपूर्ण अहवाल रितसर आयुक्तांच्या माध्यमातून तात्पुरता करा. वेळप्रसंगी न्यायालयाचे दरवाजे उघडले तरी चालतील. याची तातडीने चौकशी करावी ***LBT*** संदर्भात, हा राज्य सरकारच्या माध्यमातून लागू झालेला कर आहे. आपण आयुक्तांनी केलेला नाही. निश्चितपणे सर्वपक्षीय सदस्यांना

***LBT*** माध्यमातून त्याचे फायदे/तोटे किती सर्वच माहित झाले पाहीजे, ती माहिती देण्यात यावी.

मा.कैलास कदम – मा.महापौर साहेब, ६ महिनेपासून ***LBT*** ची प्रक्रिया चालू होती. सुरुवातीपासूनच प्रखर विरोध करायला हवा होता. आता तरी ***LBT*** ची सविस्तर माहिती सभागृहात द्यावी.

मा.राजेंद्र काटे – मा.महापौर साहेब, अनेक प्रभागांत प्रत्येक प्रभागात व्यापारी हा असतोच. प्रत्येक प्रभागात अनेक व्यापारी चौकशी करीत आहेत. कशाप्रकारे ***LBT*** ठेवणार, काय दर राहणार, फॉर्म कसा भरायचा. ते तयारीला लागले आहेत. व्यापा-यांना माहित नाही. मला एवढे म्हणायचे आहे, अनेक विषय सभागृहात सदस्यांमार्फत केले जातात. ५/६ जणांना बोलवतात. माझे म्हणणे आहे, कुठेतरी हे थांबवणे सभागृहाचा पार्ट आहे. लोक आम्हाला सुद्धा विचारत असतात. या विषयावर निश्चितपणे सभागृहात चर्चा व्हावी. संपूर्णपणे प्रत्येक सदस्याला माहीती व्हावे. जेणेकरुन पाहिले तर व्यापा-याला त्याविषयी कोणताही स्त्रोत निश्चित न करता संपूर्ण सभागृहासमोर पारदर्शकता यावी.

मा.संजय काटे – मा.महापौर साहेब, मा.योगेश बहल यांनी सूचना मांडली. आम्हा सर्वांना विषय समजला पाहीजे. सर्व सदस्यांच्या मनात भितीचे वातावरण आहे. ***LBT*** माध्यमातून पुरेसा पैसा मिळेल का नाही, आमच्या वॉर्डातील कामे होतील का नाही. ***LBT*** कशासाठी आला, कोणी आणला याचा मागोवा घेतला तर. २००५ साली वॅट लागू केला त्यावेळी सांगण्यात आले होते, जकात रद्द होणार आहे त्याच माध्यमातून कलेक्शन होणार. काही पार्ट लोकल बॉडीला दिला जाईल. आपला खर्च भागेल का म्हणून जकात पुन्हा चालू राहीली. वॅटच्या माध्यमातून २.५ टक्के दराने सुद्धा कर भरत आहोत. तो विसंगत आहे. आपल्या वॉर्डातील विषय करायचे असतील तर पैसा लागणार आहे, त्यासाठी ग्राह्य उत्पन्न धरले त्याच्यापासून वॅटमध्ये आपल्या शहरातून कलेक्शन होते. अपूरी माहिती असेलतर, ५,००० उत्पन्न वॅटमाध्यमातून मिळत असेलतर साधारण १,००० कोटी रुपये उत्पन्न २२०० कोटींवर जाऊ शकते. आपल्याला विनंती आहे, हा ठराव पास करावा. राज्य सरकारकडून वॅट लागू केला तरी ज्यावेळी हे सहाय्य धरले, तो पैसा मागवून घ्यावा अशी मागणी करतो.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, आत्ताच आदरणीय नेते योगेश बहल यांनी मुद्दा मांडला, मुंढे साहेबांनी विचारले देखील नाही. कमिश्नर साहेबांनी, राज्य शासनाने हक्क हिरावून घेतले त्याबद्दलचा मुद्दा आहे. ***LBT*** डायरेक्ट नाही, प्रायोगिक तत्वावर राबविला गेला पाहीजे होता. कोणत्या पद्धतीने राबविला जाणार नगरसेवकांना माहित नाही तर सर्वसामान्यांना कुठून माहीत असणार. बरेचसे प्रश्न आहेत. कुठल्या पद्धतीने लागू करणार. फक्त मनपाला फायदा होणार. इतर ट्रेडर्स यांना फायदा होणार नाही. महापालिकेला जो फटका बसणार आहे त्याचे निराकरण कसे करणार, ते रिफंडेबल असणार आहे का अशा ब-याचशा प्रश्नांची उत्तरे दिलीतर, त्याबाबतीत निर्णय घेण्यात आम्ही सगळे तुमच्याबरोबर असू.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, खरेतर या विषयाची माहिती नाही त्या विषयावर बोलतोय म्हणजे किती महत्वाचा विषय आहे. ***LBT*** नावाचे भूत आपल्या शहरामध्ये दाखल झालेले आहे, त्याची सगळ्यांना भिती वाटते आहे. खरेतर जकातीचे दर जेव्हा वाढतात, त्यात बदल करायचे असतात त्यावेळी महापालिका या सभागृहापुढे येते. त्यानुसार हे बदल करतो. आज २० मार्चला या विषयावर चर्चा करायची आहे. २० फेब्रुवारी रोजी कलम ९९ प्रमाणे तुमची रेटलिस्ट तयार होत होती. ती महिना अगोदर तुम्ही तयार करायला पाहीजे होती. आज त्यांची रेटलिस्ट तयार आहे का? आम्हाला दाखवली आहे का? कलम ४६० नुसार हरकत घ्यायला पाहीजे. पॉलिसी डिसिजन घेतो. ४० दिवस अगोदर प्रत्यक्षपणे येऊन हरकती घेतल्या जातात. शासन निर्णय आहे. महापालिका सभेच्या माध्यमातून काही निर्णय जायला पाहीजे. विश्वस्त म्हणून काम करत असताना नगरसेवकांची सुद्धा जबाबदारी आहे. कंपनी चालवल्यासारखे सगळे वर निर्णय बसून घ्यायला लागले. आयुक्तांनी नगरसेवकांना काय व्हॅल्यू ठेवली आहे. १० कलमी कार्यक्रम महापालिका सभेमध्ये आला मंजूर होण्याआधीच त्याचे उद्घाटन झाले आहे. १० कलमी कार्यक्रम नगरसेवकांना माहित नाही. मुंढे हे सक्षम अधिकारी आहेत. त्यांच्या सक्षमपणावर अविश्वास दाखवायचा नाही. पण ते इथून जाण्याच्या मार्गावर आहेत. ते गेल्यानंतर आयुक्तांना स्वतःला ***LBT*** कळालेली नाही हा माझा आरोप आहे. शासनाने नुसते कठोरपणे कोणालाही विश्वासात न घेता याठिकाणी ***LBT*** लागू केली. यातून नुकसान झाले तरी आज कर्मचारी महासंघ कोर्टात गेला आहे. पुण्यामधूनही विरोध होतो आहे. इथे विरोध होतो आहे. चुकीच्या अटी आहेत. गेल्यावेळी सांगितले होते,दिवसाला रु.२७५/- वर उत्पन्न असेल त्याला ***LBT*** लागू होणार आहे. यात

महिला गृहउद्योग सुद्धा आले आहेत. महीलांना ५० टक्के आरक्षण असताना, आज ५० टक्के आरक्षणात महिला बसलेल्या असताना चुकीची करव्यवस्था लागलीतर आम्ही उद्या काय सांगायचे. सभागृहाला अजूनही एक गोष्ट लक्षात आणून द्यायची आहे, ***LBT*** लागू झाल्यानंतर यात बदल करण्याचा अधिकारनंतर सभागृहाला नाही, फक्त आयुक्तांना दर खाली-वर करण्याचा अधिकार आहे. ***LBT*** प्रमुख म्हणून आयुक्तांची नेमणूक होणार आहे. आपण काय करायचे. जकात हा मुख्य स्त्रोत म्हटला जातो. मा.आप्पा बारणे मघाशी म्हणाले त्याप्रमाणे २/३ कोटी खर्च करुन नगरसेवक निवडून येतो. पण उद्या नगरसेवक म्हणेल मी नाही उभा राहत, तूच उभा रहा. मिळकत करात करवाढ, पाणीपट्टीत करवाढ. लोक चपलेने मारतील असे झालेतर. याचा खूप गांभिर्याने विचार केला पाहीजे. महापालिकेची शानोशौकत एवढी आहे. कदम साहेब तुम्ही सुद्धा आम्हाला सोडून चालला आहात. तळमजल्यापासून चौथा मजल्यापर्यंत पावरफूल ए.सी. वापरतोय. मंत्रालयात सुद्धा एवढे नाही. सहावा वेतन आयोग लागू केलेला आहे. आपल्याकडे असलेले पे स्केल, पगार मंत्रालयातल्या सचिव दर्जाला सुद्धा नाहीत. त्यांना उद्या पगारवाढ करायला फिरावे लागेल, ही वाईट परिस्थिती येऊ नये. चांगले सुद्धा होईल. चांगले झालेतर आयुक्त म्हणतील मी केले. वाईट झाले तर म्हणतील त्यावेळी तुम्हाला थांबवायला काय झाले होते. आम्हाला भोसरी सोडून जाता येणार नाही, आम्ही जाणारही नाही. कर्मचारी महासंघाबरोबर आपण सुद्धा कोर्टात जावे. महापालिकेचे विश्वस्त म्हणून आपण कोर्टात जावे. मुख्यमंत्र्यांनी सांगितले, विरोधी पक्ष असा नाही. सगळे एकत्रित विचार करतोय. जाचक अटींचा मुख्य विषय आहे. डायरेक्ट घरोघरी जाऊन दरवाजे वाजवून खर्चाचा आढावा घेतला जातो. म्हणजे काय एवढी वाईट वेळ येणार आहे. त्याचा परिणाम असा होईल की, फक्त नगरसेवकांमध्ये काय नुकसान झाले असा प्रश्न विचारावा लागेल अशी वेळ आमच्यावर येऊ देऊ नका. याचा गांभिर्याने विचार करा. जोपर्यंत दरवाढ होत नाही, रेटलिस्ट समजत नाही, सवलत मिळणार आहे, नुकसान होणार आहे ते कळत नाही, तोपर्यंत विषय इथे आला नाही पाहीजे. याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. आम्ही गल्ल्यांतून जरी विरोध करतोय तरी सगळ्यांनी आमच्याबरोबर या. काल बाबरताईंनी सांगितले, त्यावर मी बोलणार नाही. तुम्हाला कोणाला या विषयावर बोललेले पटणार नाही. भविष्यात सगळ्यांना माहिती आहे, सगळ्या गोष्टी ओपन आहेत. शंका घेऊ नका. आमच्या मनात आहे हेच खरे आहे. याच्यावर गांभिर्याने विचार करा. जोपर्यंत ***LBT*** ला सगळे व्यापारी,

नगरसेवक मान्यता देत नाहीत, तयार होत नाहीत तोपर्यंत तो लागू झाला नाही पाहीजे.

मा.शमिम पठाण – मा.महापौर साहेब, आत्ताच क्रिडा धोरणाचा विषय दाखल करुन घेतला. त्याचे पुस्तक आमच्यासमोर सादर केले. गेले महिनाभर ***LBT*** चा विषयावर चर्चा करतोय. सरकारने आदेश दिला, १ एप्रिलपासून सुरु करणार आहोत. त्यात आपले जकात विभागाचे प्रमुख, सन्मा. अधिकारी अत्यंत प्रामाणिकपणे काम करतात. त्यामुळे महागाई झाली आहे याचा विचार न करता फक्त जकात वाढीचा एकच विषय विचारात घेऊन आपण त्यांचे वारंवार अभिनंदन करतो. ***LBT*** मुळे उत्पन्न कमी होईल का जास्त होईल त्याची समज प्रामाणिकपणे राहील. ***LBT***मुळे उत्पन्न वाढेल सुद्धा. एखादे साधन ठरवता, या विभागाने सदस्यांना खरेतर दरपत्रक मागणी केल्यानंतर द्यायला हवे होते. शासनाचे धोरण आहे. शासनाचे प्रतिनिधी आहेत. हे धोरण आपल्यावर लादणार म्हणून ***LBT*** चा विषय लादण्याचा प्रकार चालवला आहे. मी एक सांगते, पूर नियंत्रण रेषेचा विषय ज्यावेळी आला त्यावेळी फक्त त्याच्या खर्चाला मान्यता दिली. पूर नियंत्रण रेषेच्या रेटमध्ये विषय सभागृहात आली नाही. पूर नियंत्रण रेषा स्मशानभूमीची असते म्हणून सर्व पिंपरी चिंचवडला करा अशी मागणी लागू झाली होती. रेडलाईन म्हणजे अत्यंत धोक्याची लाईन झालेली आहे. तसेच हे भूत मानगुटीवर बसणार आहे. चांगले होईल किंवा वाईट होईल परंतू एखादा निर्णय मान्य करत असताना, धोरण ठरवत असताना संबंधित अधिका-यांनी महापालिका सभेसमोर नगरसेवकांना विश्वासात घेतले पाहीजे. आयुक्त सुद्धा अभ्यासू आहेत. त्यांच्या अभ्यासाचे दर्शन आम्हाला सुद्धा घडवले पाहीजे. आपल्याला हे योग्य, कायदेशीर आहे किंवा नुकसानीचे आहे, आपण ते लागू करु यात. घरगुती साडी दुकानदार असेल तर त्याने पिंपरीमधून साड्या खरेदी करुन आणतो. दुकानदार ***LBT*** भरणार आहे. जो दुकानदार साड्या घरगुती वापरासाठी आणणार, त्या वस्तूंच्या किरकोळ विक्रीवर त्याला सुद्धा ***LBT*** भरावी लागेल. पिंपरीवाला किरकोळ वाल्याकडून ***LBT*** ची रक्कम वसूल करुन घेणार, किरकोळवाला ग्राहकाकडून ***LBT*** घेणार. होलसेलवाला, किरकोळवाला या दोघांना ***LBT*** भरावा लागेल याचा अभ्यास मुंढे साहेबांनी केला असेल तर यावर उपाय आहे का याचे उत्तर द्यावयाचे आहे. २ वेळा ***LBT*** भरावा लागणार आहे. पानपट्टीवाला असला तरी कोणी असू द्या. कोणतीही वस्तू असू द्या, सगळा भार ग्राहकांवर पडणार आहे. आपण जनतेसाठी, ग्राहकांसाठी आहोत. त्यांचा विचार करणार आहोत. ज्या चूका होणार

त्याचे सोल्यूशन काढले आहे का. घरोघर जाऊन, दुकानदुकानात जाऊन ***LBT*** गोळा करणार आहोत का? आत्ताच समजून सांगा. याचे उत्तर द्या. पक्षनेते, अध्यक्ष मा.योगेश बहल यांनी मांडलेल्या सूचनेला पाठींबा देते.

मा.नाना लोंढे – मा.महापौर साहेब, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देतो. आपली महापालिका ख-या अर्थाने इंडस्ट्रीजमुळे श्रीमंत झालेली आहे. या ***LBT*** बद्दल अधिका-यांनी व्यापा-यांची मिटींग घेतली. तेथे विरोध झाला त्याचे नेमके कारण समजले पाहीजे. ज्या शहरांत ***LBT*** चालू केलेली आहे तिथली परिस्थीती काय आहे. ठाणे, पुणे इथे अजून ***LBT*** नाही. महाराष्ट्रातील ब-याच शहरांत लागू केलेली आहे. तिथला अनुभव काय आहे. अहमदनगर,सोलापूर इथे आंदोलने झाली ते चित्र डोळ्यासमोर आणले पाहीजे. नुकसान होते का फायदा होतो. जकात चोरी भरपूर आहे. यावर सुद्धा सातत्याने अनेक वेळा बोललो आहे. नेमका काय प्रकार आहे. जकात का नको आहे. सगळ्यांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा. सूचनेला अनुमोदन देतो. ***LBT*** सुरु करण्यापूर्वी अगोदर सगळ्यांना विश्वासात घेऊन विषय मंजूर करावा अशी विनंती करतो.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, जकातीसारखाच ***LB*** टॅक्स आहे. ज्यावेळी शहराबाहरेचा माल शहरात येतो, तेव्हा ***LBT*** हा देखील एंट्री टॅक्स असाच आहे. थोडक्यात शहराबाहेरून माल शहरात येईल त्यावेळी तो करपात्र होईल असे साम्य या दोन्हीमध्ये आहे. यात जसे जकातीमध्ये दैनंदीन माल आयात असायचा, तो थांबवून बील भरले जायचे. ती पद्दत बंद होईल. यावेळी शहरात जकात नाके असणार नाहीत. येणारा माल हा व्यावसायिकाच्या ठिकाणी थेट जाईल. जकात नाके असणार नाहीत हा बदल आहे. जकात दैनंदीन भरावी लागते, तसा ***LBT*** दैनंदीन भरला जाणार नाही. कंपनीकडे करंट अकाऊंट असते. त्या पद्धतीप्रमाणे रेकॉर्ड मेंटेन करुन व्यावसायिकांनी एक महिन्याचे पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सेल्फ असेसमेंट करुन ***LBT*** भरायची आहे. हा ढोबळ फरक आहे. जकातीमध्ये नोंदणी करणे आवश्यक नव्हते इथे नोंदणीसाठी पात्र असेल तर त्यांना इथे नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याचे निकष या कायद्यात दिलेले आहेत. जे कोणीही व्यावसायिक शहरा बाहेरुन एका वर्षात कमीत कमी 5 हजार एवढ्या रकमेचा माल आणत असतील तर त्यापेक्षा कमी नसेल जास्त असेल तर एक वर्षात त्यांची वार्षिक उलाढाल 1 लाखापेक्षा कमी

नसेल तर तो आकडा वर्षाचा आहे. आयात होणारा माल ५,००० पेक्षा कमी असू नये. वार्षिक उलाढाल एक लाखापेक्षा कमी असू नये. त्यांना या कायद्याअंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक आहे. यात दोन तीन प्रकार पडतात. दुसरा प्रकारचे अनिवासी व्यावसायिक जे शहरात राहून व्यवसाय करत नाहीत. शहराबाहेर असतात. कंपनी असेल तर कंपनी व्यावसायिक असेल तर मुंबई, दिल्ली इ. ठिकाणची कंपनी असेल तर त्यांचा माल शहरात येत असेल तर त्यांना सुद्धा इथे नोंदणी करणे आवश्यक आहे. तिसरा मुद्दा–एखादा फिक्स व्यवसाय करुन तात्पुरत्या स्वरुपात व्यवसाय करायचा असेल तर त्यांना सुद्धा नोंदणी करणे बंधनकारक आहे. नोंदणी करण्यासाठी आवश्यक बाबी आहेत. २ पासपोर्ट साईज फोटो, जिथे व्यवसाय चालू आहे त्या जागेची कागदपत्रे, सदरची जागा स्वतःची असेल तर त्याचे प्रॉपर्टी कार्ड, भाड्याने असेल तर लिव्ह अण्ड लायसन्सची प्रत व पॅन कार्ड हे आवश्यक आहेत. याची सुविधा ऑनलाईन सुद्धा केलेली आहे. उलाढाल म्हणजे आर्थिक किंवा विक्रीची १ वर्षात झालेली उलाढाल याचा समावेश याबाबतीत आहे. निकषांमध्ये जे व्यावसायिक येतील त्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. जेवढ्या काळात व्यवसाय केलेला आहे त्या काळातील तेवढ्या रकमेचा समावेश यात होतो. नियमाप्रमाणे ***LBT*** टॅक्स लागू होईल. त्याच्या १० पट दंड रकमेची तरतूद आहे. १ तारखेला ***LBT*** लागू होणार आहे. त्या तारखेला या निकषांत बसत नसेल तर कालांतराने ३ महिन्यांनी तो यात बसत असेल तर त्याची क्षमता एक लाख क्रॉस झाली असेल तर त्यावेळी ज्या तारखेला तो एक लाख क्रॉस करतो, तिथून पुढे ३० दिवसांत त्याला नोंदणी करणे बंधनकारक आहे. १ तारखेला कायदा लागू झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्याने नोंदणी करायची आहे. आत्तापर्यंत विक्रीकर असलेले टॅक्स डिपार्टमेंट पुण्यात होते, त्यांच्याकडून रजिस्टर्ड व्यावसायिक, उद्योजकांची माहीती घेतली आहे. कायद्यात तरतूद आहे. त्याचे रजिस्ट्रेशन ऑलरेडी विक्रीकर आयुक्तांकडे झालेले आहे. स्वतंत्रपणे आपल्याकडे २५,६०० इतकी संख्या आहे. तिथे नोंद आहे. त्यांची नोंद करायची आवश्यकता नाही. त्यांची नोंद झाली आहे असे ग्राह्य धरण्यात आले तरी ऑनलाईन सुविधा निर्माण केलेली आहे. आमच्या २/३ मिटींग्ज् झाल्या होत्या. उद्योजकांना याबाबत कल्पना सुद्धा दिलेली आहे. यात एकदा अर्ज केल्यानंतर आपण त्यांना सर्टीफीकेट देणे अपेक्षित आहे. त्याचा नमुना शासनाने दिलेला आहे. दिलेले सर्टिफीकेट दुकानाच्या ठिकाणी डिसप्ले करायचे आहे. ते एकदा दिल्यानंतर त्याला ते परस्पर कोणाची नोंदणी ट्रान्सफर करता येणार नाही. बदल करायचा असेल तर व्यवसायात बदल असेल तर,

नावाच्या डायरेक्टरमध्ये बदल असेल तर, भागीदार पद्धतीने व्यवसाय असेल तर, कोणत्याही स्वरुपाचा बदल असेल तर त्याची लेखी माहिती आयुक्त यांना द्यावयाची आहे. व्यवसाय जेव्हा जेव्हा बंद करायचा असेल तर त्याची सुद्धा माहिती आयुक्त यांना देणे बंधनकारक आहे. जसे व्यावसायिक वेगळ्या प्रकारच्या व्यवस्थापकाची नेमणूक करतात, त्याचे नाव सुद्धा आयुक्त यांना द्यावयाचे आहे. जो माल आतमध्ये आणला जाणार आहे. लोकल खरेदी केली जाणार आहे, त्याचा नमुना शासनाने दिलेला आहे. डिसेंबर एण्डमध्ये महापालिकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केलेले आहे. नियम व संपूर्ण नमुना. त्या नमुन्यात पूर्ण रिटर्न भरुन २ महिने पूर्वी पब्लिश केलेले आहे. यात एखाद्या व्यावसायिकाने शहरात लोकल व्यावसायिकाकडून माल घेतला, त्यात नियमांची तरतूद आहे. जो माल विकतो. हद्दीतील व्यावसायिकाला त्यांना पक्के बील देणे बंधनकारक आहे. दोन ओळींचे प्रमाणपत्र त्याचा नमुना दिलेला आहे. तो दिला पाहीजे. त्याने त्यात नमूद करायचे आहे, मी आज रोजी एवढ्या रकमेचा माल घेतलेला आहे. ***LBT*** रजिस्ट्रेशन नंबर टाकायचा आहे. तशी नोंद ठेवायची आहे. यात जो व्यावसायिक माल खरेदी करतो एखाद्या व्यावसायिकाने नकार दिला असे सर्टिफिकेट देणार नाही तर जेवढ्या रकमेचा माल देणार तेवढी ***LBT*** होणार. त्याच्या दुप्पट दर वसूल होणार आहे. कळणार कसे हा प्रश्न आहे – दोन्ही पार्टींना बंधनकारक आहे. माल घेणारा व देणारा यांनी ऑफीसला कळवले पाहीजे. नाहीतर त्यांच्यावर अक्शन होईल. याची नोंद फार ठोक होते यानंतर असेसमेंटचा भाग राहतो. असेसमेंट होते त्यावेळी अशा गोष्टी बीलातून पाहिल्या जातात. त्यासाठी इन्व्हेस्टमेंट डिपार्टमेंट किंवा इनहोस्ट डिपार्टमेंट असणार आहे.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, बील घेणार नाही, देणार नाही तिथे कसे करणार***?*** इन्सपेक्शन करायचे अधिकार आयुक्त यांना आहेत. नोंद केलेली आहे किंवा केलेली आहे परंतू पैसे भरत नाहीत. प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला पैसे भरणे आवश्यक आहे. संगणक प्रणालीत ११ तारखेलाच समजणार आहे, कोणी पैसे भरले नाहीत. ५० लाख उत्पन्न असणा-या लोकांनी १० तारखेला पैसे भरणे अपेक्षित आहे. किती लोकांनी पैसे भरले नाहीत याची यादी प्रसिद्ध होणार आहे. पैसे न भरल्यानंतर ५,००० दंडाची तरतूद आहे. प्रत्येक महिन्याला २ टक्के व्याज आकारण्याची एक वर्षापर्यंत तरतूद आहे. दुसरे कोणी हरकत घेतली नाही याबाबत तपासणी करण्याची तरतूद कायद्यात आहे. एखादा व्यावसायिक आहे, व्यवसाय करतो. शंकास्पद वाटत असेल तर ही तपासणी करण्यासाठी आयुक्तांचा लेखी आदेश

लागतो. त्याशिवाय तपासणी करत येणार नाही. अधिकारांचा गैरवापर होऊ नये याची काळजी यात घेतली आहे. कोणत्याही ठिकाणी आयुक्तांच्या लेखी आदेशानंतर तपासणी करता येईल. विशिष्ट व्यापा-याने ***LBT*** भरली आहे किंवा नाही तपासणीमध्ये याची शहानिशा होईल.

मा.सुलभा ऊबाळे - मा.महापौर साहेब, हा व्हाईट कॉलर्ड भ्रष्टाचार चालू होणार आहे.

मा.दत्ता साने – मा.महापौर साहेब, जकात चोरीत कितीतरी शास्ती लावली. जकात चोर पकडायचे प्रयत्न केले तरीसुद्धा गळती, जकात चोरी होते आहे. यात काय करणार. बील न देता माल घेतो,असे इथे सुद्धा होऊ शकते. आपआपसांत मान्यता झालीतर, अनेक अधिकारी किंवा कर्मचारी यांना जकातीमध्ये खूप वर्षे झालेली आहेत, यात तुम्ही काय करणार***?***

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, इतर शहरांत सुद्धा मोठ्या प्रमाणात व्यावसायिक आहेत. सहा महिन्याला निवेदनपत्र भरणे बंधनकारक आहे. त्याचे डिटेल्स् असणार आहेत. मागील माल किती खरेदी केला, एक्झम्पशन असलेला माल किती आहे याची नोंद असणार आहे.

मा.तानाजी खाडे – मा.महापौर साहेब, मला स्वतःला घरगुती राशन भरावे लागते, याची नोंद कुठे करावी लागले.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, आपण व्यावसायिक कॅटेगरीत येत नाहीत याची नोंद घ्या.

मा.तानाजी खाडे – मा.महापौर साहेब, विधवा महिलांच्या व्यवसायाचे काय करणार. कोटेशन मागवतो. त्यांची सुद्धा नोंद करावी लागेल. त्यांना व्यवसाय करण्यासाठी रु.६,०००/- अनुदान देतो.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात)–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, यात निविदेचा निकष येत असेल तर नोंदणी करावी लागेल. १ लाख इतकी वार्षिक उलाढाल अपेक्षित आहे. हा माल शहराबाहेरुन येतो, आतमध्ये नाही. बाहेरसुद्धा द्विधा मनस्थिती असलेली दिसून येते. हा टॅक्स एंट्री टॅक्स आहे. म्हणजे बाहेरुन येणा-या

मालावर लागणार, लोकल वस्तूंवर लागणार नाही याची नोंद ठेवणे आवश्यक आहे. माल घेणार व विकणारा त्यांच्यावर ***LBT*** लागणार आहे.

मा.नारायण बहिरवाडे – मा.महापौर साहेब, जकात समानीकरण केलेले आहे. त्याचे व ***LBT*** चे दर समान राहणार आहेत का, वेगवेगळे राहणार आहेत.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात)–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, जकातीप्रमाणे दर राहतील. जकात दर समानीकरण केलेले आहे. शासनाकडून दर येतील.

मा.नारायण बहिरवाडे- मा.महापौर साहेब, निश्चित धोरण पाहीजे. व्यापा-यांची परस्पर मिटींग घेता. त्यात काय उत्तर दिले असते. दर निश्चितीआधी महासभेला सांगा.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात)–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, अजून फायनल झालेले नाही. या कायद्यात आयुक्तांनी दर निश्चित करायचे आहेत. ते शासनाकडे पाठवायचे आहेत. त्यावर शासनाने निर्णय घेऊन ते आपल्याकडे पाठवायचे आहेत.

मा.तानाजी खाडे – मा.महापौर साहेब, आपण वॅट भरायचा आहे का.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात)–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, हा वेगळा विषय आहे. आपल्याकडे नाही राज्य शासनाचा विषय आहे.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, महापालिकेला बांधकाम परवानगीमधून २८० कोटी इतके उत्पन्न मिळाले आहे. ***LBT*** कशा प्रकारे घेणार. फ्लॅट घेणा-याने, खरेदी-विक्री करताना त्यांनी पण भरायचा का. संबंधित बांधकाम मंजूरी घेतल्यानंतर स्क्वे. फूटावर भरायचे का.

मा.मुंढे(सहा.आयुक्त,जकात)–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, बांधकाम व्यावसायिकांना ***LBT*** भरायची आवश्यकता नाही. फ्लॅट घेणा-यांसाठी स्क्वे.मीटरचा रेट ठरवला आहे. १ स्क्वे.मीटरला रु.२०/- असा दर आहे. लंमसम पैसा भरतील. हे पैसे फ्लॅट घेताना भरायचे आहेत.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, रजिस्ट्रेशन करताना १ टक्के दराने ***LBT*** भरावी लागणार आहे का.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, यात वाचले आहे, अशाबाबत कुठे नियम, तरतूद नाही. स्टॅम्प ड्युटी ४ टक्के आकारली जाते. स्टॅम्प डिपार्टमेंट काम करते. शासनाने निर्णय घेतला आहे लागू आहे. १ टक्का नोदणी, ४ टक्के स्टॅम्प ड्युटी वसूल करतो म्हणजे २५ टक्के महापालिकेला मिळणार आहेत. महापालिकेच्या स्टॅम्प डिपार्टमेंटकडून माहिती घेतली, सर्वसाधारणपणे रु.२७० कोटी एका वर्षाला उत्पन्न मिळेल.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, तुम्हाला कधी वाटले नाही, आम्हा लोकांना विश्वासात घ्यावे. आम्ही असेच निवडून आलो आहोत का. आयुक्त यांना अधिकार आहे. मग आम्ही कशाला चर्चा करतोय. कशाला वेळ घालवतोय. मी याचा सभेत निषेध करतोय. ही सभा तहकूब करा. तुम्ही विचार करा, ***LBT***सारख्या महत्वाच्या मॅटरमध्ये आत्ता सांगताय, तुम्हाला अधिकार नाही, कमिश्नर यांचा अधिकार आहे. कमिश्नर यांना अधिकार असला तरी त्यांचा निषेध करुन सभा तहकूब करा.

मा.उल्हास शेट्टी – मा.महापौर साहेब, आत्ताच ही परिस्थीती आहे. एवढे सिनिअर नगरसेवक आहेत. एकाचे सुद्धा समाधान होत नाही. तुम्ही परस्पर शहरभर मिटींग घेता. पर्सनल लेवलवर व्यावसायिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. अशा पद्धतीने क्लॅरीफीकेशन दिलेतर कसे होईल. मी स्वतः व्यापारी आहे. मला यासंदर्भात काही माहीती नाही. याची नोंदणी ***LBT***त करायची गरज नाही. सगळे व्यापारी सेल्स टॅक्स भरतात. कोणाला ***LBT*** भरायची गरज नाही. तो कसा काय लागणार ते सांगितले नाही. सेल्स टॅक्स ६० टक्के व्यापारी भरतात. रिटर्न फाईल करत असतील तर त्यांनी इम्प्लिमेंट केले पाहीजे. या गोष्टी का क्लिअर करत नाहीत. पिंपरी सारख्या मोठ्या व्यापारी क्षेत्रात बिलाशिवाय व्यवहार होतात. त्याठिकाणी कसे कंट्रोल ठेवणार. माझा स्वतःचा कॅश-कॅरी बिझनेस आहे. काही गोष्टी बिलिंगशिवाय होत असतात. पुणे, पिंपरी मंडईतून मटेरिअल घेऊन येत असतो. अशा घाऊक भाजीपाल्यासारख्या वस्तूंचा विदाऊट बिलिंग व्यवहार होतो. पिंपरी इथे सिमेंट कसे विदाऊट बिलिंग, मोबाईल विदाऊट बिलिंग करतो. याला कसा अंमल करणार. १२८ नगरसेवकांना समाधान नाही. तुम्हाला सुद्धा समाधान नसेल, कसे क्लॅरीफीकेशन देतोय. वन बाय वन प्रश्न येणार आहे. पुस्तक छपाई करा, प्रेझेंटेशन द्या, अभ्यास

करु द्या. नंतर उत्तर द्या. १०० प्रश्नांचे उत्तर देणार. प्रत्येकजण उभा राहणार नाही. आम्ही तुम्हाला चर्चेमध्ये उत्तर देणार नाही. व्यापा-यांची जशी मिटींग बोलवली. माहीती देण्याचा प्रयत्न केला त्यापेक्षा आमच्या नगरसेवकांना माहिती दिली असती तर तुमचे लोड कमी झाले असते. छोट्या-छोट्या हातगाड्या, वडापाव विकणारे यांना लिहीता वाचता येत नाही ते रिटर्न कसा फाईल करणार. ६ महिन्यांत कसे द्यायचे. या गोष्टी कशा शक्य आहेत. बिल्डींग व्यावसायिकांकडून एस्टीमेट घेतले जाते. तो बाहेर होतो का नाही. छोट्या-छोट्या गोष्टी येतात. तुम्ही डायरेक्ट मंजुरीसाठी आला आहात. माझी सूचना आहे या गोष्टी करण्यापेक्षा आम्हाला माहिती द्या. कार्यशाळा आयोजित करा. ज्या पद्दतीने ***LBT*** पद्धत बजावली, त्यातील लूपहोल्स् दूर करुन त्याप्रमाणे उत्तर दिले तर बरे होईल असे वाटते.

मा.मुंढे (सहा.आयुक्त,जकात)–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, वॅट भरणा-या व्यावसायिकांना स्वतंत्रपणे नोंदणी करायची गरज नाही. ते कायद्यात ***deemed to be registered*** असे असणार आहेत. त्याचे रेकॉर्ड आपल्याकडे असणार आहे. त्यांना त्रास होणार नाही असे त्यात आहे. पण त्यांना ***LBT*** भरावी लागणार आहे. माहीती पुस्तक तयार करुन सन्माननियांना पोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मा.मंगलाताई कदम – मा.महापौर साहेब,गंभीर विषय चालू असताना आपापसांत गप्पा मारता, विषयाचे कोणाला खरे गांभिर्य आहे का नाही. मुंढे साहेबांना प्रश्न विचारायचे आहेत. २००६ साली जकात बंद होणार असा प्रश्न चालू होता. त्यावेळी सुद्धा महासंघाचे लोक कोर्टात गेले होते. सगळे विषय झाले. वॅट येणार, जकात बंद होणार त्यामुळे व्यापारी भयभीत झाले होते. त्यावेळी हाच विचार होता. आपले कसे होणार*?* माझे मन म्हणते, ***LBT*** लागू होणार नाही. २००६ साली असेच झाले होते. हा विचार आपण का करतोय. मूळात म्हणजे महासंघ कोर्टात गेला आहे. काही ठिकाणचे महापौर सुद्धा कोर्टात गेलेले आहेत. आमचा ***LBT*** ला पहिल्यापासून विरोध आहे. पहिल्यांदा सांगू इच्छिते, याच्याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. कोणत्याही अधिका-याबददल शंका घेत नाही. कमिश्नर असताना पहिली मिटींग झाली, उद्घाटन झाले त्यावेळी मी उपस्थित होते. त्या गोष्टीला २ महिने झाले, सगळ्यांना विश्वासात का घेण्यात आले नाही असे वाटते. प्रशासन व लोकप्रतिनीधी ही रथाची दोन चाके एकसारखी चालवायची असतील तर हे लक्षात घेतले पाहीजे. अधिका-यांनी सुद्धा सभागृहात मानसन्मानाने यावे अशी आमची इच्छा आहे

अधिकारांचा वापर करुन कमिश्नर सूचना करणार असतील तर, सगळे मिळून काम करणार असतील तर, जर दर सादर करण्याचे अधिकार कमिश्नर यांना असतील तर, उद्या खरोखर अशी परिस्थिती होत असेल तर दि.३१.३.२०१३ रोजी रात्री १२.०० वा. पासून सकाळपर्यंत कार्यालय चालू होईल. जकातप्रमाणे ***LBT*** कशी करणार हे तथ्य बाहेर आलेले आहे का म्हणून नगरसेवकांना विश्वासात घेतले नाही. कमिश्नर म्हणजे कोण आहेत. समोरचे लोक पगार घेत नाहीत, मानधन घेतात. समोरच्या लोकांना विश्वासात घेतले नाही, कायम याच स्थितीत ठेवत राहीलात तर मला वाटत नाही, मनपातील वातावरण खूप काही चांगले चालेल. ***LBT*** लागू होईल. आज महासंघ हायकोर्टात गेला आहे. त्याचा आज निकाल आहे. वेळ आलीतर महापौरांना सुद्धा पिंपरी चिंचवड मनपाला वाचवण्यासाठी त्या पद्धतीने कामकाज करावे लागेल. मला माहिती आहे. मुंढे साहेब खूप हुशार आहेत. त्यांचे सॉफ्टवेअर सगळ्या महापालिकांत वापरत आहेत. हे करत असताना आपण आपल्या मनपांत तिथे आहोत त्याचा सारासार विचार केला पाहीजे. या दृष्टीकोणातून कोणाला अधिकार दिलेला नाही. महापालिका आहे, सभागृह आहे. सभागृहातून निर्णय घेतला पाहीजे. पहिल्यांदा पुस्तक छापून घ्या, महाराष्ट्र शासनाने एकवेळ मा.कमिश्नर यांना सुद्धा सूचना केल्या पाहीजेत. ***LBT*** चा अधिकार सगळ्या कमिश्नर यांना दिलेले आहेत. त्यामुळे ***LBT*** लागू व्हायची असेल तर आम्हाला सर्व सभासदांना व्यवस्थितरित्या लेखी स्वरुपात दरपत्रक असेलतर, काय ठरवले असेल तर ते आम्हाला आधी कळवले पाहीजे ही विनंती आहे. या विषयावर सगळ्यांना विचार करण्यासाठी प्रशासनाने हेकेखोरपणे कोणताही विषय हाताळू नये. नाहीतर सत्ताधा-यांना सुद्धा त्यांच्या विरोधात आवाज उठवावा लागेल. असे कुठे म्हटले नाही, सत्ताधा-यांनी आवाज उठवू नये. आम्हाला दोन दिवसांत लेखी स्वरुपात सगळ्या पद्दतीने काय करणार, काय होणार, कोर्टाचा निकाल काय लागला हे मिळावे. खरेतर प्रशासनाचा निषेध करायला पाहीजे. खरेतर सदस्य जे बोलतात ते काही चुकीचे नाही. प्रत्येकाला वाटते, मला विश्वासात घेतले नाही. तुम्हाला आमची काळजी नाही. आम्ही तुमचे का ऐकायचे. आम्ही महाराष्ट्र शासनाकडून आलेलो नाहीत, निवडून आलेलो आहोत. लोकांना आम्हाला निवडून दिले आहे,नियुक्त केलेले नाही. काय करायचे काय करायचे नाही. आम्ही शंभर टक्के बरोबर असत नाही, तसेच तुम्ही सुद्धा प्रत्येक वेळी शंभर टक्के बरोबर असालच असे नाही. काही काही गोष्टी जास्त चांगल्या असतील, तसेच जरी केलेल्या असतील तरी दोन दिवसांत सगळे डिटेल्स् कळाले पाहीजेत अशी विनंती करते. मला श्रद्धांजली वहायची आहे.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, तुम्ही सभागृहात नियमाप्रमाणे या सूचनेला किती विरोधक, बाजूने किती हे विचारले पाहीजे.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, तहकूब मांडली, त्याचे काय झाले?

मा.प्र.नगरसचिव – तुम्ही तहकूब मांडली, बराच वेळ गेलेला आहे. पुन्हा तहकूबी मांडायला लागेल.

मा.सिमा सावळे – मा.महापौर साहेब, किती वेळात तहकूब मांडावी लागते.

मा.प्र.नगरसचिव – सभेची मंजूरी घेऊन महापौर सभा तहकूब करतील.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, अनुमोदन आल्यानंतर तुम्ही पुढे बोलू शकत नाही. नियम माहित नसेल तर नियम बरोबर सांगा.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, आम्ही वॉकआऊट करु शकतो.

(सभागृहात गोंधळ)

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे मिटींग सातत्याने घेतली तर बरे होईल. सभागृहाच्या वतीने विनंती करतो, मिटींगची तहकूबी मा.आर.एस. कुमार यांनी मागे घ्यावी. चर्चा अर्धवट राहीली आहे.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, तहकूबी मागे घेणार नाही. आम्हाला नियमाप्रमाणे सभा तहकूब व्हायला पाहीजे.

मा.सुलभा ऊबाळे – मतदान घ्या. हे पत्रकारांसाठी करताय का.

(सभागृहात गोंधळ)

मा.अपर्णा डोके – मा.महापौर साहेब, खालील मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात यावी –´ÖÖ•Öß ÃÖ³ÖÖ¯ÖŸÖß ´ÖÆÖ¸ÖÂ™ ×¾Ö¬ÖÖ®ÖÃÖ³ÖÖ ¤¢ÖÖ•Öß ®Ö»ÖÖ¾Ö›,आळंदी येथß»Ö •ÖÂŠ ×®Ö¹ý¯ÖÞÖÛúÖ¸ हरिभक्त परायण गोविंद महाराज केंद्रे,ज्येष्ठ उद्योजक,किर्लोस्कर उद्योग समुहÖ“Ö ¯Ö´ÖÜÖ,ÃÖ¯ÖÖ¤Ûú †Ö×ÞÖ ¯Ö¡ÖÛúÖ¸ ´ÖÛú¤¸Ö¾Ö ×Ûú»ÖÖÃÛú¸,ज्येष्ठ उद्योजक आणि बजाज उद्योग ÃÖ´ÖÆÖ“Ö ¯Ö´ÖÜÖ ¾Ö ´ÖÖ•Öß खासदार राहुल बजाज यांच्या पत्नी ¹ý¯ÖÖ ²Ö•ÖÖ•Ö,ज्येष्ठ नाटयचित्र अभिनेते ÃÖÆÖÃÖ ³ÖÖ»ÖÛú¸,ज्येष्ठ पत्रकार नितीन ब्रह्मे यांच्या मातोश्री ÃÖ¸ÜÖÖ

²ÖÉ¡,ज्येष्ठ इतिहास संशोधक ¯Ö.¸Ö.†×Æü¸ü¸Ö¾Ö, आकुर्डी येथील वय वर्ष १०४ च्या ज्येष्ठ महिला व जुन्या आकुर्डी ग्रामपंचायतीच्या सरपंच अनुसया काळभोर,´ÖÆü¿Ö®ÖÝÖ¸ü, ÃÖÜÖ तुकारामनगर येथील युवा कार्यकर्ता-ÃÖÏÖÆüÖÃÖ ÝÖ¾ÖÖôûß.

मा.सुमन नेटके – मा.महापौर साहेब, श्रद्धांजली मांडली त्याला अनुमोदन आहे.

(सभागृहात मान्यवरांना श्रद्धांजली वाहणेत आली.)

मा.योगेश बहल – सर्व सन्माननीयांना विनंती आहे, ***LBT*** संदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, राज्य शासनाला ताबडतोब सभेच्या शेवटी पत्र पाठवावे. ***LBT*** लागू करणार नसाल तर कायद्यानुसार त्यांना निवेदन देण्याचा हक्क आहे. महासभेत ***LBT*** वर चर्चा करुन विषय मंजूर करुन कायद्यानुसार करावे अथवा करु नये असे पत्र ताबडतोब मा.मुख्यमंत्र्यांकडे द्यावे अशी विनंती करतो. असा आदेश द्यावा.

मा.मंगलाताई कदम – मा.महापौर साहेब, ही सभा २२ फेब्रुवारी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करण्यात यावी.

मा.अपर्णा डोके – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

मा.महापौर – असे पत्र देण्याचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत. व ही सभा शुक्रवार दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(´ÖÖ×Æü®ÖßÝÖÖ‡Ô ×¾Ö»ÖÖÃÖ »ÖÖ›êü)
´ÖÆüÖ¯ÖÖî¸ü
¯Ö¯Ö¸ü ¯Ö“Ö“Ö¾Ö›ü ´ÖÆüÖ®ÖÝÖ¸ü¯ÖÖ×»ÖÛúÖ
¯Ö¯Ö¸ü - 411 018

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १५

सभावृत्तांत

(दिनांक २०.०३.१३ ची तहकूब सभा)

दिनांक – २२.०३.२०१३ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१३ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२२.०३.२०१३ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२१. मा.उल्हास शेट्टी
२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२३. मा.पवार संगीता शाम
२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.आर.एस.कुमार
२९. मा.जावेद रमजान शेख
३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३२. मा.नंदा विकास ताकवणे
३३. मा.नेटके सुमन राजेंद्र
३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३८. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३९. मा.शमीम पठाण
४०. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४१. मा.अपर्णा निलेश डोके
४२. मा.अनंत सुभाष को-हाळे
४३. मा.जयश्री वसंत गावडे
४४. मा.प्रसाद शेट्टी
४५. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४७. मा.शेख अस्लम शैकत
४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव

५१. मा.मडिगेरी वर्षा विलास
५२. मा.गवळी सुलभा (माई) पांडूरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५५. मा.अजित दामोदर गव्हाणे
५६. मा.गोफणे अनुराधा देविदास
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८. मा.महेशदादा किसन लांडगे
५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६०. मा.लोंढे शुभांगी संतोष
६१. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६२. मा.सावळे सिमा रविंद्र
६३. मा.पालांडे सुजाता सुनिल
६४. मा.बहल योगेश मंगलसेन
६५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६६. मा.कदम सदगुरु महादेव
६७. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
६८. मा.आसवाणी सविता धनराज
६९. मा.वाघेरे सुनिता राजेश
७०. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७३. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७४. मा.पाडाळे निता विलास
७५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७६. मा.कैलास गबाजी थोपटे
७७. मा.विमलताई सुरेश जगताप
७८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७९. मा.बारणे निलेश हिरामण
८०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८१. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८२. मा.बारणे माया संतोष
८३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८५. मा.कलाटे स्वाती मयुर
८६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८९. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९२. मा.जगताप राजेंद्र गणपत
९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४. मा.जगताप नवनाथ दत्तु
९५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९७. मा.जम सोनाली पोपट
९८. मा.प्रशांत शितोळे
९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१००. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०५. मा.संजय केशवराव काटे
१०६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सहआयुक्त,मा.पवार,मा.मुंढे, मा.कुलकर्णी,मा.गावडे,मा.टेकाळे,मा.दुरगुडे–सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.काची-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गायकवाड-प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.डॉ.पवन सावळे-अति.वैद्य.अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक

(नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.चव्हाण,मा.शरद जाधव, मा.कपिले,मा.साळवी, मा.पठाण,मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.सय्यद,मा.शिर्के,मा.निकम-कार्य. अभियंता,मा.भोसले-प्रशा.अधिकारी(शिक्षणमंडळ),मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी(माध्य.) मा.पवार-प्र.कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.अपर्णा डोके – मा.महापौर साहेब, आपले मुख्य उद्यान अधिक्षक श्री.साळुंके यांच्या मातोश्री भागीरथी पुंडलिक साळुंके यांचे निधन झाले असल्यामुळे त्यांना श्रद्धांजली वाहून १० मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात यावी.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

मा.महापौर – श्रद्धांजलीसाठी उभे रहावे.

(सभागृहात श्रद्धांजली वाहणेत आली.)

मा.महापौर – सभा १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(´ÖÖ×ÆüÖßÖÖ‡ ×¾Ö»ÖÖÃÖ »ÖÖ›ü)
´ÖÆüÖ¯ÖÖ¸ü
Ø¯Ö¯Ö¸üß Ø“Ö“Ö¾Ö›ü ´ÖÆüÖ®ÖÝÖ¸ü¯ÖÖ×»ÖÛúÖ
Ø¯Ö¯Ö¸üß - 411 018

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १५

सभावृत्तांत

(दिनांक २०.०३.१३, २२.०३.२०१३ (दुपारी १.०० वा.) ची तहकूब सभा)

दिनांक – २२.०३.२०१३ वेळ – दुपारी १.१० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१३ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२२.०३.२०१३ रोजी दुपारी १.१० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२१. मा.उल्हास शेट्टी
२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२३. मा.पवार संगीता शाम
२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.आर.एस.कुमार
२९. मा.जावेद रमजान शेख
३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३२. मा.नंदा विकास ताकवणे
३३. मा.नेटके सुमन राजेंद्र
३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३८. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३९. मा.शमीम पठाण
४०. मा.†ड.संदीप गुलाब चिंचवडे
४१. मा.अपर्णा निलेश डोके
४२. मा.अनंत सुभाष को-हाळे
४३. मा.जयश्री वसंत गावडे
४४. मा.प्रसाद शेट्टी
४५. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४७. मा.शेख अस्लम शौकत
४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव

५१. मा.मडिगेरी वर्षा विलास
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५५. मा.अजित दामोदर गव्हाणे
५६. मा.गोफणे अनुराधा देविदास
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८. मा.महेशदादा किसन लांडगे
५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६०. मा.लोंढे शुभांगी संतोष
६१. मा.सावळे सिमा रविंद्र
६२. मा.पालांडे सुजाता सुनिल
६३. मा.बहल योगेश मंगलसेन
६४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६५. मा.कदम सदगुरु महादेव
६६. मा.छाया जगन्नाथ साबळे
६७. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
६८. मा.आसवाणी सविता धनराज
६९. मा.वाघेरे सुनिता राजेश
७०. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७३. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७४. मा.पाडाळे निता विलास
७५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७७. मा.विमलताई सुरेश जगताप
७८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७९. मा.बारणे निलेश हिरामण
८०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८१. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८२. मा.बारणे माया संतोष
८३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८५. मा.कलाटे स्वाती मयुर
८६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८९. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९२. मा.जगताप राजेंद्र गणपत
९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४. मा.जगताप नवनाथ दत्तु
९५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९७. मा.जम सोनाली पोपट
९८. मा.प्रशांत शितोळे
९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१००. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०५. मा.संजय केशवराव काटे
१०६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त, मा.पवार, मा.कारचे,मा.कुलकर्णी,मा.टेकाळे,मा.दुरगुडे,मा.शिर्के–सहा.आयुक्त,मा.चाकणकर-प्र. नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.तुपे, मा.काची-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.गायकवाड-प्र. आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना),मा.दुधेकर,मा.ढगे,मा.निकम,

मा.सवणे,मा.इंगळे,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.शरद जाधव, मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.निकम,मा.दांगट,मा.सय्यद -कार्य.अभियंता,मा.भोसले-प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.),मा.पाटील-प्राचार्य (आय.टी.आय.मोरवाडी),मा.लावंड-अति.कायदा सल्लागार, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी,मा.प्रविण अष्टिकर-जॉईंट एम.डी. (पी.एम.पी.एल.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौरः-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.सदगुरु कदम – मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहराची, महापालिकेची, उद्योगनगरीची पायाउभारणी ज्या कारखान्यात झाली त्या हिंदुस्थान अँटीबोयोटीक्स ज्याला आपण एच.ए. म्हणतो, त्यात उत्पादन झालेली ७ प्रकारची औषधे थेट पद्धतीने घेण्यास आयुक्त साहेबांनी मंजुरी दिली, त्याअनुषंगाने आयुक्त व महापौर यांनी हा कारखाना व कामगार टिकला पाहीजे म्हणून जे प्रयत्न केले त्याबद्दल सभागृहाच्या वतीने, सर्वांच्या वतीने, प्रभागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने आयुक्त साहेब व महापौर साहेब यांचे विशेष आभार मानून अभिनंदनाचा ठराव करीत आहे. यावेळी विनंती आहे की, या कारखान्याची जकात व इतर कर माफी करावी. मुलभूत नागरी सुविधा देण्याविषयी आपण धोरणात्मक निर्णय घ्यावा. असा ठराव शासन दरबारी पाठवावा जेणेकरुन आर्थिक परिस्थीती सुधारण्यासाठी मदत होईल. पुन्हा एकदा आयुक्त व महापौर यांचे हार्दीक अभिनंदन करतो.

मा.अरुण बो-हाडे– मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.प्रशांत शितोळे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज जागतिक पाणी दिवस आहे. या पाणी दिवसाची मुद्दाम आठवण करुन देतोय. परंतू महाराष्ट्रात काय परिस्थीती आहे सगळ्यांना जाणीव आहे. खरेतर अतिशय अवघड परिस्थीती आहे. एका बाजूला पाणी टंचाई शहरात होत असताना पाणी बचत कशी करावी याकडे लक्ष दिले पाहीजे. दुसरी चुकीची गोष्ट आहे, दिवसभर सर्व वर्तमानपत्रांमध्ये, ब-याचशा चॅनल्सवर थेरगाव, प्रत्येक गावात, बरेचसे मासे मृत्यूमुखी पडलेले निदर्शनास आले आहे. इंडस्ट्रीजना सुविधा देतोय. विषारी पाणी इंडस्ट्रीजमधून

नाल्यांमध्ये येत असेलतर, पाणी विषारी होत असेल तर ते नक्कीच शहराला घातक आहे. त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे. संपूर्ण महाराष्ट्रावर पाण्याबाबत भीषण संकट आहे. शहरातून नद्या वाहतात. पाणी दिसत नाही, ते व्हायला पाहीजे. आपण कडक शिस्तीचे आहात. आपले सुद्धा कर्तव्य आहे. नदी सुधार प्रकल्पातून आपण नदी स्वच्छ करतो. एम.बी.सी.बी.चे कंट्रोलिंग नाही. जो कोणी दोषी आहे तो कितीही मोठा असू द्या, त्याच्यावर अक्शन घेतली पाहीजे. नदी स्वच्छ राहीली पाहीजे. त्याच्यावर प्रिव्हेन्टीव्ह अक्शन घेतली पाहीजे. चुकीच्या पद्धतीने कामे व्हायला नाही पाहीजेत. मासे मृत्यूमुखी पडले. मानवी जीव असते तर काय अक्शन घेतली असती. दुर्घटना घडते, त्यावेळी मनपासुद्धा तेवढीच जबाबदार असू शकेल. ही दुर्घटना पुन्हा होऊ नये म्हणून पुन्हा एकदा लक्ष वाढवा. दोष दिसला, दोषींचे नाव जाहीर झाले नाहीतरी संबंधितांवर कारवाई करावी.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, पूर्वीच्या मिटींगमध्ये आयुक्त साहेबांना महत्वाच्या मिटींगसाठी मुंबईला जावे लागले, त्यावेळी ***LBT*** वर चर्चा झाली होती. मी सभागृहाच्या वतीने विनंती केली होती, मुख्यमंत्री व राज्य शासनाला आमचे म्हणणे ऐकवावे. आमच्या स्वायत्ततेवर, अधिकारांवर घाला घालू नये. ज्यांच्यावर कर लादणार आहोत, कायदा स्ट्रीक्ट पाहीजे. आपण नवीन कर लावतो किंवा कराच्या दरात बदल करतो. नियमानुसार सभागृहात चर्चा होऊन दर निश्चित केल्यानंतर प्रसिद्धी देतो. सूचना/हरकती घेतल्यानंतर पुन्हा सभागृहात विषय येतो. मनपा सभेची मान्यता घेऊन शासनाकडे पाठवतो. नियम बंद, कायदा बंद जकात नियमावली अशी केली आहे का. कलामाअन्वये अधिकार आहे. राज्य शासनाकडे कलमान्वये ही दुरुस्ती सूचविली आहे. आदेश दिलेला आहे. ***LBT*** लागू करायची असेल तर त्याला विरोध नाही. परंतू लागू करत असताना रितसर कायद्यान्वये सभागृहाचा सन्मान ठेवला गेला पाहीजे. करवाढ करुन कर व्यवस्था करताना दर दिला गेला पाहीजे. हा कर घेणार आहोत. त्याचे म्हणणे अशी घटनेत तरतूद आहे. नियमांत तरतूदी आहेत. त्यांची फाळणी, पायमल्ली होऊ नये अशा प्रकारे कर लादले जाऊ नयेत. करायचेच असेल तर रितसर सभागृहासमोर आणावे, हरकती/सूचना व्हाव्यात. ४/६ महिने उशीर लागू नये अशा प्रकारे सभागृहाने सांगितले होते. तसे पत्र राज्य शासनाला पाठवले आहे का**?**

मा.महापालिका आयुक्त – पूर्वी चर्चा झाली त्याअनुषंगाने ***LBT*** चे दर ठरवायचे, प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलवली आहे. त्याबैठकीला मुंढे साहेब तेथे गेले आहेत. आयुक्तांना सुद्धा आमंत्रित केले होते. महापालिका सभा असल्यामुळे मुंढे तेथे गेले आहेत. ते महापालिकेतील चर्चा तिथे मांडणार आहेत.

मा.गौतम चाबुकस्वार – मा.महापौर साहेब, आज आंतरराष्ट्रीय पाणी दिवस आहे. त्यानिमित्ताने जगभरात पाण्याविषयी चर्चा होते आहे. महाराष्ट्रात आपल्याला माहिती आहे, मोठा दुष्काळ पडलेला आहे. मराठवाडा, विदर्भातून लोकांचे स्थलांतर शहरांकडे होते आहे. खेडेगावांची परिस्थिती अतिशय बिकट आहे. पाण्यावाचून जनावरे मरायला लागली आहेत. अशा परिस्थीतीत मुख्यमंत्री मा.ना.पृथ्वीराज चव्हाण यांनी आवाहन केलेले आहे. ज्या काही सार्वजनिक संस्था आहेत, यांनी मुख्यमंत्री दुष्काळ निधीत मदत करावी व महाराष्ट्र शासनदेखील, सर्व मंत्रीदेखील या दुष्काळाचा सामना करण्यासाठी पूर्ण महाराष्ट्रभर फिरत आहेत. आपण शहरात राहत असल्यामुळे तेवढे गांभिर्य नाही. परंतू सभागृहाला व महापौरांना विनंती करायची आहे, मुख्यमंत्री दुष्काळ निधीत महापालिकेच्या वतीने ५ कोटी रुपये देण्यात यावेत. त्याचप्रमाणे सर्व सदस्यांना विनंती करेल की, मुख्यमंत्री निधीत त्यांनी एक महिन्याचे मानधन देखील देण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

मा.श्रीरंग बारणे–मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो. खरेतर दुष्काळग्रस्तांना आम्ही एक महिन्याचे मानधन दिलेले आहे.

मा.दत्ता साने – मा.महापौर साहेब, गुरुवार दि.१४/३/२०१३ ला बातमी आली होती, त्यासंदर्भात नागरीक आपल्याकडे आजही लक्ष घालून आहेत. आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणून देतो, २००७ मध्ये फुगेवाडी येथे बी.आर.टी. रोड चालू होता. त्यात २००७ मध्ये नागरीकांना नोटीसा आल्या होत्या. त्या माध्यमातून त्या लोकांनी स्वतःहून घरे काढली होती. करसंकलनचा अजब कारभार डोळ्यासमोर आणून द्यावयाचा आहे. मिटिंग आधी बोलायचे माझे काम आहे म्हणून बोलतोय. यादव, मोरे यांच्या या प्रॉपर्टी आहेत. या प्रॉपर्टी उतरवून घेत असताना २०१०-११ ला जी.आर. झाला होता, जे काही मूळ बांधकाम आहे, कर संकलनमध्ये प्रॉपर्टीची नोंद आहे. ज्या-ज्या थकबाकी आहेत, त्याची मूळ रक्कम माफ केलेली आहे. त्या प्रामुख्याने प्रॉपर्टी वाचल्या असताना कंम्प्लेण्ट देतो. जी नोटीस करसंकलनमधून आलेली आहे त्यात पाडलेल्या बिल्डींगचा मिळकत कर भरावा अशी नोटीस आलेली

आहे. ज्यांच्या बिल्डींग चोरील्या गेलेल्या आहेत, त्या त्यांना मिळवून द्या, अशी कंम्पलेम्ट सभागृहात देतो आहे. टॅक्समध्ये दिलेले आहे. इमारती चोरीला गेलेल्या आहेत. त्या आम्हाला मिळवून द्याव्यात अशी मागणी आहे. एफ.आय.आर. दाखल करतो. २००७ मध्ये इमारती स्वतःहून पाडल्या. कोणताही मोबदला न देता मा.दिलीप बंड यांनी मिटींग घेतली होती. सर्व नागरिकांना संबंधित नगरसेवकांनी तिथे बोलवून नागरीकांच्या हातापाया पडून रस्ते ताब्यात दिले असताना त्यांच्याकडून टॅक्सची मागणी करताय. असा कारभार चालू आहे. हे सर्वजण गरीब आहेत. महापौरांना भेटून आले. त्याची प्रेसनोट माझ्या हातात आहे. त्या लोकांना उद्या कारवाई करायची असलेली बांधकामे आहे त्या स्थितीत द्या. लोक पोलिस स्टेशनमध्ये ***F.I.R.*** देताऐत, आमच्या इमारती चोरीला गेलेल्या आहेत. गंभीर गोष्ट आहे. लोक निश्चित काय करणार, घरे पडलेली असताना टॅक्स का भरायचा. कशासाठी भरायचा. संबंधित अधिका-यांना याची विचारणा करावी. सभागृहात प्रश्न विचारलेला आहे. मिळकत करावर व बांधकामाच्या सगळ्या आकारणीवर बांधकाम बिगरपरवाना शिक्का मारला आहे. का***?*** याचे उत्तर मा.शहाजी पवार यांनी द्यावे, खरोखर गंभीर गोष्ट आहे.

मा.शहाजी पवार (सहा.आयुक्त, करसंकलन) – मा.महापौर साहेब, प्रॉपर्टी टॅक्स डिपार्टमेंटमार्फत मिळकत कर आकारणी करताना ज्या मिळकती किंवा इमारती आहेत, ज्या मिळकतींना बांधकाम परवानगी आहे, अशा मिळकती सोडून इतर मिळकतींवर बिगर परवाना अशा शिक्का मारला जातो. ही पद्धत महापालिका अस्तित्वात आल्यापासून, कार्यालयाच्या सोयीसाठी हा शिक्का मारला जातो. कामकाजाच्या सोयीसाठी कायद्यात अशी प्रोव्हिजन नाही.

मा.दत्ता साने – मा.महापौर साहेब, १,९७,००० एवढ्या मिळकती अनधिकृत ठरल्या आहेत. अनधिकृत का अधिकृत हे ठरवायचे यांना राईटस् नाहीत, अधिकार नाही. अनधिकृतचा शिक्का मारला म्हणून वंजारी नावाचा माणूस कोर्टात गेलेला आहे. या माध्यमातून यातून रिट पिटिशन दाखल केले, त्यातून अनधिकृत शिक्का मारला. हे करसंकलनच्या कायद्यात नसताना अनधिकृत शिक्का मारताय. बांधकाम परवानगी कशाला ठेवली आहे. यांना करसंकलनकडेच पाठवावे. त्यातून आमची गावे महापालिकेच्या हद्दीत घेताना आम्हाला सांगितले होते, पूर्वीच्या बांधकामांना रेग्युलराईज करु. आहे त्या स्थितीत महापालिकेत घेऊ. मग कोणालाही

अनधिकृतचा शिक्का लागला नाही पाहीजे. मग का लागला. या प्रॉपर्टी रोड आरक्षणात येत नाहीत, त्यांचे पेपर महापालिकेत दिलेले नाहीत. तरी १,९७,००० इतका अनधिकृत प्रॉपर्टीज् चा आकडा देत आहोत. हे सुद्धा आपल्या निदर्शनास आणून देण्याची गरज आहे. करसंकलनने शिक्का मारला म्हणून १,९७,००० इतका आकडा दिसत आहे. यांना कायदा नाही, अधिकार नाही, कोणत्या कलमानुसार शिक्का मारला. आपल्याला विनंती आहे, अनधिकृतचा पहिल्यांदा शिक्का लागला. यांना कोणताही कायदा नाही, कलम नाही. अनधिकृत शिक्का मारला म्हणून एवढी मोठी संख्या डोळयासमोर येते आहे. मी अभ्यास करुन आलो आहे. मी आपल्याला विचारले आहे, हा शिक्का मारणे कायद्याच्या चौकटीत नाही, चूकीचे करतो आहोत. हा प्रसंग आमच्यावर आणला आहे. शहरच अनधिकृत झालेले आहे. हे सभागृहाच्या निदर्शनास आणून देतोय. दुसरीकडे आज शहरात याच भागात चांगला मोठा प्रोग्राम केला, त्याबद्दल अभिनंदन करतो. गणपती मंदीर सार्वजनिक जागेत किंवा अनधिकृत बांधकामाच्या जागेत नव्हते. मूळ मालकाच्या खाजगी जागेत होते. ३२४ सर्वे नंबर मध्ये रोड आरक्षण येते. ते आरक्षणात नव्हते. हे मंदीर पाडताना फार निंदनीय वाटते. का पाडले माहित नाही. पण कुदळवाडीमध्ये सध्या ज्या मशीदी आहेत, त्यात पूर्वीच्या लिगल मशीदी आहेत. जवळपास ८ ईलिगल मशिदी आहेत. मला मुसलमानांवर टिका करायची नाही पण तिथे हा प्रकार चालला आहे. अनधिकृत इमारती पाडतात, मंदीरे पाडतात, पण मशीदी पत्राशेड बांधून अनधिकृत बांधकाम करतात. त्या पद्धतीने माझ्या भागात मशीदींचे काम चालू आहे. पुण्यात बॉम्बस्फोट झाला त्यावेळी सिमीचे कार्यकर्ते कुदळवाडीमध्ये सापडले. भटकलचे वास्तव्य कुदळवाडीमध्ये होते. इथे अतिरेक्यांच्या संघटना कार्यरत आहेत. आम्हाला वाटते तुम्ही लोकांचा तळतळाट घेतला आहे. आता देवाधिकांचा सुद्धा तळतळाट घ्यायचा आहे का. मंदीर कोणत्याही राजकीय पक्षाचे नसेल तरी ते पाडणे ही सर्वांची खंत आहे. कुठेतरी घरात कटकट झाली असेल तर मंदीरात बसून शांतता मिळते. वयस्कर, ज्येष्ठ नागरीक मंदीरात गेल्यावर त्यांना ५ मिनिटे गेलेतरी समाधान वाटते. याच भागात ८ मशीदी बांधायची जोरात तयारी चालू आहे, त्यांचे काय करणार. आपले लोक करण्यासाठी प्रोत्साहन देतात, ते टक्केवारी घेतात का. शंभर टक्के घेत असतील. माझा हाच आक्षेप आहे, आपले अधिकारी शंभर टक्के पैसे घेऊन काम करत आहेत. हा अतिसंवेदनशील भाग आहे. तिथे अनेक प्रकारचा कारभार चालू आहे. एखाद्या वस्तूची शहरात चोरी झालीतर २ तासांत त्याचे स्पेअर पार्टस् मार्केटमध्ये मिळतात. अंदाधुंद कारभार चालू आहे. ते पहिले कुदळवाडी इथे

जातात. अतिरेकी संघटनेचे कुठे काम झालेतर इथे पहिली अक्शन होते. संवेदनशील भाग असताना अधिकृत कोण, अनधिकृत कोण. त्यामुळे मुस्लिम बांधवांना विरोध होतो. दुय्यम वागणूक दिली जाते,हे सांगावयाचे आहे. हे प्रामुख्याने चूकीचे आहे, असे मला वाटतेय. गणपतीची मुर्ती बसवली होती, त्यावर बुलडोजर लावला आहे. चांगले काम करत असताना गणपतीचे पूजन करतो. राज्यात, शहरात विरुद्ध घटना चालू आहेत. शहरात चोरी, जर्मन बेकरीत बॉम्बस्फोट झाला. भटकल बंधूंवर बंदी आणली. तो या भागात राहीलेला आहे हे सांगतो. भागिरथी विषयात लक्ष घालावे याची सूचना मांडली. मिळकती पाडल्या असताना, त्या मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी करा. त्या लोकांना शंभर टक्के माफ करा. आपल्या लोकांनी खूप मोठी जागा काढून दिलेली आहे. कुदळवाडीतील कोणीतरी बाहेरचा माणूस कोर्टात गेला आहे. राय नावाचा माणूस त्याच्या जागेवरील २०० मी. डी.पी. मार्कीगच्या जागेसाठी तो कोर्टात गेला आहे. त्यासाठी रस्ता करायचा थांबला आहे. आमचे नागरीक सुद्धा अधिकृतपणे टॅक्स भरतात. ते सुद्धा रस्ता करायचा थांबवतील. १९९८ च्या अगोदरची मूळ बांधकामे आहेत. जाणूनबुजून सगळ्यांना रस्त्यात बांधकाम करायला लावले. या दोन्ही विषयांत आपण निवेदन द्यावे.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, आज सभागृहात मा.दत्ता साने यांनी त्यांची भावना व्यक्त केली. या अनुषंगाने उत्तर दिले गेले पाहीजे. इमारतींना अधिकृत परमिशन दिल्यानंतर पार्कीगच्या जागेतील व्यवस्था केली जाते. रस्त्यावर वाहने पार्क केली जातात. त्यावर आजपर्यंत कारवाई केली गेलेली नाही. सर्वसामान्य गरीब मनुष्याने शहरात राहण्यासाठी घर बांधले. त्याच्यावर मात्र कारवाई झाली. चुकीच्या मार्गाने वसूली करतो ही बाब आपल्या लक्षात आलेली नाही. तरीसुद्धा अशा व्यावसायिकांना, धनीकांना मदत करायचे काम प्रामुख्याने प्रशासनाकडून होते आहे एवढेच सांगणे आहे. ज्या इमारतीत महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून अधिकृतपणे परमिशन घेतली आहे. ती घेताना जर वाहनतळ, पार्कीगची जागा ठेवली असेल तर त्याठिकाणी शॉपस्, हॉटेल्स् बांधले असतील, अनधिकृत व्यवसाय करत असतील तर पार्कीगसाठी ही जागा खाली करावी. ज्या इमारतींत अशा प्रकारचे बांधकाम झाले असेल तर त्याचे सर्वेक्षण करुन कारवाई करावी. सर्वसामान्य गरीब मनुष्यावर तात्काळ कारवाई करतो. लेखी पत्र दिलेतरी तात्काळ शहानिशा न करता तात्काळ कारवाई झाली आहे. अंदाजपत्रकाच्या बैठकीत राजकीय हस्तक्षेप निश्चित झाला आहे. २० ते २५ टक्के सर्वसामान्य गरीब नागरीक भरडला

गेला आहे. याबाबत व्यावसायिकांना, धनीकांना देखील पाठीशी घालू नका एवढेच सांगतो.

मा.राहूल जाधव – मा.महापौर साहेब, आज सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो, आज आपण जाधववाडीत नागरीकांनी मंदीर बांधले होते, त्यावर कारवाई केली. आज ब-याच ठिकाणी आमची समाविष्ट गावे आहेत. गेले १० वर्षांपूर्वी यांच्या नकाशाप्रमाणे रोडमध्ये घर, बिल्डींगी झाल्यातरी त्यांना टॅक्स भरायला सांगताय. दुसरीकडे घरे पाडताय, मंदीर पाडताय. काही सदस्यांच्या सांगण्यावरुन सुद्धा कारवाई आणली आहे. ०५ मध्ये ही कारवाई कोणाच्या सांगण्यावरुन थांबवली होती. आहेर यांची तीन मजली इमारत पाडली आहे. एकाला एक न्याय, दुस-यांना दुसरा न्याय देताय. त्यांचे होणारे नुकसान तरी वाचेल, खिडक्या-दरवाजे तरी ते काढतील. कायद्याने काय करताय ते योग्य करताय. त्याला विरोध नाही. काम करत असताना आपले अधिकारी लोक, प्रशासन काम करतात. आपल्याला वाटते, सगळे पारदर्शक काम चालते, काम करतात. त्यावेळी एकाला माणुसकीची कोणाला सवतीची वागणूक देताय असे निदर्शनास आणून दिलेले आहे. माझ्या जाधववाडीत प्रभागात तीन मजली इमारत पाडली. आज एकाला नोटीस दिलेली आहे. ५ रुम्स् बांधलेल्या आहेत, तिथे वर्कर राहतात. त्यांचे पाडताय पुन्हा एकदा नोटीस आली. कायदा पाळला पाहीजे. परंतू एकाचे पाडताय, दुस-याला कशासाठी सोडताय. आज तिथे खूप पाठिंबे आहेत. कनिष्ठ अभियंता यांना सांगितले, निदर्शनास आणून दिले. ज्याने सांगितले, त्याच्यावरच बुलडोजर फिरतोय. बाकीच्यांनी बोंब केली की कनिष्ठ अभियंता यांनी केले. आमच्याकडे पुरावा आहे. ५ रुम्स् आहेत, इथे लोक राहतात. माझ्याकडे यांचे फोटो सुद्धा आहेत. खाली ५ खोल्या २००८ पासून टॅक्स भरला आहे. त्याचे पेपर माझ्याकडे आहेत. पहिल्या ५ खोल्यांचा टॅक्स भरतात. नंतरच्या ५ खोल्या वर बांधल्या आहेत. अशी खूप माणसे आहेत, त्या माणसांकडे पैशाची मागणी झाली आहे. त्यांनी विरोध केला म्हणून फक्त त्यांची बांधकामे पाडली आहेत. ही गोष्ट त्यावेळी निदर्शनास आणून दिलेली होती. कार्यकर्ता लोकांना वेठीस धरु नये. हे काही प्रभागांत चालले आहे. कारवाई चालू असताना सदस्याच्या सांगण्यावरुन यु.पी., बिहारवासियांची बांधकामे पाडायची थांबवली. आहेरांचे बांधकाम मात्र पाडले. त्यांना वाटते मी सांगितले. कृपा करुन अशी कामे आपण करु नयेत अशी मी विनंती करतो.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता मा.दत्ता साने यांनी ज्या विषयाकडे सभागृहाला वळण्यास मजबूर केलेले आहे महत्वाचा विषय आहे. मा.राहूल जाधव हे मनसेचे नगरसेवक आहेत. विरोधी पक्षातील नगरसेवक आहेत. त्यांच्या वॉर्डातील खाजगी जागेतील मंदीरावर कारवाई केलेली आहे. कोणाच्यातरी द्वेषापोटी हे झालेले आहे. तयार केलेले मंदीर कोण पाडतोय. आपल्याला माहिती आहे का? खाजगी जागेतील मंदीर आहे. ब-याच ठिकाणी मंदीराची कामे सुरु आहेत. तक्रार होती असे सांगितले. त्याच्या पाठीमागे फॉलोअप खुप होता. अशा लोकांची नावे सभागृहात जाहीर केली पाहीजेत. तक्रार होती, कायद्यात बसत नाही ठिक आहे. एका ठिकाणी गरीब नगरसेवक असा शब्द वापरला. राहूल जाधव हे अजिबात गरीब नाहीत. स्थानिक आहेत. परंतू बाकीच्यांप्रमाणे भाव खात नाहीत म्हणून स्वतःला कमी लेखत आहेत. अतिशय निंदनीय गोष्ट आहे. तळवडे, भोसरी, दीघी, एम.आय.डी.सी.चा काही भाग असला तरी २०१२ नंतरची बरीच बांधकामे अशी आहेत, त्यांचा पंचनामा झालेला आहे. प्रायोरीटी नाही ती पाडली गेलेली नाहीत. समर्थकांची बांधकामे आहेत. तिथे तुमचे लक्ष कधी जाणार? तळवडेमध्ये नाहीतर भोसरी इथेतर खुलेआम पैसे मागितले जातात. गुंडगिरी आहे. याच पद्धतीने पाठपुरावा केला जातो. पैसे दिले नाहीतर बांधकाम पाडलेच. तुमच्या चांगुलपणाचा गैरफायदा कोणी घेत असेल तर तुमचे लक्ष कधी जायचे? तुम्ही तुमचे काम करत रहायचे, खालच्याचे वाट्टोळे व्हायचे. कोणी तक्रार केली तर जाहीरपणे सांगितले पाहीजे. नगरसेवकाने काम सांगितले की त्याचे नाव पहिल्यांदा कळते. विरोधी पक्षाचा नगरसेवक असेल तर लगेच नाव कळते. तो प्लॅन चाललेला आहे. तुमच्या प्रतिमेचा फायदा घेऊन डबल फिडींग चालू आहे. याची कल्पना तुम्हाला आहे का? याकडे कोण लक्ष देणार? कशामुळे आरोप होतो आहे तो बघा. बी.व्ही.जी.च्या बिल्डींगचे अनधिकृत बांधकाम आहे. कमर्शियल बिल्डींग आहे. आज त्या जागेचा मार्केट रेट कोट्यावधी रुपये आहे. तुम्हाला ही बिल्डींग पाडता येत नाही. त्याचे कुत्रे साधे दाद देत नाही. कारण मोठ्या लोकांचा त्यांच्याकडे बराच वरदहस्त आहे. तुमचा चॅलेजिंग जॉब आहे. तुम्ही हे चॅलेंज घ्या, तुम्हाला आव्हान आहे. गरीबांची, बुद्धीजीवी लोकांची घरे पाडणे फार मोठा पराक्रम नाही. पोलिस फोर्स वापरून, कायद्याचा बडगा दाखवून करु शकतो. अशा ठिकाणी तुम्ही का जात नाही? सगळे रिपोर्ट मागवून घ्या. स्पेसिफीकेशन मागवून घ्या. कोणी पैशांच्या जोरावर करत असेल तर, भितीपोटी करत असेल तर, अनेक केला असेल तर तुमच्याकडे सर्व पाहीजे. प्रत्येक ठिकाणी तुम्ही जाऊ शकत नाही. अतिशय निंदनीय गोष्ट आहे.

गणपतीची मूर्ती होती. ही कृती मुळात होत असताना केलेले कृत्य अतिशय निंदनीय आहे. आम्हाला नावे जाहीर करा. बांधकामे पाडण्याबाबतीत आता तुम्ही थांबला आहात. तुमचे स्वागत करते. आता नदीपात्रातील, आरक्षणातील जागेवरील बांधकामे पाडणार आहात, त्याबद्दल दुमत नाही. दि.३१ मार्च २०१२ नंतरची बांधकामे पाडताना एकाला एक न्याय, दुस-याला दुसरा असा मिळाला नाही पाहीजे. त्यांच्याकडे कानाडोळा करु शकतो, यांचे पत्ते केले आहेत. त्यातून काही लोक राहीले आहेत. तुम्ही कर्मचा-यांचे बदली करताना जे शफलिंग केलेले आहे, त्यात नेमके जे प्रामाणिकपणे काम करतात त्यांच्या बदल्या केल्या. मात्र काम न करणारे यातून सूटत आहेत. त्यांच्यामागे कुठे-कुठे अधिकारी किंवा नगरसेवक पण असतील. ही गंभीर गोष्ट आहे. राष्ट्रवादी पक्षाचे मा.योगेश बहल यांनी ***LBT*** संदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर आयुक्त साहेबांनी सांगितले, मुंढेसाहेब आज इथे नाहीत. मी माहीती देऊ शकत नाही. माझ्या माहितीप्रमाणे कालच मुंढे साहेबांनी सांगितले होते, आयुक्त हे ***LBT*** चे प्रमुख आहेत. त्यांना सर्व अधिकार आहेत. आमचे कसे होणार***?*** तुम्हाला माहितच नाही. महापालिकेला कायदा सल्लागार आहेत, त्यांच्याकडून खुलासा द्या. काही मंडळी कोर्टात गेलेली आहेत. जर उद्या कोर्टाकडून स्टे मिळालातर काय करणार***?*** माहिती द्या काय होणार आहे हे पण कळाले पाहीजे. सगळ्या गोष्टींचा झिरो अवर्स आपल्याकडे नसताना चर्चा घडवतोय. चर्चा व्यर्थ जाता कामा नये. परवा तुम्ही नव्हता म्हणून मिटींग तहकूब केली. आम्हाला तुमच्याशीच बोलायला आवडते. दुस-या कोणाशी बोलायला आवडत नाही.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही ठरवले व दुकानदाराचा नंबर बोलण्याआधी आम्हाला क्रेडीट करायला पाहीजे आहे. लोक आम्हाला विचारतात, आम्हाला माहीत नाही. मुंढे साहेबांनी सांगितले, सरकारने तुम्हाला अधिकार दिलेले आहेत. तुमच्या पॉवर्सला मी चॅलेंज करत नाही. आम्हाला विश्वासात घ्या, एक्सप्लेन करा. आमच्याबरोबर चर्चा करा एवढीच विनंती आहे. शेवटी ***your decision is awarded.*** मा.दत्ता साने मंदीर, मशिदींबद्दल बोलले. सरकार त्यासाठी बांधायला जागा देत नाही. जिथे पॉसिबल आहे तिथे बांधतात. मंदीरे, मशिदी बांधतात. आपल्या देशात सर्वधर्मसमभाव आहे. पण आपण मंदीरे पाडली नाही पाहीजेत. लोकांची धार्मिक स्थळे बांधायला मनपा जागा देत नाही. मग ते कुठे जाणार***?*** प्रार्थना करुन प्रार्थनामय होणे यासाठी मंदीरे बांधतात. रस्त्यात येत असलेले पुण्यातील पासोड्या विठोबाचे मंदीर १०० वर्षे जुने झाले आहे. अजूनपर्यंत

ते तिथून काढले नाही. लोकांच्या त्यामागे भावना आहेत. तुम्ही तिथे जाऊन बघून या. मंदीराला टच न करता दोन्ही बाजूंनी ट्रॅफीक चालू आहे. मशिदी पाडायला जाऊ नका आपल्या देशात सर्वधर्मसमभाव आहे. कमर्शियल शॉपस् यांना नोटीसा द्या. २/४ महिन्यांत रेग्युलराईज होतात. पार्कींग कशासाठी ठेवले आहे. पार्कींगमध्ये दुकाने,हॉस्पीटल्स् आहेत, इतर व्यवसाय चालतात. गाड्या रस्त्यावर येतात. पार्कींगची जागा पार्कींगसाठी वापरली पाहीजे. प्रत्येक घरात गाड्या घेणार, टू व्हिलर,फोर व्हिलर घेणार असे वाटले नव्हते. प्रत्येक पार्कींगमध्ये कमर्शियल शॉपमेण्ट करायचे. बांधकामे पाडायला सुरुवात केलेली आहे. पार्कींग व बेसमेण्ट स्टोअर, बेसमेण्ट गोडाऊन्ससाठी केलेली आहेत. अनेक बिल्डींगमध्ये पार्कींग विकले आहे. कमर्शियल शॉप्स्, दुकाने, हॉस्पीटल्स् चालू आहेत. सर्वांना त्वरित बंद करायला सांगा. पार्कींग पार्कींगसाठीच वापरले पाहीजे.

मा.भाऊसाहेब भोईर – मा.महापौर साहेब, परवाच मुख्य सभा झाली. तहकूब सभा आज होते आहे. मा.योगेश बहल यांनी ***LBT*** संदर्भात सभा तहकूबी संदर्भात मत मांडले. मा.आर.एस.कुमार व मा.नारायण बहिरवाडे यांनी सूचना मांडल्यानंतर सभा तहकूब झाली. त्यासंदर्भात आयुक्त साहेबांनी खुलासा केल्यानंतर संदिग्ध वातावरण आहे. कायद्याची अंमलबजावणी होत असताना सगळ्याजणांनी गदारोळ होऊन त्या विषयावर सभा तहकूब झाल्यानंतर त्यावर नेमका निर्णय काय झाला हे देखील महत्वाचे आहे. केवळ विषय वाढावा म्हणून वाढतो म्हणून हा विषय तेवढा परत येऊ नये. ***LBT*** संदर्भात शहरात प्रबोधन करावे. पुणे मनपाप्रमाणे नगरसेवकांना या मागचा हेतू सगळ्यांना उन्मुख होण्यासाठी आयुक्तांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी. याचा विरोध कितपत ग्राह्य आहे. त्यावर शासनात गंभीरपणे विचार करुन अंमलबजावणी करण्यात येईल. याबाबत ठोस निर्णय जाहीर करावा. महापौरांना विनंती करतो, ब-याच सन्मा.नगरसेवकांनी आपल्या भावना भाषणातून व्यक्त केल्या. काय भोगावे लागते. सर्व पक्षीय माध्यमातून सर्व मंडळींना नम्र निवेदन करतो, सभा चालवत असताना अचानक कोणताही विषय घेत असताना सांगत असाल तर त्या नैसर्गिक आपत्तीची शक्यता असेलतर, दुष्काळाची बाब असेलतर, चर्चेच्या माध्यमातून ऊहापोह होऊ शकतो. अशा पद्धतीने नगरसेवकांना भावना व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आभार मानून, मी, आपण पक्षात कमी पडतोय,याचे आत्मचिंतन केले पाहीजे. नियमांवर बोट ठेवून अधिकार मांडणारा हा विषय नाही. हे विषय इथे घेत जनतेचा आवाज मांडण्यासाठी हे सुप्रिम

सभागृह आहे. कोणाचे काय, कोण कोणत्या पद्धतीने विषय मांडतो. महापालिकेच्या अजेंडावर हा विषय नव्हता. त्याला इथे बोलण्याचे आत्मिक समाधान मिळते. एवढ्या कळकळीने विषय मांडला. मा.मंगलाताई कदम, मा.योगेश बहल हे महापौर असताना सर्वपक्षांचे गटनेते यांच्या माध्यमातून कोणत्याही नगरसेवकाच्या मनाला संकोच वाटला नाही पाहीजे. माझे कोणी ऐकत नाही. कोणी अधिकारी गांभिर्याने विषयाला घेत नाहीतर त्याची पक्षात कान उघडणी केली पाहीजे. नगरसेवकाला अशा विषण्ण अवस्थेत हतबल होऊन त्याने त्याच्या भावना व्यक्त करणे म्हणजे हा सर्व शहराच्या विश्वस्तांचा अपमान आहे. म्हणून महापौरांची जबाबदारी म्हणून नव्हेतर याठिकाणी या सर्व पार्श्वभूमीवर काम करत असताना केवळ सभा तहकूब केली. सभा तहकूब करण्याचा अधिकार आहे. असाच विषय न राहता प्रत्येक पक्षाच्या गटनेत्याच्या माध्यमातून सभागृहात जेव्हा विषय येतो, तेव्हा राजकीय पादत्राणे काढून शहराचे विश्वस्त म्हणून बसत असतो. हेच पादचारी नगरसेवकच पाहीजेत असे वाटते. अधिका-यांची काय ताकद आहे नगरसेवकाचे ऐकू नये. परंतू असे कोणीतरी वेगळे म्हटले. एवढी नाराजी सदस्यांमध्ये कुठून आली. त्याचे कारण सभागृहापुढचा विषय खोटा नाही. पक्षाच्या काही लोकांच्या, नगरसेवकांच्या माध्यमातून अनधिकृत बांधकामांवर शहरात कारवाई होणार अशा अनेक गोष्टी घडत आहेत. आयुक्तांना नम्र विनंती करतो, तुमच्या कारभाराबद्दल संशय व्यक्त केलेला नाही. त्याचा अर्थ असा नाही तुमची हीच पद्धत योग्य आहे. तुम्हीच चांगल्या पद्धतीने घ्याल. तौलनिकपणा असावा. कोणत्याही अधिका-याला याची भिती वाटू नये. कदाचित प्रशासनाला परवडणार नाही. हे आमचे आहेत असे अधिका-याला वाटू नये. नाहीतर ही सभा कधीच संपणार नाही. आजच्या प्रश्नाचे उत्तर उद्या मिळेल. नाहीतर पुन्हा हाच प्रश्न असणार. सभा तहकूब केल्यानंतर कोणीतरी सांगावे, स्पष्ट करावे. मी माझ्या पद्धतीने भाषण करुन मोकळा झालो. आपल्या कारकीर्दीत नवीन पद्धतीची अंमलबजावणी करावी. ज्या-ज्या नगरसेवकांना अशा घटना घडत असतील तर एक नगरसेवकाने दुस-या नगरसेवकाची अशी गोंधळवाणी परिस्थीती पाहणे म्हणजे स्वतःचा अपमान करुन घेणे. गटनेते माध्यमातून, पक्षातून आयुक्त साहेबांना बोलवा. हा आपला अधिकार आहे. संबंधित अधिका-याला बोलवून जाब विचारायचे काम भविष्यात करावे नाहीतर पारंपारीक पद्धतीने बोलतोय, भाषण करतोय. मा.दत्ता साने बोलले. मा.राहूल जाधव बोलले,हे मनसेचे शहरातील पहिले नगरसेवक आहेत. त्यांचा अपमान संपूर्ण सभागृहाचा अपमान आहे. अधिका-यांना बोलले तर ते काळ्या फिती लावून काम करतात. त्यांचा

अपमान सर्व सभागृहाचा अपमान आहे. ही भावना ठेवून माझ्या भावना व्यक्त करतो.

मा.उल्हास शेट्टी – मा.महापौर साहेब, जास्त वेळ घेणार नाही. विषय आहे म्हणून बोलतो. मा.योगेश बहल यांनी आयुक्त साहेबांना सांगितले आहे, आम्हाला यासंदर्भात माहिती द्या. अतिक्रमणाविषयी मा.दत्ता साने यांनी प्रश्न उपस्थित केला. मा.सुलभा ऊबाळे ताईंना माहीती नाही. मला याठिकाणी सांगायचे आहे. अमुक-अमुक नगरसेवकाने सांगितले, पार्कींगमध्ये हॉटेल्सचा व्यवसाय चालतो. मी हॉटेल चालकांचे प्रतिनिधीत्व करतो. तो माझा व्यवसाय आहे. त्यासंबंधी प्रश्न उपस्थित केला. मला त्याच पद्धतीने बोलायचे आहे. इथे महापौरांचे हॉटेल आहे. नाना काटे यांचे हॉटेल आहे. ब-याच नगरसेवकांची हॉटेल्स् आहेत. पिंपरी चिंचवड मध्ये बरीचशी हॉटेल्स् बेसमेण्टमध्ये आहेत. पण ब-याच गोष्टी बेसमेण्टमध्ये होत असतात. पार्कींगचा नियम फक्त हॉटेललाच आहे बाकीच्यांना नाही का. पिंपरी चिंचवड शहरात बरीचशी अतिक्रमणे बेसमेण्टमध्ये असतात. मुळात बिल्डींगच्या ड्राईंगमध्येच तरतूदी केल्या पाहीजेत. तेथे शॉपस्, गोडाऊनला परवानगी द्यायची नाही. पूर्वीच्या बिल्डींगमध्ये बेसमेण्टमध्ये स्टोअर, गोडाऊन तुमच्या कायद्यात होते. त्यावेळी तुम्ही त्याला परवानगी देत होता. म्हणून ते अस्तित्वात आलेले आहेत. ब-याचशा गोष्टी तिथे करत आहेत. महापालिकेचे बेसमेण्टमध्ये काय आहे. झेरॉक्स ऑफीसेस आहेत. प्राधिकरणात मेन बिल्डींगमध्ये बेसमेण्टमध्ये काय-काय चालते आपल्याला माहिती आहे. बेसमेण्टमध्ये टाऊन प्लॅनिंगसारखा प्रकार होतो. कायद्यात पडायचे नाही. सूचना येते. सर्वांच्या आवडीचा विषय दिसतो. प्रत्येक नगरसेवक वॉर्डात काम करत असताना त्याप्रमाणे कायदा करा, मंजूर करा. पार्कींगमध्ये लोकांना व्यवसाय करु द्यायचा नाही. त्याआधी रोडवरील व्यवसाय कधी पाडायचे. प्राधिकरणात काम करतो. रस्त्यावर काय प्रकार चालू आहे. उद्यानांत काय प्रकार चालू आहे. ऑफीस बांधू शकतो. कार्यालय बांधू शकतो. हेच काय प्रायव्हेट कोचिंग क्लासेस चालू आहेत. उद्यानांमध्ये त्यांना पार्कींगचा नियम नाही. मोठ-मोठे मॉल्स्, ज्वेलरी शॉप्स् आहेत. हॉस्पीटल्स् यांना नियम का नाही. कोचिंग क्लासेस आहेत. पिंपरी चिंचवड शहरात मोठमोठे शोरुम्स् आणि पार्किंग रोडवर असते. हा विषय उपस्थित केला आहे. सर्वांसाठी पूलाबाहेर जागा ठेवावी लागेल. शहरात काही वाढ असणार नाही. आम्हाला एकाबद्दल बोलणे, दुस-यांना एकाबद्दल बोलणे म्हणजे आम्हाला कळत नाही. हॉटेल व्यावसायिकांचा प्रतिनिधी म्हणून बोलतो. मंदीर असू

द्या. गार्डनमध्ये मंदीर असू द्या. प्राधिकरणाने बांधलेली बिल्डींग असू द्या. एक्स्ट्रा बांधकाम असू द्या. यांची बांधकामे पाडणार काय? दुस-याचे पाडणार नाही का? व्यावसायिकाकडून वसूली करतो. प्रॉपर्टी टॅक्स, इन्कम टॅक्स,सर्वीस टॅक्स इ. टॅक्स भरावे लागतात. त्यांच्यावर कारवाई होणार अशा गोष्टी करायच्या नाहीत. बाकीच्यांची आम्हाला वसूली काढता येते. मी माझे काम करतो, त्यासंदर्भात बोलायचे नाही. याविषयावर जास्त बोलणे योग्य नाही. मला म्हणायचे ते समजून दिले नसेल तर ***LBT*** संदर्भात मा.योगेश बहल यांनी निर्णय घेतला, त्याबद्दल उत्तर द्यावे.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपली बजेटची मिटींग दुपारी २.०० वा. आहे. चोरीच्या घेतलेल्या पाण्याच्या कनेक्शन संदर्भात २ वेळा पेपरमध्ये आले. १ तारखेपर्यंत बील भरले नाहीतर दंड भरुन कनेक्शन कट करु असे सांगितले आहे. आपल्याशी अभय योजनेबद्दल चर्चा झाली. निम्मे पैसे भरायचे असे आपण आदेश काढले. चेकींग करुन त्याचे समायोजन करण्याची व्यवस्था करु असे आपण सांगितले. परंतू माझ्या वॉर्डातील २१ प्रकरणे आहेत. २५ ते ४० हजार पर्यंत बिले आहेत. एवढे करुन सुद्धा तुम्ही पुन्हा अजंठानगर पूर्वी २७,००० आकडा होता त्यात ५,००० वाढून ३२,००० झालेले आहेत. कारचे साहेबांशी चर्चा केली. पूर्वीच्या अनुषंगाने निर्देश देऊन त्यांना अजंठानगरसाठीचा फॉर्म भरला. तुम्हाला पैसे येतील. लोकांमध्ये नियम करताना भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. ठोस निर्देश द्या. पाण्याचे बील भरले गेले पाहीजे. यासाठी योग्य निर्णय घ्यावा व मिटींगला सुरुवात करावी अशी विनंती करतोय.

मा.महापालिका आयुक्त – मा.महापौर साहेब, सर्व उपस्थित सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, याठिकाणी ३ ते ४ विषय उपस्थित झालेले आहेत. ज्यावेळी धार्मिक बांधकामांबाबतीत मुद्दा उपस्थित झाला आहे, यात मुळात अनधिकृत बांधकामांबाबतीत शासनाचे आदेश रेकॉर्डवर उपलब्ध आहेच. तसेच धार्मिक बांधकामाबाबतचे निर्देश, स्पष्ट आदेश रेकॉर्डवर आहेत. धार्मिक बांधकाम होत असेल तर संबंधित अधिका-याने ते ताबडतोब थांबवले पाहीजे. याबाबत तक्रार झाल्यानंतर त्याप्रमाणे बांधकाम तिथे निष्कासित करण्यात आले आहे. दुसरा मुद्दा अनधिकृत बांधकामांना जास्त महत्व दिले जाते. नुसता फक्त मुद्दा उपस्थित झाला आहे. ज्या पार्श्वभूमीवर मी महापालिकेत रूजू झालो, ती देखील आपण समजून घ्यावी.

दि.३१/३/२०१२ चा आदेश अंतिम झाला होता. जर मी त्यावेळी रुजू झालो नसतो तर मला अशी भूमिका घ्यावी लागली नसती. अन्य अधिकारी रुजू झाला असता तर त्याला सुद्धा हाच निर्णय घ्यावा लागला असता. या विषयावर विधानमंडळामध्ये दोन वेळा सविस्तर चर्चा झालेली आहे. शासनाच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांनी विधान मंडळात निवेदन केलेले आहे. अनधिकृत बांधकामे व अनधिकृत नळजोड हे दोन वेगळे विषय आहेत. मा.उल्हास शेट्टी, मा.योगेश बहल यांच्याकडे अधिकृत नळ कनेक्शनच्या नोंदीची यादी आहे. पाण्याचे मीटर पळते, चुकीचा आकडा दाखवते, मीटरमध्ये हवा जाते अशा प्रकारच्या मीटरबाबत तक्रारी आहेत. तरीदेखील सन २००९-२०१० व २०११-२०१२ या वर्षांमध्ये अनधिकृत नळ जोडाकरीता दुप्पट/तीनपट दंड आकारणी केलेली आहे. मा.उल्हास शेट्टी, मा.योगेश बहल यांनी अनधिकृत नळ जोडाकरीता फौजदारी गुन्हा दाखला करावा अशी सूचना केली आहे. गुन्हा दाखल करण्याच्या मुद्याबाबत काही गोष्टींचा विचार केला पाहीजे. जर एखाद्या व्यक्तीने अधिकृत कनेक्शन घेतले नसेल, पाण्याची चोरी करीत आहे त्याला वारंवार सूचना देऊन सुद्धा थांबले नाहीत तर, जुने बील आहे, पत्रक प्रसिद्ध केलेले आहे, डिक्लरेशन केलेले आहे, पण कनेक्शनच्या नोंदीमध्ये मोठा दोष असेल तर म्हणजे समजा त्याने अर्धा इंचाचे कनेक्शनची नोंद केलेली आहे मात्र एक इंचाचे कनेक्शन वापरतो आहे असे असेल तर, त्याने त्याचे डिटेल्स् देणे आवश्यक आहे. एका बाजूला पाणी कमी होते आहे ते कुठेतरी रेग्युलर करुन घ्यावे. महापौरांनी याचे रेटबाबत पत्रकार परिषद घेतलेली आहे. कोणी पाण्याची चोरी करत असेल तर गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. अशा दोन्ही स्वरुपाच्या पॉलिसी आहेत.

पार्कींगच्या मुद्द्याबाबत परस्पर विरोधी मते सभागृहात आली आहेत. कायद्यातील तरतूद समजून घेऊन त्याबाबत धोरण ठरविले जाईल. ***LBT*** बाबतीत दराचा मुद्दा आला आहे. ***LBT*** च्या अनुषंगाने २/३ मुद्दे मांडायचे आहेत. सुरुवातीला राज्य शासनाने ज्या महापालिकांत ***LBT*** लागू केली, त्यामध्ये मीरा-भाईंदर, नांदेड, जळगाव या महापालिकांचा समावेश होता. धुळे, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर इथे ***LBT*** लागू केलेली आहे. राज्य शासनाने जी ***LBT*** लागू केली, त्याचे रुल्स् दि. २५ मार्च २०१० ला प्रसिद्ध केलेले आहेत. कलम १५ (टी) सबसेक्शन अंतर्गत हा नियम लागू केलेला आहे. अमेंडमेंटनुसार ***LBT*** चा अधिकार राज्य शासनाला दिलेला आहे. यापूर्वी जकात लावत होतो, त्याचे दर ठरवत होतो, चांगले काम करत होतो. हे सर्व अधिकार राज्य शासनाने आपल्याला दिलेले आहेत. परंतू ***LBT*** बाबत अधिसूचना पाहिली तर आपल्या महापालिकेच्या क्षेत्रात एकूण २५,०१३ इतके लोक

निघाले आहेत. कलम १२७ च्या उपकलम २ अन्वये, अधिसूचना काढलेली आहे. ती ***LBT*** बाबत सादर केलेली आहे. त्याबाबतचे अधिकार राज्य शासनाच्या स्तरावर वापरावयाच्या अधिसूचनेच्या कलमाच्या १२७ (२) चे १५२ (टी) हे स्वरुप आहे. यापूर्वी महापालिकांना जकात दर ठरविताना ते कमी/जास्त करण्याचा अधिकार होता. ***LBT*** हा जकातीचा नवीन उपकर/प्रवेशकर आहे, असे म्हटले आहे. कलम १२७ (२) नुसार जकात ऐवजी स्थानिक संस्था कर असा शब्द वापरताना सगळे अधिकार महाराष्ट्र शासनाला राहतील असा शब्द प्रयोग आहे. त्याअनुषंगाने टप्प्याटप्प्याने टॅक्स लागू करुन दर ठरविणार आहोत. तीन/चार महिन्यांपूर्वी राज्य शासनाने जाहीर केले, ***LBT*** क व ब वर्गीय महापालिकांना लागू करावी. याआधी ड श्रेणीतील महापालिकांना याआधीच चालू केलेली आहे. याबाबत राज्य शासन पातळीवर जवळपास ७ बैठका तीन महिन्यांत झाल्या. त्याप्रमाणे दि. २५ फेब्रुवारी २०१३ ला पहिल्यांदा नोटीफीकेशन निघाले. त्याची प्रत दि. १२ मार्च २०१३ रोजी मिळाली. महापालिकेचे अर्थसंकल्पीय धोरण ठरविताना दोन बैठका झाल्या. दरात वाढ करणे, कमी करणे, मिळकत कराबाबत मा.शहाजी पवार, सहा.आयुक्त,करसंकलन यांनी सविस्तर सादरीकरण केले आहे. आकाशचिन्ह परवाना,पाणीपुरवठा यांच्या दराबाबत चर्चा महापौर, पदाधिकारी, गटनेते यांच्या समोर झाली आहे. ***LBT*** च्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येतील अशा स्वरुपाची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. ज्यावेळी ***LBT*** बाबत प्राथमिक चर्चा झाली आहे, उर्वरीत महापालिकेमध्ये १७ गावे नव्याने समाविष्ट झाली असल्यामुळे या गावांतील सन्माननीयांची आग्रही भूमिका आहे. जुन्या गावांमध्ये त्यामानाने विकास कामे झाली आहेत. वाढीव तरतूद मिळावी म्हणून महापौर परिषदेत पुन्हा पदाधिकारी, गटनेते यांच्याशी चर्चा झाली. ***LBT*** काय-काय स्वरुपात बिलातून उचलावा लागेल, किती उत्पन्न मिळेल अशी चर्चा निश्चितपणे झाली आहे. सर्वांची वेळ लक्षात घेऊन मा.महापौर निश्चित करतील त्यादिवशी बैठक आयोजित करण्यात येईल. १ जानेवारी २०१३ ला मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यांची अशी कार्यशाळा घेतली आहे. दुसरी कार्यशाळा दि. १५ मार्च २०१३ रोजी घेतली आहे. औद्योगिक नगरीतील उद्योगपती, लघु उद्योजक यांच्या समोर कार्यशाळा घेऊन त्यांच्या सूचना पहिल्यांदा राज्य शासनाकडे सादर केलेल्या आहेत. त्यांचे प्रश्न तेथे मांडले आहेत. दुस-या कार्यशाळेत माहिती दिली आहे. व्यापा-यांची दि. १ जानेवारी रोजी ऑटो क्लस्टर मध्ये, दि. १४ जानेवारी रोजी आचार्य अत्रे सभागृहात कार्यशाळा घेतली आहे त्यात ***LBT*** बाबत प्राथमिक माहिती दिली. त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न राज्य शासनाकडे मांडले

आहेत. निविदा प्रक्रियेची माहिती दुस-या कार्यशाळेत दिली आहे. डिसेंबर २०१२ मध्ये ***LBT*** संदर्भात रुल्स्, फॉर्मस् महापालिकेच्या वेबसाईटवर लोड केलेले आहेत. एक आठवड्यापूर्वी मार्गदर्शिका पुस्तिका तयार करण्यात आली आहे. ती महापालिकेच्या वेबसाईटवर अपलोड केलेली आहे. त्याची प्रत सन्माननियांना पाठवण्यात आली आहे. दि. १८ मार्च २०१३ पासून नोंदणी सुरु केलेली आहे. प्रभाग कार्यालयांमध्ये अ प्रभागात हेगडेवार भवन, ब व ड प्रभागाकरिता झोनिपू कार्यालय, चाफेकर पूलाशेजारी, क प्रभागाकरीता क प्रभागाचे कार्यालय याप्रमाणे नोंदणी सुरु केली आहे. मुख्य कार्यालयात सुद्धा नोंदणी सुरु केलेली आहे. आजपर्यंत दि.२१ मार्च पर्यंत १०३५ संस्था, लोकांनी फॉर्म घेऊन गेलेले आहेत. २२ लोकांनी ऑन लाईन फॉर्म भरलेला आहे. २५ लोकांनी फॉर्मचे पैसे भरले आहेत. १०७ लोकांनी चौकशी केलेली आहे. याची नियमावली यात मांडली हे. ज्यांनी वॅटसाठी विक्रीकर विभागाकडे रजिस्ट्रेशन केलेले आहे. त्यांची रजिस्टर्ड अशी नोंद आहे. त्यांची नोंदणी इथे आपोआप होईल. अशी नोंदणी केलेले उद्योजक, व्यावसायिक यांची आपल्याकडे २५,००० इतकी संख्या आहे. त्यांना फॉर्म भरायची आवश्यकता नाही. त्यांची नोंदणी आपोआप होणार आहे. टॅक्स विभागाकडून यांची माहिती घेतली आहे. १ मार्च २०१३ पासून ३१ मार्च २०१३ या ३० दिवसांत नोंदणी करणे बंधनकारक आहे. मोठे उद्योजक रजिस्टर्ड आहेत, त्यांची आपोआप नोंदणी होते. त्याव्यतिरीक्त राहतील त्यांना सध्या महिन्याची मुदत आहे. चार प्रभाग स्तरांवर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आम्हाला आणखी मार्गदर्शनाची गरज आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली तर कार्यशाळा ऑटोक्लस्टर किंवा आचार्य अत्रे सभागृह इथे व्यापा-यांसाठी घेणार आहोत. नोंदणी प्रक्रिया सुरु असताना, सुरुवातीच्या कालावधीत एका पदावरुन दुसरीकडे जात असताना सर्वप्रथम तिथे रुळायला वेळ लागतो. सगळ्या गोष्टी नव्या असतात. आपल्याला सुद्धा ***LBT*** नवी आहे. कर संकलनमध्ये घट येण्याची शक्यता असते. बाकी महापालिकांचा जो अनुभव आहे, तिथे साधारणतः अशीच परिस्थीती आहे. मीरा-भाईंदर महापालिकेत दि.१/४/२०१० रोजी ***LBT*** लागू करण्यात आली. २०११ मध्ये ७४ कोटी मिळाले. २०१२ मध्ये १०३ कोटी, २०१२-१३ मधील आकडा १०० कोटी आहे. पहिल्या वर्षापेक्षा दुस-या वर्षी उत्पन्नात निश्चितच वाढ आहे. नांदेड महापालिकेत जकातीचे उत्पन्न सन २००९-१० साठी ४१ कोटी होते. ते ***LBT*** लागू केल्यानंतर २४ कोटी मिळाले. नांदेड महापालिका, मीरा-भाईंदर महापालिका, जळगाव महापालिका इथे पहिल्या टप्प्यातील उत्पन्न कमी झाले म्हणून खूप विरोध झाला होता. दुस-या वर्षी ३६ कोटी व फेब्रुवारीपर्यंत ४१ कोटी

उत्पन्न झाले होते. सर्वप्रथम तोटा होतो पण नंतर त्यात निश्चित वाढ झाली आहे. नवी मुंबई महापालिकेत ज्य़ावेळी ***LBT*** लागू केली, जवळपास २०० कोटींची उत्पन्नात वाढ झालेली आहे. कल्याण-डोंबीवली महापालिकेत सन २००९-१० मध्ये ८० कोटी, २०१०-११ मध्ये १०७ कोटी उत्पन्न मिळाले. दि.१ जुलै २०१२ रोजी ***LBT*** लागू झाल्यानंतर १४४ कोटी इतके उत्पन्न झाले आहे. १०७ वरुन १४४ कोटी झालेले आहेत. कोल्हापूर महापालिकेत जकातीचे उत्पन्न सन २००९-१० मध्ये ८० कोटी, २०१०-११ मध्ये ९८ कोटी, २०११-१२ मध्ये ५८ कोटी व फेब्रुवारी २०१२ ७२ कोटी इतकी झालेली आहे. साधारणतः दोन्ही महापालिकांमध्ये मोठी वाढ झालेली आहे. कल्याण-डोंबीवली, मीरा-भाईंदर महापालिकांत घट नाहीतर वाढ झालेली आहे.

सभागृहात बजेट मांडताना चर्चा चालू होती, त्यावेळी ***LBT*** चे नेमके कसे होणार***?*** चालू वर्षासाठी अंदाजे इन्कम धरले आहे. अपेक्षित १३०० कोटी धरले आहेत, साधारणतः १०५० ते ११०० कोटी इतके होईल. ५ ते १० टक्के कमी/जास्त होत असतात. जास्तीत जास्त ११०० कोटींपर्यंत जाईल. जकात चालू असताना मंदीचे वातावरण असतानाही अंदाजे उत्पन्न १४५० कोटी धरले होते. ***LBT*** लागू करतानाही मंदीचे वातावरण आहे. तरी १२०० कोटी धरले आहे. पिंपरी चिंचवडमध्ये उद्योजक, कंपन्या, मोठे उद्योजक यांची वॅट मध्ये नोंदणी आहे. यांचे अकाऊंटींग, बुक किपींग चांगल्या पद्धतीने असते. त्यामुळे ***LBT*** मध्ये हे सगळे रेकॉर्ड मिळेल. उलट व्यावसायिकांना हे जास्त सोयीचे होईल. आपल्याकडे येथे प्रथम काही जागांची चुकीच्या पद्धतीने आकारणी केली तरी १० फूटापर्यंत कंट्रोलसाठी सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावले आहेत. यात बराचसा वेळ वाया जातो. रेकॉर्ड किपिंग प्रोव्होकेट असल्यामुळे त्याची ***LBT*** निश्चित नाही. ***LBT*** सोयीचे जाणार आहे. पहिल्या वर्षी पाहिले तर मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबीवली महापालिकांत ठोस अंतर्गत बजेट केले. यात नंतर सुधारणा होते. ढोबळ नियोजन केलेले आहे. सुरुवातीला ७/८ महिन्यांनंतर सुरळीत होईल त्यावेळी रेग्युलर इन्कम मिळेल. १२०० कोटी एवढे इन्कम धरले आहे. मध्यंतरी आचार्य अत्रे सभागृहात कार्यशाळेमध्ये प्रश्न उपस्थित केला गेला की, नियमावलीत वार्षिक उलाढाल १ लाखांच्या वर असेल तर ***LBT*** साठी नोंदणी करावी लागेल का***? LBT*** हा शहरात प्रवेश करणा-या मालावर एन्ट्री टॅक्स आहे. दारोदार फिरणारे, टपरीधारक यांना एन्ट्री टॅक्स नाही. त्यामुळे घाबरुन जायचे कारण नाही. जे व्यापारी, उद्योजक शहराबाहेरून माल आणतात, त्यांना ***LBT*** लागणार आहे. शेजारच्या किराणा दुकानातून, भाजीवाल्याकडून माल विकत घेऊन वडापावची गाडी चालवतोय त्याला ***LBT*** नाही. ज्यांची उलाढाल १० लाखापर्यंत आहे त्यांना लम्पसम

रक्कम द्यावी लागणार आहे. एक लाखाला किती, दोन लाखाला किती याचे कोष्टक बनवले आहे. विशिष्ट रक्कम भरली आहे. १० लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न आहे त्याला मात्र रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे. दर महिन्याचे रेकॉर्ड ठेवून पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत महापालिकेच्या अकाऊंटमध्ये रक्कम जमा करायची आहे. माहिती जमा करायची आहे. सहा महिन्य़ांतून रिटर्न भरायचे आहेत. यात भिती व्यक्त होते आहे, इन्सपेक्टर रोज येतील, अधिका-याने पुस्तक तपासले म्हणून पैशांची मागणी करतील. सरसकट कोणताही अधिकारी व्यापा-याचे पुस्तक तपासू शकणार नाही. अशी त्यात स्पष्ट तरतूद आहे. आयुक्त सांगतील, निर्देशीत करतील तेच तपासणी करण्यासाठी जातील. कोणीही तपासणी करणे याला प्रतिबंध केलेला आहे. कोणीही यांच्याकडे येऊन कागद तपासेल, त्याची हॅरॅसमेंट होईल असे होणार नाही.

दर ठरवण्याबाबतीत त्याचे समानीकरण करणारी, अशी भूमिका घेणारी ही राज्यातील पहीली महापालिका आहे. जकातीचे दर सुटसुटीत केले आहेत. २.४ टक्के, १ टक्के असा दर समानांकीत घेतलेला आहे. शहरातील उद्योजकांची भूमिका लक्षात घेता, नोव्हेंबरमध्ये ठराव पारीत केलेला आहे. राज्य शासनासमोर हीच भूमिका मांडली आहे. प्रस्तावित दर समानीकरणावर सांगोपांग,सविस्तर चर्चा केलेली आहे. दर लागू झाल्यानंतर २ वर्षांत लागू झाले. व्यापारी, व्यावसायिकांना उत्तरे मिळाली. दरामध्ये फरक नसावा, चालू दर असावेत ही भूमिका राज्य शासनाने मान्य केलेली आहे. हे समानीकृत दरांचा प्रस्ताव केला तरी ***LBT*** चे दर त्याच्या जवळपास राहतील. अशी सभागृहाची भूमिका आहे. महापालिकेच्या उत्पन्नात समतोल राहीले पाहीजे. औद्योगिक मंदीचे वातावरणात उद्योग टिकले पाहीजेत. दोन्हींचा सुवर्णमध्य साधला जाईल. आपली भूमिका जवळपास मान्य होईल असा विश्वास आहे. राज्य शासनाने भूमिका घेत महापालिका स्तरावर सर्व दर समान असावेत. काही वेळा वाढीव काम करावे लागेल. पूर्णतः दर स्वतंत्र आहेत. ***LBT*** मध्ये साधारणतः समान दर असावेत अशी भूमिका घेतली असल्यामुळे काही दर थोडे कमी होतील. साधारणतः ८० टक्के दर ठरलेले आहेत. तेच राहतील असा विश्वास आहे. महापालिका बैठक आहे. २/३ दिवसांत दर जाहीर होतील. १ एप्रिल पासून ***LBT*** लागू होईल. मा.महापौर आदेश करतील त्याप्रमाणे सविस्तर कार्यशाळा घेण्यात येईल.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, ज्यांनी ऑलरेडी फॉर्म भरला त्याचे न्यू कनेक्शन कोट होईल का.

मा.महापालिका आयुक्त – पाणीपुरवठ्याचे अधिकारी त्यात सबसिड कंटेन्ट निर्माण होणार नाही याकडे लक्ष देतील.

मा.राजेंद्र काटे – मा.महापौर साहेब, आपल्याकडे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महिला बालकल्याण योजनेअंतर्गत कार्यक्रम राबविला आहे. ही संस्था प्रशिक्षण देते. प्रशिक्षक अपॉईंट करतात. मोफत प्रशिक्षण देण्याबाबत दि.7.12 ला निवेदन केलेले आहे.

मा.शमीम पठाण – मा.महापौर साहेब, काय चालले आहे नियमाप्रमाणे सभागृह चालवा. लक्षवेधी सूचना कोणी मांडली. हे काय चालले आहे महापालिका सभा सुरु होण्यापूर्वी कोणी लक्षवेधी सूचना मांडली. दहा तास चर्चा घ्या कोणताही विषय नाही बेस नाही यातून आयुक्त साहेबांकडून जास्त माहिती कळाली याबद्दल दुमत नाही. शहरातील सगळे विषय घेतोय. कोणताही विषय सोडणार नाही. मी पण उभी राहील दोन तीन तास बोलेल. अंदाजपत्रकाच्या वेळी हेच केले. कधी नव्हे इतकी प्रदीर्घ चर्चा, सगळ्या विषयांवर चर्चा. सभागृह नियमाप्रमाणे चालवावे.

मा.महापौर – तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही जाऊ शकता.

मा.राजेंद्र काटे – मा.महापौर साहेब, प्रशासनाचा जो कारभार चालला आहे त्याची दखल घेतली पाहीजे. ही गरीब घरातली मुलगी आहे. महापालिकेच्या दारात रोज चकरा मारते. तिला एक रुपयाची मदत मिळत नाही.

मा.शमीम पठाण – मा.महापौर साहेब, विषयपत्रिका आली आहे. लोकांनी अभ्यास केला आहे. त्याला विरोध केलेला नाही.

मा.महापौर – त्यावरच चर्चा चाललेली आहे.

मा.राजेंद्र काटे – मा.महापौर साहेब, जो विषय इथे आणला आहे, ती मुलगी गरीब घरातली आहे. ती इथे चकरा मारुन दमली. कोणी अधिकारी दखल घेत नाही. मुलगी येऊन-जाऊन चकरा मारते. तिचा विषय करायचा नसेल तर राहू द्या. तिने अमूल्य वेळ वाया घालवला आहे. महिला बालकल्याणच्या योजनांसाठी वेळ घालवत

असेल, तिला न्याय मिळत नसेल तर हे कोणाला सांगणार? असा कारभार चालत असेल तर काय उपयोग?

मा.महापौर – कुलकर्णी साहेबांशी याविषयी नंतर चर्चा करु.

(हिंदूस्थान अँटीबायोटीक्स या कंपनीची औषधे पिंपरी चिंचवड महानगरपालिका घेणार असल्यामुळे मा.आयुक्त यांनी असा प्रस्ताव मंजूर केला असल्यामुळे मा.महापौर यांच्या वतीने मा.सदगुरु कदम, मा.अमिना पानसरे यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला. )

---------

मा.अपर्णा डोके – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२३८ विषय क्रमांक – १

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.सोनाली जम मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.१८२७ दि.०६/११/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. २०३ दि.१२/०२/२०१३

निगडी जकात नाका भक्ती शक्ती चौक निगडी पुणे–४११०४४ येथे पी.एम.पी.एल.चा शेवटचा मोठा बसस्टॉप तयार होत आहे. तेथे येणा-या प्रवाशांच्यासाठी नाष्टा सेंटरची आवश्यकता असल्याने श्रद्धा स्नॅक्स सेंटर प्रोप्रा. बाळासाहेब भोर यांस सदर ठिकाणी पाच वर्षे कालावधीसाठी २५० चौ. फूट. जागा मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडे दराने व योग्य त्या अटीशर्तीवर देणेकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.वनिता थोरात – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.अश्विनी मराठे – मा.महापौर साहेब, गेले दोन/तीन महिन्यांपासून हा विषय तहकूब करतोय का ते समजत नाही. सकाळ वर्तमानपत्रात बातमी आली होती, कोणत्याही प्रकारच्या महापालिकेच्या जागा थेट पद्धतीने देता येणार नाहीत. तरीसुद्धा विषय मांडताय याचे आश्चर्य वाटते. विनंती आहे, हा विषय फेटाळून लावावा. निगडी जकात नाक्याचा हा बसस्टॉप होणारच आहे. त्याची अवस्था बकाल

दर्जाची हे. आत्तापासूनच या विषयाला मंजूरी दिली तर तिथे अनधिकृत टप-यांचे अतिक्रमण होणार आहे. या विषयाची दखल घेऊन हा विषय फेटाळून लावावा अशी विनंती करते.

(मा.धनंजय आल्हाट, मा.अश्विनी मराठे, मा.जाधव, मा.सुलभा ऊबाळे यांनी विरोध दर्शविला.)

मा.महापौर – यांचा विरोध नोंदवून विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, ज्यांचा विषय आहे त्यांना बोलू द्या. हा अतिशय चुकीच्या पद्धतीने आणि सत्तेचा दुरुपयोग करणारा विषय आहे. काय कोणत्या भागातील स्कोअर हाय्यर आहे. प्रसिद्धी पणाला लावली होती. विषय नक्की काय आहे. अशाच प्रकारचा विषय यापूर्वी आला होता त्यावेळी सभागृहाने तो विषय फेटाळला होता. विरोधकांच्या खांद्यावर बंदूक ठेवून हा विषय धक्क्याला लावला. असे स्वार्थी राजकारण करायचे. दोन्ही नगरसेवक मनसेचे आहेत. त्यांची संख्या कमी आहे म्हणून त्यांच्या वॉर्डात अशा ठिकाणी बसटर्मीनस थेट पद्धतीने देण्याचा ठराव केला आहे. याबाबत आयुक्त साहेबांकडून खुलासा पाहीजे आहे. अशा प्रकारे ठराव करुन महत्वाच्या ठिकाणी टप-या देऊ शकतो का? महापौर साहेब, तुमचे उत्तर ऐकले, तुम्ही म्हणालात हा विषय मान्य करु. आयुक्त साहेबांना खुलासा करायला लावा. तुमच्यावर एवढा दबाव असताना सुद्धा तुम्ही लोकशाही पद्धतीने सभागृह चालवताय, याबद्दल तुमचे अभिनंदन करते. याठिकाणी ही सगळ्यांसाठी वाईट गोष्ट आहे. दुस-याच्या वॉर्डात भक्ती-शक्ती टर्मिनस असलेल्या जागा, शासकीय रुग्णालये अशा मोक्याच्या ठिकाणांचे ठराव करुन स्वतःच्या कार्यकर्त्यांना टप-या द्यायला लागले तर अराजकता माजणार आहे. सगळ्या नोंदी तुम्ही घेऊन ठराव दाखल केला आहे. कोणाचा तरी राजकीय स्वार्थ बघायचा, तोंड बघून काम करायचे, यात आर्थिक व्यवहार झाला नसेल कशावरुन? पैसा देऊन विषय केला नसेल कशावरुन? यापूर्वी या विषयावर २५ वेळा चर्चा केली. कितीतरी अनधिकृत टप-या पाडल्या. त्यांच्याकडून उत्पन्न घेत नाही. हॉकर झोनची जागा निश्चित करत नाही. आम्ही आमच्या वॉर्डात स्वतः हे नियम पाळतो. अनधिकृत टप-या बांधू देत नाही. थेट पद्धतीने दिलेले सगळे गाळे काढून घेतले पाहीजेत. मागील आयुक्तांनी केलेले निस्तरायची तुमची जबाबदारी नाही. पण तुम्ही सुधारणा करताय. त्यांनी केले म्हणून तुम्ही पुढे करायचे नाही. ठराव करुन जेवढ्या महापालिकेच्या जागा, गाळे

असतील ते काढून घेतले पाहीजेत. स्पर्धा झाली नाहीतर महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून थेट पद्धतीने देऊ नये. प्रशासकीय प्रमुख म्हणून ही तुमची सुद्धा जबाबदारी आहे. उद्या महापालिकेची इमारत सुद्धा द्या. एवढ्या इमारती माननीयांच्या कितीतरी बगलबच्च्यांना ठराव करुन भाड्याने दिल्या आहेत. एकीकडे आर्थिक स्त्रोत वाढवण्यासाठी प्रयत्न करतोय. दुसरीकडे अशा पद्धतीने चुकीची कामे करायची.

मा.सिमा सावळे – मा.महापौर साहेब, आत्ताच जिल्हाधिका-यांनी, राज्य शासनाने सिमारेषा आखून दिलेली आहे. हा विषय रेड झोनमधील व राज्य शासनाचा विषय आहे. अशा पद्धतीने देऊ शकतो का याचा पण खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळ-घोषणाबाजी)

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, सदस्य प्रस्ताव आहे. त्यात काय खुलासा मागवायचा आहे. विषय मंजूर करण्याचा आमचा अधिकार आहे. तुम्ही आम्हाला अधिकार सांगायची गरज नाही. मला महापौरांनी बोलायला सांगितले आहे. तुम्ही विषय मंजूर केलेला आहे. मंजूर केल्यानंतरही बोलू का देताय? सदस्य प्रस्ताव असताना विषयाला मंजूरी दिलेली आहे. जाहीर केलेले आहे. विरोध असेल तर मतदान घ्यावे. सदस्य प्रस्ताव आहे.

मा.महापौर – मतदान घेण्यात यावे.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, तुम्ही दबावाखाली काम करुन उपयोग नाही. आयुक्त साहेब जागांबाबत निर्णय घेणार आहेत का? खरे ऐकायची सुद्धा भूमिका ठेवली पाहीजे.

मा.महापौर – विषय मंजूर केलेला आहे. बोलायची संधी दिलेली आहे. सदस्य प्रस्तावांसाठी काय खुलासा देणार?

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांना खुलासा करु द्या. त्यांनी हो म्हणू दे, नाही म्हणू दे.

मा.महापौर – मतदान घ्यायचे ठरले आहे.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, कोणामध्ये खुलासा करायची हिंमत नाही.

मा.मंगला कदम – मा.महापौर साहेब, कोण कोणाच्या वॉर्डात काय करतोय हे सगळ्यांना माहीत आहे. आमच्यात खुलासा ऐकायची पण हिंमत आहे. रात्रंदिवस मतदान घ्या. आम्हाला चोरी करायची काही गरज पडलेली नाही. आम्हाला वाटते ते आम्ही करणार आहोत.

मा.नगरसचिव – विषय क्रमांक १च्या प्रस्तावाला ज्या सन्मा.सदस्यांचा विरोध आहे त्यांनी हात वर करावेत. जे सन्मा.सदस्य प्रस्तावाच्या बाजूचे आहेत त्यांनी हात वर करावेत.

मा.आप्पा बारणे – तटस्थ किती?

मा.महापौर – प्रस्तावाच्या विरोधात १५, तटस्थ २ आणि प्रस्तावाच्या बाजुने ५६ अशी मते पडली असून सदर विषय बहुमताने मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.नंदा ताकवणे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२३९ | विषय क्रमांक – २

दिनांक – २२.०३.२०१३ | विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३५/कावि/७३५/१२ दि.१९/११/२०१२

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२०२९ दि. १/१२/२०१२

३) मा.महापालिका सभा ठ.क्र. २०४ दि.१२/०२/२०१३

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. बस खरेदीसाठी आगावू रक्कम अदा करणेकामी, पुणे महानगर परिवहन महामंडळ यांना बसेस खरेदी करीता उर्वरित निधी र.रू.५,१६,३७,६८५/- (र.रू.पाच कोटी सोळा लाख सदोतीस हजार सहाशे पंच्याऐंशी) तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक असून सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकात जेएनएनयुआरएम कामासाठी मनपा हिस्सा म्हणून र.रू.१५० कोटीची तरतूद करण्यात

आलेली असून त्यापैकी जेएनएनयुआरएम पाणीपुरवठा टप्पा १ साठी र.रू.७४.५० कोटी तरतूद आहे. यामधून पीएमपीएमएल यांना त्यांचे मागणीप्रमाणे र.रू.५.१७ कोटी शासन अनुदान प्राप्त झालेनंतर सदरची रक्कम समायोजित करून घेण्यात येईल. या उमेदमान्येतवर अदा करणेस तसेच त्यानंतर केंद्र व राज्य शासन यांचेकडून जसे अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे सदर लेखाशिर्षावर रक्कम जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुनिता वाघेरे – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.महेश लांडगे – मा.महापौर साहेब, आपण आज पी.एम.पी.एल.ला निधी देण्यासंदर्भात विषय आहे. सर्व सदस्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रत्येक सभेत या विषयावर चर्चा झाली आहे. हे बोलण्यासाठी मी उभा नाही. ज्यावेळी श्री.दिलीप बंड आयुक्त होते, त्यावेळी पिंपरी चिंचवड शहराचा विषय होता. त्यांनी या बसस्टॉपसंदर्भात विषय आला नाही असे सांगितले होते. मनपाचे बसस्टॉप बी.ओ.टी.वर देणार, त्याचे उत्पन्न मनपाला देणार असे सांगीतले होते. ६ महिन्यांपूर्वी आपल्या मनपाकडून लेटर गेलेले आहे. बसस्टॉप पीएमपीएमएलने विकसित केलेला आहे. तो बसस्टॉप स्थापत्यमधून तयार करावा. या विषयात महापौर,आयुक्त व स्थायी समिती अध्यक्ष यांच्या वॉर्डातील प्रश्न घ्या. स्थापत्य ठेकेदाराला चुकीचे काम होईल म्हणून हा विषय घेतला आहे. यात काहीतरी तरतूद करुन, वाढ करुन महापालिकेत तरतूद करा हे सांगायचे आहे. यात तुम्ही योग्य निर्णय घ्या. गेले ५ वर्षांत महापालिकेत त्यांना मागणी करतोय. अनुकंपा तत्वावरील लोक, पीसीएमटीचे लोक भरले आहेत. त्यातील फक्त २२ पैकी फक्त ९ मुले पर्मनन्ट केली. १३ जण अजून सुध्दा लेबर म्हणून काम करत आहेत. प्रत्येक वेळी मिटींग बोलवली होती. दोन/तीन/चार महिन्यात स्वतः पीएमपीएलच्या ऑफीसमध्ये गेलेलो होतो. तिथे आम्हाला बोलण्याचा अधिकार नसल्यामुळे महापालिका सभेत बोलतोय. आमच्या अडचणी मांडत असतो. बंड साहेबांच्या काळात बसस्टॉपच्या जागा आपल्याकडेच ठेवायचे ठरले होते. महापालिकेचा काहीतरी फायदा होईल या दृष्टीकोणातून काम करणार आहोत. जागा तशाच ठेवल्या असतील तर काहीतरी करा. सदस्यांची मागणी असताना तशीच ठेवली आहे. त्याठिकाणी अनुचित प्रकार घडेल त्यावेळी प्रशासन जागे होईल. बसस्टॉप कोणी अधिकारी बांधेल तुम्ही तरी बांधा नाहीतर पीएमपीएल यांना तरी बांधायला सांगा. लहान मुले, महिला, वृद्ध माणसे उन्हात उभे असतात. मी लहान असताना

सायकलवरुन शाळेत जात होतो, त्यावेळी जो बसस्टॉप तिथे उभा होता तोच आजही तेथे आहे. बसस्टॉपबाबत निर्णय घ्या.

मा.शमीम पठाण – मा.महापौर साहेब, आज पीएमपीएमएलचे अधिकारी इथे आलेले आहेत. आपण चर्चा करतोय. मला वाटते, त्यांना सभागृहाची भावना, पूर्ण पिंपरी चिंचवड शहराची भावना आदरणीय सन्मा. अत्यंत उच्च पदसिद्ध श्री. जोशी साहेबांपर्यंत पोहचवाव्यात. त्यांचे कार्यबाहुल्यामुळे त्यांना पिंपरी चिंचवडकडे लक्ष द्यायला वेळ नाही. त्यातल्या त्यात आम्ही ४ महिने झाले त्यांना बोलवतोय. त्यांचे येणे काही होत नाही. पैसे आधीच पोचले आहेत. त्यांच्या कानकुंडलात दररोज ओरडतो तसे आज सुद्धा ओरडणार आहोत. पत्रकार काय करतात, कसे करतात, कशी माहिती काढतात. कधी कोणावरही शिरसंधान करतात. त्यांना त्याची माहिती असते. मी पिंपरी चिंचवडचे पत्रकार श्री.विठ्ठल विनोद यांचे अभिनंदन करते. त्यांनी पीएमपीएलला आजपर्यंत ज्या निधीला मान्यता दिली आहे त्याचे लेखापरिक्षण आजपर्यंत झालेले नाही. त्याबद्दल आवाज उठवला पाहीजे. त्याबद्दल विठ्ठल विनोद यांचे धन्यवाद. आजपर्यंत ४६० कोटी १३ लाख निधी दिलेला आहे. महिला बचत गटांना काही अनुदाने दिलीतर त्यांनी काय केले याची विचारणा आपल्याकडे केली जाते. ६,००० रुपयांसाठी कोटेशन आणायला लावतात. दुर्लक्षित समाजातील लोकांना देतो. ४६० कोटींचा हिशोब मांडायला कितीतरी दिवस लागतील. कित्येक कोटी रुपयांचा हिशेब आपण विचारलेला नाही. त्यासाठी आपल्याला माहित करतो. सुप्रिम कोर्टाची ऑर्डर असायला पाहीजे. आपला पैसा कुठे गेलेला आहे. जेएनएनयूआरएम मधून पैसा गेला असेल, एवढे दुर्लक्ष झाले असेल तर हा अत्यंत चुकीचे आहे. आपण एखाद्या संस्थेला अनुदान देतो. कोणतीह संस्था माझी XYZ संस्था आहे. ५ लाख अनुदान पाहीजे. संस्थेचे ऑडीट होते. ४ जणांनी मिळून तयारी केलेली आहे. त्यासाठी अनुदान घेतोय. कोणत्याही संबंधित संस्थेला अनुदान द्यायचे असेल तेव्हा धर्मादाय आयुक्तांकडे ती संस्था रजिस्टर्ड असावी लागते. पीएमपीएल ही संस्था कुठेतरी नोंदणीकृत झालेली पाहीजे. निविदा मंजूर झाली असेल तर तिची नियमावली तयार आहे का नाही हा सर्वात आधी माझा प्रश्न आहे. संस्थेला नियमावली नसेल तर मग कशाच्या आधारे काम करतात. पीएमपीएलचे अधिकारी श्री.अष्टेकर यांना पुढे बोलवावे. त्यांनी नियमावली तयार केली आहे का, तयार झाली असेलतर ती आमच्यापर्यंत आली का याचा खुलासा करावा. नंतर मला बोलू द्या. नियमावली नसताना दर महिन्याला पैसे देतोय. १ कोटी देतोय. आमच्या

सगळ्यांच्या करातून पैसे देत आहोत. त्यांच्याकडून नोकरभरती केली आम्हाला विचारत नाहीत. नोकर भरती करताना परीक्षा घेतली आहे का. पुण्यातील किती लोक भरले आहेत. पीएमपीएल तयार झाली, पीएमटी व पीसीएमटी एकत्र झाली, त्यावेळी आधीचे ४५० लोक भरले. दापोडी गाव पिंपरी चिंचवडमध्ये समाविष्ट होणार होते त्यावेळी रोजंदारीवर कर्मचारी भरले होते. नंतर सगळे पर्मनन्ट झाले. एखादा माणूस सांगेल, यांच्याकडे लक्ष द्या. मेरीटमध्ये आल्याशिवाय घेतले जात नाही. सफाई कर्मचा-याला कोणती मेरीट लावतात. महापौरांचे अभिनंदन करते. त्या दर गुरुवारी पीएमपीएलच्या लोकांना कार्यालयात बोलवतात. नगरसेवकांचे काही विषय असतात. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. आमच्या दृष्टीने अशी संस्था कायदेशीर आहे. ज्याज्या वेळी विचारले, त्या-त्या वेळी परदेशी, गवळी या अधिका-यांनी सांगितले, नियमावली नाही, तयार करतोय. अशी काय मोठी संस्था आहे जिला नियमावली तयार करायला ५ वर्षे लागली याचा विचार करावा. ते आपल्याकडून पैसे घेतात, आपल्याकडून त्यांना विचारायचे आहे, सगळी नोंदणी करुन घ्यायची याचे उत्तर पाहीजे. जाब विचारायचा आहे, तुम्ही पैसे घेताय, आजपर्यंत किती बस खरेदी केल्या. बसथांबे बांधले, कुठे कुठे बांधले. पीएमपीएल आल्यापासून कोणता बसस्टॉप झाला. एकही नाही. ५०० बस खरेदी केल्या, प्रसन्न टूर्स व ट्रॅव्हल्सला चालवायला दिल्या. मी माहीती घेतली आहे. प्रत्येक बससाठी रु.४७/- त्यात बसचा मेंटेनन्सचा खर्च व ड्रायव्हरचा रेट रु.२९.९०/- प्रति दिवस या रेटने बस चालवायला घेतली आहे. त्यातून पीएमपीएलला रु.१७/- इतका फायदा होतो असे त्यांचे म्हणणे आहे. आपण त्यांना नवीन बस दिलेल्या आहेत. त्याचा मेटनन्सचा खर्च किती येतो. ५ वर्षांत काय मेंटेनन्स करतो. याचा आढावा घ्या. नवीन बसला ५ वर्षांत कोणताही खर्च नसताना मेटेनन्ससाठी रु.२९.९०/- का देतोय. हा प्रकार म्हणजे प्रशासन व सगळ्यांच्याच डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रकार आहे. हा करार करताना कोणत्या बाबी लक्षात घेतल्या आहेत. कोणते नियम केलेले आहेत. खर्च करताना पुणे महापालिकेचा विषय आला होता का. आपल्याकडे आला होता का नाही. कोणत्याही सभेची मान्यता न घेता दर महिन्याला लंपसम पैसे देतोय. त्यांनी भरती केली. पीसीएमटीचे २५० कर्मचारी आपण महापालिकेकडे वर्ग करुन घेतले आहेत. त्यांना दरमहा पगार देतोय. आपले ६ अधिकारी पुण्यात बसतात. फोन केला की सांगतात मी पिंपरी चिंचवडमध्ये आहे. पिंपरी चिंचवडच्या ऑफीसमध्ये विचारले तर सांगतात ते पुण्यात आहे. इथे थम्ब करतात, तिथे काम करतात. आपण त्यांना पगार देतो. प्रशासन व अन्य विभाग त्यांचा पगार

काढतोय. दररोज कुठे असतात याची नोंद नाही. आपल्याकडे पीसीएमटीचे २५० कर्मचारी घेतले. आपण त्यांना पगार देतोय. पुणे महापालिकेपेक्षा जास्त पैसे आपण त्यांना दिलेले आहेत हे त्यांना मान्य करावे लागले. आमच्याकडे किती बसेस आहेत. १५० बसेस पिपंरी चिंचवडकडे, बाकीच्या पुण्यामध्ये धावतात. पुण्याला ३५० बस दिलेल्या आहेत. पुण्यातील बसशी तुलना केलीतर अगदी डबघाईला आलेल्या, घाणेरड्या, पत्रा उचकटलेल्या, मोठमोठा आवाज येतो. कधी बंद पडतील ते सांगता येत नाही. अशा बस दिल्या आहेत. याबाबत लक्ष द्यावे. हा विषय करण्याबद्दल दुमत नाही पण विषय करायला घाईघाई होते आहे. प्रसन्न टूर्सला कॉन्ट्रॅक्ट दिल्यापासून आपल्या ड्रायव्हर्सना डे शिफ्ट मिळत नाही. त्यांच्या मानसिकतेच्या दृष्टीकोणातून त्यांच्याकडे बघा. आपले ड्रायव्हर्स रात्री जाऊन डेपोत झोपतात. पहाटे त्यांची फर्स्ट शिफ्ट सुरु होते. त्यादिवशी शिफ्ट मिळाली नाहीतर तो परत घरी येतो. काय वाटत असेल. कामाची भीक मागतात. काय चालले आहे. आपल्या कर्मचा-याकडे लक्ष नाही. बसस्टॉपकडे लक्ष नाही. तुम्ही सुद्धा यात सामील आहात. डोळे बंद करुन आपण तेवढी मदत देतोय. आपण यांना १९९५ मध्ये चौथा वेतन आयोग मंजूर केला त्यानंतर १२ वर्षांनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी देत असतो. ती सुद्धा पीसीएमटी कमिटीकडून मंजूर करुन दिलेली आहे. संबंधित अधिकारी अजून हिशोब काढत आहेत. ९५ पासून १६/१७ वर्षांपूर्वीचा हिशोब काढत आहेत. रिटायरमेंटला आलेल्या लोकांकडून पगार कपात करतात. पुणे इथे देतोय, त्याच सेवा सुविधा आम्हाला द्या. पुण्याशिवाय उभे होता. तुम्हाला पुण्याप्रमाणे करायचे असेल तरी तिकीट मोजके कसे असेल. पीसीएमटी होती अशीच चालू द्या. कोट्यावधी रुपये देण्यापेक्षा आपण आपल्या बस चालू द्या. कंपनीने नियमाप्रमाणे काम केले पाहीजे. कंपनी स्थापन केली. नियमावली दोन दिवसांत मागूवन घेवून त्यांना त्याचा जाब विचारा. तोपर्यंत पुढील पैसे द्यायचे बंद करावेत.

मा.अजय शितोळे – मा.महापौर साहेब, खेद वाटतो सांगायला पीएमपीएलचे जोशी साहेब यांना मी सांगवी ते स्वारगेट या बसरुटच्या वेळा वाढवाव्यात म्हणून निवेदन दिले. सांगवी गावामधून अनेक विद्यार्थी दररोज भारती विद्यापीठात शिकण्यासाठी जातात. ते सांगवी ते स्वारगेट या बसने जातात आणि त्यानंतर स्वारगेटपासून कात्रजच्या बसने भारती विद्यापीठात जातात. यामध्ये त्यांचा बराच वेळ जातो. तसेच कात्रजच्या बसला खूप गर्दी असते. त्यामुळे कधी कधी उभे राहून प्रवास करावा लागतो. म्हणून सांगवीपासून भारती विद्यापीठापर्यंत डायरेक्ट बस सेवा सुरु

करावी असे निवेदन मी त्यांना दिले होते. जोशी साहेब त्यांच्या कार्यालयात मला भेटले नाहीत. त्यांना भेटायला महिना घेतला. सहा महिन्यांनंतर त्यांची एक टिम आमच्याकडे आली. त्यानंतरही त्यांना चार वेळा फोन करावा लागला. टिम येऊन गेल्यानंतर त्यांनी १५ ते २० दिवसांनी एक लेटर पाठवले की, सांगवी ते स्वारगेट ही बस दर १५ मिनिटांना आहे. नंतर स्वारगेटपासून कात्रजपर्यंत दर ५ मिनिटांना बस आहे. माझे म्हणणे होते की, विद्यार्थ्यांचा वेळ जाऊ नये म्हणून डायरेक्ट बस सुरु करावी. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला विचारत नाहीत. अशा लोकांना आपण मदत का करायची. आपल्या भागातील विद्यार्थ्यांची त्यांना कळकळ नाही. त्यांना कशाला मदत करायची एवढेच मला सांगायचे आहे.

मा.अनिता तापकीर – मा.महापौर साहेब, काळेवाडी ते तापकीरनगर अशी एकच बस सोडतात. उन्हात उभे रहावे लागते. वायसीएम ला जाण्यासाठी बस नाही. तिथे एकतरी बसस्टॉप असावा. बसेस साफ असाव्यात.

मा.माया बारणे – मा.महापौर साहेब, वक्तशीर, कार्यक्षम प्रवासी सेवा मिळावी म्हणून पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी मिळून स्थापन केलेली पीएमपीएल गेली ६ वर्षापासून सेवा देते आहे. आपण आजपर्यंत त्यांना ४६० कोटींची अनुदाने दिली आहेत. राज्य सरकारचा पुढील अध्यादेश आलेला नाही. म्हणून पुन्हा पुढील २ वर्षे ११ कोटी ३१ लाख इतकी रक्कम आपण त्यांना दिलेली आहे. यात बस खरेदीसाठी १९० कोटी १३ लाख दिले. एवढ्या मोठ्या प्रमाणात आपण त्यांना अर्थसहाय्य करतोय. परंतू पूर्ण म्हणाव्यात अशा त्यांच्या सुविधा आपल्याला मिळत नाहीत. पीएमपीएलच्या कार्यकारी मंडळावर बाहेरच्या अधिका-यांचे वर्चस्व आहे. त्याच अधिका-यांकडून सुधारणा होईल अशी अपेक्षा होती. आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे नियोजन करतील असे वाटले होते. प्रत्यक्षात मात्र तसे घडताना दिसत नाही. भ्रष्टाचार व खाबुगिरीमुळे ही संस्था आर्थिकदृष्ट्या घसरत चालली आहे. आपण त्यांना अर्थसहाय्य करतो. इतक्या मोठ्या प्रमाणात करुन सुद्धा कशा प्रकारे त्याचा विनियोग केला जातो याचे ऑडीट त्यांनी केलेले नाही. आपण यासाठी त्यांच्यावर कधी दबाव आणला नाही. माझी आपल्याला, राज्य शासनाला विनंती राहील, त्यांना ऑडीट कंपल्सरी करावे. सदर विषयात ५ कोटी १७ हजार इतकी मागणी केलेली आहे. पुन्हा बस खरेदीसाठी पैशांची मागणी केली तरी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात १५० कोटींची अंदाजपत्रकात तरतूद

केलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य करतो. यापुढे जकात बंद होणार आहे. आपल्याला माहिती आहे. त्याचा आपल्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार आहे. जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून मागणी केलेली आहे. या प्रकल्पात आपले ३० टक्के सहकार्य असले तरी प्रत्यक्ष पाहणी केली तर खर्च ५० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. पीएमपीएलमध्ये पुणे मनपाचे ८,००० कर्मचारी आहेत. पीसीएमटीचे १२०० ते १४०० कर्मचारी आहेत. पीसीएमटी कर्मचा-यांचे आजपर्यंत प्रमोशन झालेले नाही. कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे. त्याला त्याचे पैसे मिळाले नाहीत. वैद्यकीय दृष्ट्या सहकार्य मिळत नाही. अनेक अडचणी निर्माण होतात. विद्यार्थ्यांसाठी मोफत बसपास योजना सुरु केली. त्यांची जबाबदारी दोन्ही महापालिकांनी उचलली होती. पीएमपीएल मार्फत सध्या पुण्यात काही योजना चालू आहे. पिंपरी चिंचवड शहरात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. सदस्यांनी अनेक वर्षे मागणी करुन सुद्धा प्रशासनाने ही योजना राबवली नाही. एवढे सगळे असताना ते आपल्याला दुय्यम स्वरुपाची वागणूक देतात. आपण त्यांना मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य करतोय. पुणे महापालिकते पीएमपीएलच्या विलिनीकरणाचा ठराव मांडण्यात आला आहे. पुणे महापालिका असा ठराव करु शकत असेल तर आपल्याला कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. तर आपण कोणाची वाट पाहायची आहे. आपल्या नागरीकांना, कर्मचा-यांना दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जात असेल तर त्यांनी इथून पुढे या सर्व गोष्टींचा विचार केला जावा. आपल्याला माझी विनंती आहे, मागील कामाचा आढावा घेतला तरी आपण कोणताही विषय समजून घेतल्याशिवाय निर्णय घेत नाही. पीएमपीएमबाबत काय करता, परस्पर सभागृहाची मान्यता न घेता निर्णय घेतला. पैसे सुद्धा दिलेत हे मान्य करता. हा सभागृहाचा निर्णय आहे. आमचा अधिकार आहे. आमच्या अधिकारावर गदा आणू नका एवढी नम्र विनंती करते.

मा.धनंजय आल्हाट – मा.महापौर साहेब, ज्या-ज्या वेळी पीएमपीएलचा विषय सभागृहात उपस्थित होतो, सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र होतात हा आजपर्यंतचा अनुभव आहे. सदस्यांनी मांडलेल्या भावनांची दखल प्रशासनाकडून घेतली जात नाही. तोचतोच प्रश्न त्या-त्या सभासदांनी पुन्हा-पुन्हा मांडला आहे. पठाणताईंनी प्रश्न उपस्थित केला. तो सर्वात महत्वाचा प्रश्न पीएमपीएलच्या जागा, पूर्वी आपल्या प्रवाही सेवेतील अतिरीक्त कर्मचारी २३० कर्मचारी यांना याठिकाणी हंगामी स्वरुपात रुजू करुन घेतले आहे. मा.आयुक्तांना सर्व कर्मचा-यांना पीएमपीएल मध्ये दाखल

करण्यासाठी उपाययोजना सुरु केली आहे. आढावा घेतला आहे. हे करत असताना आयुक्त साहेबांना माझी विनंती राहील की, ज्या पद्धतीने पीएमपीएलमध्ये पीसीएमटीचे विलिनीकरण झाले त्यावेळी आपले कर्मचारी तिथे विलीन झाले, त्यांना त्याठिकाणी कशा प्रकारची वागणूक दिली जाते याचा उल्लेख करणे गरजेचे आहे. आपण याठिकाणी बोलावे. खरेतर त्यांना सावत्रपणाची वागणूक तिथे दिली जाते. खाजगी ट्रान्स्पोर्ट कंपनीला काम दिले आहे. खरेतर आमचा मनुष्य काम करणारा असून सुद्धा निरुपयोगी ठरला आहे. त्यांना रात्र-रात्र मुक्काम करावा लागतो. सावत्रपणाची वागणूक दिली जाते. कर्मचारी निवृत्तीनंतरचे रेकॉर्ड तपासून पाहीले तर खरेतर जो मनुष्य पूर्ण आयुष्य त्या संस्थेच्या सेवेत व्यतीत करतो. निवृत्तीनंतर त्याला फार मोठी आशा असते. ग्रॅच्युईटी, प्रॉव्हीडंट फंड, उपदान निधी तरी निदान मिळावा या आशेने पाहत असतो. कुटूंब वाट पाहत असते. ६० कर्मचारी आहेत. कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसदारांना ग्रॅच्युईटी फंड मिळाला नाही. याच्यासारखे नाविण्य दुसरे नाही. सामान्यपणे जो कर्मचारी निवृत्त होतो, त्याला ग्रॅच्युईटी फंड मिळण्यासाठी कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. अधिका-याचे पाय धरावे लागतात. २ वर्षांत ग्रॅच्युईटी मिळत नाही. पगार मिळत नाही. अशी वागणूक कर्मचार्यांना मिळत असेल तर आपले २३० कर्मचारी सेवेत आहेत. त्यांना तिथे पाठवायचा खटाटोप चालला आहे तो अतिशय चूकीचा आहे. त्यांची आस्थापना पीएमटी नुसार आहे. २००४ नंतर ९ वर्षे ते महापालिकेत याठिकाणी सेवा करीत आहेत. आपल्या कर्मचा-यांना कोणत्याही प्रकारचे प्रमोशन, सेवासुविधा मिळत नाहीत. प्रशासनाने कोणत्याही प्रकारचा निर्णय न घेतल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला आहे. आयुष्यासंदर्भात परवड झाली असे म्हणतो. कृपया विलिनीकरणानंतर जो करार झाला, तो अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. अतिरीक्त कर्मचा-यांना महापालिकेत समाविष्ठ करुन घ्या. अत्यंत महत्वाचा मुद्दा असताना आपण या कर्मचा-यांना तिथे पाठवत आहोत. नियम निहाय आहे ते आयुक्तांनी समजून घ्यावे. ज्याठिकाणी पीएमपीएमएलच्या सेवांसदर्भात महेश दादांनी प्रश्न मांडला. आपण याठिकाणी दर महिना एवढी मोठ्या स्वरुपात निधी देतोय. त्यांची आपल्या भागात सेवा काय आहे. पिंपरी चिंचवड शहरातील सगळे बसथांबे फिरून पहावेत. आयुक्त साहेबांनी बीओटी तत्वावर सर्व जाहीरातीपोटी दिलेले आहेत. अनेक ठिकाणी बसथांबे उखडून पडलेले आहेत. कोणत्याही प्रकारचे सिमेंट कॉंक्रीट नाही. मातीत गाडलेले आहेत. पावसाचे पाणी येते. नागरीकांना येता येत नाही. बसस्टॉप सोडून ५० ते १०० लोक उभे असतात. आपला फार मोठा अपमान आहे. याची प्रशासनाने दखल

घेतली नाही. खरेतर याचे दुःख वाटते. अशी दयनीय परिस्थीती असताना पुढील हजारो वर्षांत आपले शहर सुंदर होऊ शकत नाही. बसथांबे बदलून चांगल्या प्रतीचे आले पाहीजेत. खरेतर बसची सुविधा हद्दीबाहेरच्या लोकांना चांगली सुविधा देतो. माझ्या भागात मोशी ते भोसरीपर्यंत लोक अक्षरशः लोंबकळून प्रवास करत असतात. महिलांना जागा मिळत नाही. विद्यार्थ्यांना जागा मिळत नाही. असा प्रवास नागरीकांना करावा लागतो, अत्यंत खेदाची बाब आहे. आयुक्त साहेबांना विनंती करतो, प्रत्यक्ष येऊन पहावे. सगळ्या बसथांब्यांची पाहणी करावी. एक सूचना करतो, संपूर्ण खर्चाचे ऑडीट करावे. समजून घ्यावे. सुविधा कशा प्रभावीपणे होतील अशी विनंती करतो.

मा.शांताराम भालेकर – मा.महापौर साहेब, पीएमपीएलबाबत बोलत असताना तळवडे एमआयडीसी विकसीत झाल्यानंतर निघोजे एमआयडीसी डेव्हलप झाली आहे. महिंद्रा कंपनीसारख्या मोठ्या कंपन्या डेव्हलप झाल्या आहेत. आय.टी. पार्कचे कामगार, तळवडे एमआयडीसीचे कामगार यांच्या येण्याजाण्याची सोय पीएमपीएमएलच्या माध्यमातून व्हावी अशी सातत्याने २/४ वर्षे पत्रव्यवहार केलेला आहे. तुम्हाला विनंती आहे, या परिसरातील लोकांची गैरसोय होते ती दूर व्हावी या दृष्टीकोणातून लक्ष घालावे. मोठ्या प्रमाणात वाढलेल्या निघोजे इथल्या कामगारांचा प्रश्न, तळवडे एमआयडीसीच्या कामगारांच्या येण्याजाण्याचा प्रश्न मार्गी लावावा.

मा.राजेंद्र जगताप – मा.महापौर साहेब, पीएमपीएमएलला आजपर्यंत मानधन देत आलेलो आहोत. ५ कोटी देण्याचे ठरवले आहे. दि.३/१२ रोजी पत्र दिले होते, नवीन रुट चालू करावा. त्यांनी दि.१४/१२ ला पत्र दिले. इथे २ बस कमी असल्यामुळे डबल चालू करु शकत नाही. अधिका-यांनी पाहणी केली नसताना, ८ ते ९ हजार लोकवस्ती असताना खोटे सांगितले. मी त्यांना ४ वेळा सांगितले. त्यांना लक्ष दिले नाही. रोज जवळजवळ ५० बसेस रोडवर चालू असतात. महिन्याला ५० बसेस डेपोत उभ्या असतात अशा पद्धतीने कारभार चालू आहे. आपल्या परिसरात बसरुट वाढवायची गरज आहे. त्यांनी सांगितले, आमचे कामगार कमी आहेत. नवीन बस खरेदी कराव्या लागतील. दि.१२/९/१२ रोजी पेपरमध्ये बातमी आले होती, ३०० बसेस डेपोमध्ये कामगारांविना पडून आहेत. एवढे असताना बसेस खरेदी करुन पडून असतील तर ड्रायव्हरांची नोकरभरतीसाठी एवढे पैसे देऊन सुद्धा जाहीरात दिली

पाहीजे. नवीन बसेसे डेपोत जात असतील तर कसा काय कारभार करणार. त्यांना कोणतेही मानधन देऊ नये.

मा.शेखर ओव्हाळ – मा.महापौर साहेब, मला विनंती करायची आहे की, बस नाही असे लोक मला म्हणतात. मा.गवळी साहेबांनी पत्र दिले होते. बस अजून चालू झालेली नाही. मा.जगताप यांनी सांगितले, बसगाड्या पडून आहेत. अर्धा तासाला एक याप्रमाणे बस दिलीतरी लोक समाधानी होतील याची दखल घ्यावी.

मा.नितीन लांडगे – मा.महापौर साहेब, आत्ताच याठिकाणी सहकारी मा.जगताप यांनी सांगितले, बस डेपोमध्ये पडून आहेत. भोसरीतून आकुर्डी स्टेशनपर्यंत ब-याच वर्षांपासून १० ते १२ हजार विद्यार्थी म्हाळसाकांत कॉलेज, डी.वाय.पाटील कॉलेज येथे जातात. त्यांची गैरसोय होते. भोसरी इथून कासारवाडी, तिथून पुढे रेल्वेने आकुर्डी इथे यावे लागते. २ वर्षे झाली अजूनपर्यंत यावर कारवाई केलेली नाही. पीएमपीएमएलचा डेपो सदगुरु नगर इथे प्राथमिक सुविधा, स्वच्छतागृह, कर्मचा-यांसाठी विश्रांतीगृह याची वानवा असून सुद्धा त्याची दखल घेतली जात नाही.

मा.जावेद शेख – मा.महापौर साहेब, डेपोत बसेस असतात. आपल्या पिंपरी चिंचवडची लोकसंख्या १५ ते १७ लाख असताना कमीत कमी ३५० ते ३७५ बसेस शहरात पाहीजेत. महत्वाचा मुद्दा आहे. २५० बसेस निगडी बसडेपोला आहेत. बाहेरच्या भागात बसेस लागतात. त्या निश्चित कमी पडतात. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी बस कमी पडत आहेत. मा.शांताराम भालेकर यांनी सांगितले, आय.टी. पार्कमध्ये जाणारे भरपूर लोक आहेत. हिंजवडी इथे अनेक समस्या आहेत. बस खरेदीसाठी निधी देणार आहोत. माझी विनंती राहील की, पीएमपीएल बरोबर पुढील मिटींगमध्ये १०० बसेस खरेदी करुन घ्याव्यात. निश्चितच आपल्या भागात शहरात नागरीकांची गैरसोय होते. लोकांच्या तक्रारींचे निवारण करावे अशी विनंती करतो. पुढील मिटींगमध्ये हा प्रस्ताव ठेवावा. १०० बसेस वाढवण्याचा प्रयत्न करावा.

मा.निता पाडाळे – मा.महापौर साहेब, काळेवाडी भागातून शाळा, कॉलेजसाठी जवळपास ५ ते ६,००० विद्यार्थी जात असतात. बसस्टॉपला पाट्या लावल्या आहेत. बसस्टॉपच नाही. बीआरटी बद्दल २/३ वर्षांपासून ऐकतोय. तिथे ज्येष्ठ नागरीक असतात. उन्हात उभे रहावे लागते. स्टॉपला बस थांबत नाही. ज्येष्ठ नागरीक, महिला, लहान मुले यांना पळत जाऊन बस पकडावी लागते. बसस्टॉपची अवस्था

दयनीय आहे. मा.गवळी साहेब म्हणतात, आमचे काम नाही. पीएमपीएलच्या पास केंद्रांसाठी जागा सोडली आहे. पाहून गेले, त्याचा अजून काहीच फॉलोअप केलेला नाही. पत्रव्यवहार केलेला नाही. काळेवाडी भागातून ब-याच महिला पुण्यात जातात, कॉलेजला जातात, कामाला जातात. सकाळी ७ वा. महिलांसाठी एक बस सुरु करावी. थंडीत अंधाराच्या वेळी महिलांना येता-जाताना त्रास होतो. रोडवर उभे रहावे लागते, त्यांची छेड काढली जाते. त्यांच्यासाठी काळेवाडीतून स्वतंत्र बस असावी.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, आपल्याला, सभागृहाला विनंती आहे. पैसे देतोय ते थांबले पाहीजे. आपल्याला दुःख होते. पीएमपीएलचे लोक ऐकत नाहीत. ज्या मिटींगला आयुक्त साहेब, महापौर साहेब असता, आमचे म्हणणे, आपले मत तिथे तुम्ही आग्रहाने मांडा. इथे आपली व्यथा बोलत बसलो असलो तरी तिथे पैसे पुरवले गेले आहेत. सभागृहाचा वेळ घालवला आहे. १ ते २ मुद्दे घ्या. या विषयावर बोलण्यात अर्थ नाही.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, मुळात पीएमपीएमएल या बाळाचा जन्म का घातला? २००७ मध्ये सभागृहात पीसीएमटीच्या कामगारांचा विषय आला, त्यावेळी आम्ही ठामपणे विरोध केला होता. सभागृहात सत्ताधारी पक्षाने प्रामुख्याने त्यांच्या नेत्यांच्या आदेशानुसार याचा जन्म प्रामुख्याने घातलेला आहे. आज सभागृहात विरोध करताय. आपल्या अगोदरच्या आयुक्त श्री.शर्मा यांनी सभागृहात सांगितले होते, आपली जबाबदारी २०१२ पर्यंत आहे. पीएमपीएलला पैसे देताना २०१३ च्या अंदाजपत्रकात कोणत्याही प्रकारची तरतूद केली जाणार नाही. पीएमपीएमएलला एक दमडी सुद्धा महापालिकेकडून दिली जाणार नाही असे निवेदन आयुक्त साहेबांनी केले होते. २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात ३८ कोटींची तरतूद ठेवलेली आहे. सभागृहात सत्ताधारी पक्षाच्या सदस्या मा.शमिम पठाण यांनी सांगितले, ४६० कोटी रुपये आजपर्यंत देण्यात आले आहेत. पीसीएमटी, पीएमटीचे एकत्रिकरण होण्याअगोदर महापालिकेने पीसीएमटीवर जवळपास १७२ कोटी खर्च केला आहे. कै.आण्णासाहेब मगर यांनी त्यांच्या कालावधीत वाहतूक व्यवस्था फायद्यात आणली होती. नंतरच्या कालावधीत पाहीले तर शहराच्या कार्यक्षेत्रात वाढ केली तशी पीसीएमटी लॉसमध्ये चालत गेली. ज्यावेळी महापालिकेच्या सभागृहात विषय आला त्यावेळी एकत्रिकरणाचा, खाजगी कंपनी करण्याचा विषय आला. त्यावेळी आमचे ज्येष्ठ सहकारी मा.योगेश बहल महापौर होते. त्यांच्या कालावधीत आवाज उठवला. आपण

त्याच अधिकृत संस्थेचे महापौर या नात्याने त्यावेळी आवाज उठवला. आपण सध्या सदस्य आहात. आपणदेखील सभागृहात आवाज उठवला. आपल्या पक्षाचे सर्वजण सदस्य पीएमपीएमएलच्या विरोधात बोलतात याचा अर्थ आपलेदेखील तिथे ऐकून घेतला जात नाही. सन्मा. अधिकारी ऐकत नाहीत. शहराला दुजाभावाची वागणूक दिली जाते. मध्यंतरीच्या कालावधीत पीएमपीएमएलमध्ये रोजंदारीवर भरती करण्यात आली होती. त्याचा भाव ५०,०००/- फूटला होता. संबंधित अधिकारी/ कर्मचारी असला तर त्यांच्या मुलाखती घेतल्या. मेरीटमध्ये कर्मचारी लागले आहेत हे मी अधिकृतपणे बोलतोय. संबंधित नावे पाहून सांगितले जाते, तुझे काम करतो, सिलेक्शन होईल. रोजंदारीवर काम करतो, त्याच्याकडे पैशांची मागणी करतात. पुण्याची ६० टक्के, पिंपरी चिंचवडची ४० टक्के नावे आहेत. आपण यांना २०११ मध्ये शंभर टक्के निधी देऊन टाकला होता. पुणे मनपाने ३७ कोटी दिले नव्हते. असे असताना पुणे महापालिकेच्या हद्दीत त्यांच्या रोडवर जास्त गाड्या धावतात. पिंपरी-चिंचवडच्या हद्दीत जुन्या गाड्या, त्या बंद पडतात. आमच्या हद्दीत एकदेखील बसस्टॉप चांगला दिसत नाही. काय अवस्था आहे. पैसे वेळेवर दिले जातात. कार्यकर्त्यांना, विद्यार्थ्यांना, पत्रकारांना मोफत बसपास सेवा मध्यंतरी चालू होती ती पण बंद केली आहे. आपले काहीच चालत नाही. आपले प्रतिनिधी मा.महापौर, मा.स्थायी समिती अध्यक्ष तिथल्या कमिटीवर असून सुद्धा ते आपली बाजू मांडत नाहीत. असे मला स्वतःला वाटते. म्हणून चर्चा होते. कार्योत्तर मान्यतेचा विषय असले तर, पैसे देत असलो तर हे विषय सभागृहात आणायची गरज काय? मा.शमिम पठाण यांनी सांगितल्याप्रमाणे या संस्थेचे लेखापरिक्षण होत नाही. करदात्यांचा पैसा आपण देतो. अंदाजपत्रकात तरतूद ठेवतो. ही संस्था चालू झाल्यापासून २०१२ पर्यंत आपण त्यांना मदत करणार होतो. तिथून पुढे पैसे देणार नाही. आपण एकदाच पैसे देऊन टाका अशी भूमिका आयुक्तांनी मांडली. सत्ताधा-यांमुळे आज या संस्थेचे ओझे खांद्यावर घेतोय. चुकीचे संदेश शहरातील नागरीकांमध्ये जातात. चुकीच्या पद्धतीने अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे. राज्य शासनाने सांगितले असले तरी त्यांच्या निदर्शनास आणून दिले पाहीजे. पीएमपीएमएल ही स्वतंत्र कंपनी आहे. आपली जबाबदारी नाही. राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे जबाबदारी पार पाडली आहे. महापालिकेच्या वतीने शंभर टक्के अनुदान दिलेले आहे. शासनाच्या सूचनेप्रमाणे २०१२ नंतर पिंपरी चिंचवड महापालिकेकडून कोणतेही अनुदान दिले जाणार नाही. कंपनी तयार करताना साफ सांगितले होते. असे असताना तुम्ही या वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करतोय. हा कुठेतरी

सभागृहाचा अवमान होतो आहे हे पाहिले पाहीजे. शहरात असणारे सगळे बसस्टॉप चांगल्या स्थितीत करावेत ही जबाबदारी आपण घेतली पाहीजे.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, पैसे जरी दिलेले आहेत. मला वाटते पीएमपीएमएलकडून पिंपरी चिंचवड शहराला सावत्र आईची ट्रिटमेंट देतात. प्रत्येक गोष्ट आहे. बस असू द्या, रुटस् असू द्या. पीसीएमटीचा कामगार असू द्या. कोणताही विकास नाही. ज्या ज्या वेळी ठराव येतो, त्या वेळी सगळे नगरसेवक त्याचे मत मांडतो. १९९६-९७ मध्ये आदरणीय आमदार सुतार असताना मंत्रालयात चर्चा झाली होती. त्यानंतर १० वर्षे लागली. याच नात्याने सुरुवात करायला सांगीतली यात शंका नाही. कोणाला माहिती डिपार्टमेंट असा त्रास देणार. नवरा-बायको एकत्र येऊन चांगले जीवन जगणार. त्यांच्यात पटत नसेल तर काय करणार? घटस्फोट. डायव्र्हट करण्याशिवाय दुसरा चांगला उपाय नाही. आम्हाला पूर्वीचीच पीसीएमटी चालेल. आमचे लोक होते, मंडळ होते. आपले तीन प्रतिनीधी समितीत आहेत. नोकरभरतीत आमचे लोक का लागत नाहीत. असा नियम नाही. ही सुद्धा काळजी घेतली पाहीजे. पुणे-मुंबई रोडवर किती बसस्टॉप आहेत, एकही नाही. सुविधा पाहीजेत. माझ्या भागातून डायरेक्ट ५ रुट बंद केले. शटडाऊन दिले. पब्लिक ट्रान्सपोर्ट सिस्टीम फक्त प्रायव्हेटसाठी काम करतो. कोणत्या लोकांसाठी काम करतात. काही रुटमध्ये जास्त बस धावतात, काही ठिकाणी मिळतही नाही. ५ वर्षांपासून विनंती करतोय. १० ते १५ वर्षांपासून रुट आहे. तो सुरु करा पण काही उपयोग नाही. आकुर्डी स्टेशन ते भोसरी कित्येक वर्षे मागणी चालू आहे. तो बंद केलेला आहे. तुमच्या चेअरमनशीप खाली सर्वपक्षीय सल्लागार समिती स्थापन करा. नगरसेवक लोकांचा प्रतिनिधी तिथे असू द्या. महिन्यातून एकदा मिटींग घ्या. आमचे विषय,प्रॉब्लेम तिथे मांडण्याविषयी विनंती आहे. आपले कर्मचारी आपल्याकडे काम करतात, त्यांना आपल्याकडे वर्ग करुन घ्या. पुन्हा पीएमपीएमएलमध्ये काम करु शकणार नाही. १० वर्षांत त्यांना मोटर मेकॅनिकचे काम केले नाही. आत्ता विद्युतमध्ये काम करतात. त्यांना आपल्याकडे वर्ग करुन घ्या अशी विनंती आहे. बसस्टॉप लवकरात लवकर सुरु करावेत. पठाणताईंचे आभार मानतो. त्यांनी या विषयावर माहिती दिली. एवढ्या मोठ्या संस्थेचे ४/५ वर्षांत ऑडीट नाही. आपल्या लोकांसाठी चांगली सेवा देण्यासाठी पिंपरी चिंचवड दर्शन बस सुरु करा. पीएमपीएल कॅन्सल करुन पूर्वाश्रमीची पीसीएमटी येऊ द्या म्हणजे आपल्याला पाहीजे ते बसरूटस् मिळतील.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, वर्षानुवर्षे, दर वेळेला जेव्हा जेव्हा हा विषय पुढे येतो, त्यावेळी प्रत्येक सदस्याच्या भावना तीव्र असतात. नागरीकांना चांगली सेवा मिळावी म्हणून पब्लिक ट्रान्स्पोर्ट चांगले असावे अशी अपेक्षा असते, मागणी असते. पीएमपीएलच्या स्थापनेनंतर हे अपेक्षित काम होते. शहरात सेवा मिळावी ती पूर्ण होत नाही. विरोधी पक्ष सदस्य बोलत असताना टिका करतात. राष्ट्रवादी, काँग्रेसने कंपनी स्थापन केली, खरेच आहे. परंतू सभागृहाला याठिकाणी सांगू इच्छितो की, पीसीएमटी व पीएमटीचे विलीनीकरण का झाले. पीसीएमटीचा विषय सभागृहात जेव्हा यायचा, त्यावेळी अशाच पद्धतीने सदस्य बोलत असायचे की यांना पैसे देऊ नयेत. अनेक ज्येष्ठ सदस्य अशाच पद्धतीने त्यावेळी पीसीएमटीला विरोध करायचे. सगळ्यात महत्वाचा विषय नागरीकांना ट्रान्सपोर्ट सुविधा देताना वार्षिक उत्पन्नाचे धोरण नाही. पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही शहरांमध्ये एकत्रितपणे चांगली सेवा द्यायची आहे. पूर्वी वेगळे होते. त्यावेळी एकाच वेळी दोघेही बस वाढवायचे. मोठ्या प्रमाणात नुकसान व्हायचे. दोन्ही एकत्र आल्यानंतर तेव्हापासून नुकसान कमी होते आहे. मनपाला कमी पैसा द्यावा लागतो आहे. सगळ्यांत महत्वाचा मुद्दा एवढ्या मोठ्या प्रमाणात ऑफीसेस एकत्र केल्यामुळे मोठ्या प्रमाणात पैसा आला. दोन्ही महापालिकांना याच नात्याने प्रयत्न केल्यामुळे चांगल्या प्रकारच्या सुविधा निर्माण झाल्या. दुस-या बाजुने आमची अपेक्षा होती. पीसीएमटी कर्मचा-याला दुय्यम वागणुक देऊ नये. अनेक अधिकारी सक्षम आहेत. त्यांना प्रमोशन दिले जात नाही. सावत्रपणाची वागणूक दिली जाते. रिटायर्ड झाल्यानंतर पैसे मिळत नाहीत. पूर्वी मिळत होते. या गोष्टीकडे महापौर, स्थायी समिती अध्यक्ष तुम्ही मिटींगला असता. तुम्ही हे मुद्दे मिटींगला ख-या अर्थाने उपस्थित केले पाहीजेत. अशा प्रकारची सुविधा निर्माण व्हावी. मा.नितीन लांडगे यांनी मुद्दा उपस्थित केला की, भोसरी-आकुर्डी रुटची अनेक वर्षांची मागणी असून सुद्धा हा रुट चालू केला नाही. संबंधित अधिका-याला विचारणा केली पाहीजे. इथून पुढील काळात कोणत्याही विषयाचे राजकीय भांडवल करु नये. निर्णय घेत असताना जरी विरोध केला असला तरी सर्वांनी मिळून शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातून निर्णय घेतला आहे. नागरीकांना अधिक चांगल्या पद्धतीने सुविधा कशी मिळेल या दृष्टीकोणातून प्रयत्न करावेत. पिंपरी चिंचवड शहराला प्रमुख जबाबदार अधिकारी वेगळा मिळावा ही अनेक दिवसांची मागणी आहे. लोकांना जास्तीत जास्त फॅसिलिटीज मिळाव्यात अशी अपेक्षा आहे. ही अपेक्षा पूर्ण व्हावी.

मा.झामाबाई बारणे – मा.महापौर साहेब, आज या विषयासाठी ४६० कोटी देतोय. गाड्या कमी पडतात. एवढी रक्कम आपण देत असताना अशी दूरावस्था का होत असते. ज्या ज्या ठिकाणी अत्यंत गरज आहे, भोसरीसारख्या ठिकाणी आमदार, महापौर नेतृत्व करत असताना मा.नितीन लांडगे, मा.महेश लांडगे असतील, तेथे बसस्टॉप सुद्धा नाही. केवढा दुर्देवी अवस्था आहे. बस डे साजरा केला. सर्व शहरात साजरा केला तरीसुद्धा अनेक त्रुटी जाणवतात. एवढी रक्कम देत असताना शहरात सर्वच बाजूने बसस्टॉपची कमतरता जाणवते हे सदस्यांना सांगितले. अनेक ठिकाणी अडचणी आहेत. मेन रुटवर बस पळतात. अंतर्गत रस्त्यांवर नाहीत. अपंग, वयोवृद्ध लोकांना १ कि.मी. अंतरावर बसस्टॉप गाठायला वेळ लागतो. त्यांच्यासाठी अंतर्गत रस्त्यांवर मागणी असेल तिथे गाडी जात नाही. मी स्वतः ४/५ महिने झाले पत्र दिले त्याचे उत्तर मिळाले नाही. भरणा होणार नसेल तर तिथे गाडी जाणार नाही अशी परिस्थीती असेल तर आपण पैसे का द्यायचे? गाड्या अंतर्गत रस्त्यांना जात नाहीत. खरेतर याचा गांभिर्याने विचार केला पाहीजे. अनेक ठिकाणी त्या ठिकाणचे रहिवासी आहेत. अपंग विद्यार्थ्यांनी बस दाखला मागीतला. त्यांचा रहीवास कुठे आहे असे विचारले तर एवढी रक्कम देतोय. अंध अपंगांसाठी महिला बालकल्याण मधुन बचतगटांसाठी एवढ्या रकमा देतो. अपंगाना मोफत सुविधा मिळाली पाहीजे. त्यांची अडवणूक केली तर एवढी रक्कम देऊन उपयोग काय? गंभीर बाब आहे. खर्च लक्षात घेतला पाहीजे. थेरगाव गावठाणात बस चालू झाली पाहीजे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे–मा.महापौर साहेब, याठिकाणी आपण खरेतर पीएमपीएमएल ला पैसे देत असताना चर्चा होते. अंदाजपत्रकावर जेवढी चर्चा होत नाही तेवढी पीएमपीएलवर होत असते. माझी विनंती आहे, मा.योगेश बहल यांनी मुद्दा मांडला आहे. स्थायी समिती मेंबर पीएमपीएलच्या मिटींगला हजर असतात, त्याचे आऊटपुट काय निघते? त्यात नेमके काय घडते कळत नाही. पीएमपीएलचे अधिकारी पुणे महापालिकेच्या स्टँटींग कमिटीत हजर असतात. आपल्याकडे गुरुवारी येतात. त्यांच्याबरोबर दर महिन्याला मिटींग घेतली तर बरे होईल. खरेतर आपण आज वेळ घालवतोय. प्रत्येक वेळी बोलत असतो. त्याचे काहीच होत नाही. बस येत नाही. बसस्टॉप नाही. मेगामार्ट इथून सीएमईमधून गेलेल्या रोडवर पत्राशेड आहे. बसस्टॉप दिलेला नाही. वाचनालयाचे टेंडर आहे. पेपर वाचण्यासाठी असतात. बसस्टॉप बसवावा म्हणून मागणी केलेली आहे. बोपखेलमध्ये बसस्टॉपला जागा नाही. वाचनालयाच्या शेडमध्ये बसस्टॉप म्हणून नाईलाजाने वापरत आहेत.

धोरणात्मक निर्णय आहे. बसस्टॉप बसवायाचा नसेल तर असे ठरवले असेल तर ते सांगावे. कुठे बसवायचे असतील तर ते स्पष्ट करावे. पैसे देण्याविषयी सावत्रपणाची भूमिका ही वस्तुस्थिती आहे. याबाबत पुणे महापालिकेत सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीच सत्ता हे. त्यांना झुकते माप का दिले जाते याचा सदस्य या नात्याने विचार करुन निर्णय घ्यावा.

मा.संजय काटे– मा.महापौर साहेब, आत्ता मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी सांगितले. वाचनालय उघडून दिले आहे. पर्यायी व्यवस्था करुन टाकली आहे. जबाबदारी घ्यायला कोणी तयार नाही. आम्ही त्यांना आश्वासन दिलेले आहे. आपल्याकडे जबाबदारीचे भान दिसत नाही. त्याचप्रमाणे पूर्वी पीएमपीएल स्थापन होण्यापूर्वी दोन वेगळ्या संस्था होत्या. बोपखेल विभागात मिलिटरी हद्द आहे. बेटासारखे गाव आहे. सार्वजनिक सुविधा करणे अवघड आहे. तरीसुद्धा पीएमटी बसेस १९९५ पासून धावत होत्या. २००७ पासून दापोडी ते पुणे स्टेशन या रुटवर बोपखेल सीएमई करिता बस चालत होत्या. पीएमपीएल झाल्यापासून हा रुट बंद केला आहे. नागरीकांनी रुट चालू करण्यासाठी प्रयत्न केला. तेव्हा सांगितले, सीएमईच्या जागेत रुट चालू करुन देऊ शकत नाही. आपल्याला विनंती आहे, बोपखेलच्या नागरीकांची गैरसोय दूर करावी. दापोडी-बोपखेल या भागासाठी बस सुरु करावी.

मा.सिमा सावळे – मा.महापौर साहेब, याठिकाणी पीएमपीएलचे श्री.अष्टेकर आलेले आहेत. ते खूप बिझी असतात. कधीही फोन केला तर उचलत नाहीत. दोन/चार दिवस सलग फोन करायचा. त्यांना विचारायचे मिटींगमध्ये आहात का? त्यांना बोलायला, एसएमएस करायलाही वेळ नसतो. आज सभागृहापुढे विषय आणला आहे. उमेदमान्यतेवर रकमेचे समायोजन करण्याचा विषय आहे. पैसे दिलेले आहेत. असे विषय आणताना ज्यावेळी रक्कम दिली. २०१२ पर्यंतच रक्कम देण्यात येईल असे सांगितले होते. कर्मचा-यांचे पगार दिलेच पाहीजेत. आवश्यक आहे. तसे आपण स्पष्टीकरण केलेले आहे. म्हणून रक्कम दिली. हे लक्षात आणून द्यायचे आहे की पुणे ६० टक्के / पिंपरी चिंचवड ४० टक्के असा आपला रेशियो होता. २००७ मध्ये ३२७ बस चालवायला घेतल्या होता. प्रायव्हेट लोकांकडून बस चालवायला दिल्या त्यावेळी ६०/४० असे प्रमाण का केले नाही? त्यात पिंपरी चिंचवड कुठे आहे? मी तुम्हाला खाजगी कॉन्ट्रॅक्टरची यादी वाचून दाखवते. (यादीचे वाचन केले.) यात पिंपरी चिंचवड का नाही? ६०/४० असा रेशियो ठरवलेला असताना कोणतीही

निविदा निघू द्या, त्यात अटी घातलेल्याच असतात. कंपनी कंपनीच्या नियमांप्रमाणे चालवताना त्यात फायदा-तोट्याचा विचार केलाच पाहीजे. तो विचार करत नाहीत. विचारले तर उद्धटपणाची उत्तरे देतात. भांडायला वेळ नसतो. अनुकंपा तत्वावर ज्या महिला भगिनींचे पती अपघातात गेलेले असतील त्यांना ५/६ वेळा त्यांच्याकडे हेलपाटे मारायला लावतात. सकाळपासून उपाशीपोटी बसलेल्या असतात. त्यांना तिथे भिका-यासारखी वागणूक दिली जाते. त्यांच्या कागदपत्रांची दखल घेत नाहीत. ६० टक्के /४० टक्के याचा अर्थ काय? कायदा कुठे आहे? महिला चार वेळा भिक मागायला येतात. यासाठी सुद्धा कायदा असला पाहीजे. कर्मचा-यांचा पगार या गोष्टी समजू शकतो. त्यासाठी प्रशासनाला २५० कोटी देतो. ते दान करतो का? त्यांनी रेट सांगितले, ते जवळपास रु.४४/- प्रति कि.मी. इतका रेट का देतो? जोशी साहेबांनी सांगितले आहे, त्यांना ड्रायव्हरला १६ ते १७ हजार इतका पगार द्यावा लागतो. एवढा पगार ड्रायव्हरला देत असाल तर त्याने म्हणेल ती शिफ्ट घेतली पाहीजे. ५/६ हजारांसाठी देत नाही. कृष्टरोग झाल्यासारखे आपल्या कर्मचा-यांकडे पाहतात. कर्मचा-यांना कर्जासाठी आर्थिक मदत करत नाहीत. आपली मानसिकता आहे. यांना त्याचे काहीच वाटत नाही. त्यांना प्रश्न विचारलेला नाही. विचारला तरी ही आमची कंपनी आहे. आम्ही तुम्हाला उत्तर देणे लागत नाही. तुम्ही प्रश्न विचारू शकत नाही, अशी वेगवेगळी उत्तरे देतात. अष्टेकर हे अत्यंत उद्धट अधिकारी आहेत. जोशी साहेबांचा अनुभव आपण सगळ्यांनी घेतलेला आहे. त्यांच्या वरचढ अष्टेकर आहेत. त्यांना इथे बसायची वेळ का आली? आमच्या प्रश्नांची उत्तरे नक्कीच दिली पाहीजेत. आपण मला बोलायला संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानते.

मा.मंदा आल्हाट – मा.महापौर साहेब, पीएमपीएलचा विषय आला आहे. दरवेळी पत्रव्यवहार करुन सुद्धा आमचा विषय होत नाही. राजगुरुनगर ते सेक्टर नं. ४,६,९ व ११ येथे बससेवा व्हायला पाहीजे आहे.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, पीएमपीएलच्या बाबतीत आमच्या सगळ्यांच्या भावना लक्षात घेऊन त्या समजतीलच हे निश्चित नाही. त्यात लक्ष घालून सुधारणा करण्यात यावी याबद्दल दुमत नाही. याचविषयी मला सांगायचे आहे की, आपण त्यांना दरवर्षी पैसे देतो, त्याऐवजी त्यांच्या रिझर्वेशनच्या जागा आहेत. आपण त्यांना जागा देऊ केलेल्या नाहीत. जवळ जवळ २० ते २५ हेक्टरचे टर्मिनसचे रिझर्वेशन आहे. तेथे अतिक्रमण होऊ लागले आहे. पीएमपीएलला त्या

जागा द्या. त्या जागा बीओटी पद्धतीने डेव्हलप करुन तिथे वेगवेगळे उपक्रम राबवले तर पीएमपीएलला तिथून आर्थिक फायदा मिळू शकतो. तिकीट विक्रीशिवाय त्यांना दुसरे कोणतेही उत्पन्न नाही. ट्रान्सपोर्टेशन कधीही फायद्यात येईल अशी अपेक्षा करण्याची गरज नाही. पीसीएमटी असताना सुद्धा तोट्यातच होती. त्याची कारणे अशीच होती. आपले ते बाळ लोकाचे ते कार्टे अशीच सर्वसामान्य माणसाची भूमिका असते. सर्वात वाईट या गोष्टीचे वाटते की, आपल्या लोकांना कोणीतरी त्रास देतो आहे. म्हणून जास्त वाईट वाटते. त्यासाठी उपाययोजना केल्या पाहीजेत. ही सुविधा आपल्याला बंद करता येणार नाही. काही रिझर्वेशन्स त्यांच्या ताब्यात दिले तर, ते डेव्हलप करायचा त्यांना अधिकार दिलातर निश्चितपणे आर्थिक स्त्रोत चालू राहील. आपल्याला द्यावा लागणारा पैसा द्यावा लागणार नाही. विरोधी पक्षाचे लोक उगाचच ओरडतात, असे अष्टेकर, गवळी म्हणतात. आम्ही उपाययोजना सांगतो यात कोणताही स्वार्थ नाही. जनतेचा पैसा आहे तो तुम्ही एकत्र घेतला पाहीजे. वर्ग करायची कोणाची भावना आहे. ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या पाळल्या गेल्या नाहीतर नुसताच पैसा द्यायचा का? पदाधिका-यांचे ऐकून घेतले जात नाही. बाहेरचा माणूस हे ऑपरेट करतोय. याची आम्हाला निश्चित जाणीव आहे. मी स्वतः महिन्यातून एकदा उर्से इथे दर अमावस्येला निगडी परीसरातून उत्सवासाठी जात असते. तेवढा एक दिवसतरी बस उपलब्ध करुन द्या. यासाठी आजपर्यंत उत्तर देण्यात आले नाही. आमच्या घरातील प्रश्न मांडत नाही. आरक्षणातील जागांची लिस्ट माझ्याकडे आहे. यावर विचार केलातर निश्चितपणे काहीतरी उत्पन्नाचा स्त्रोत होऊ शकतो.

मा.अनंत को-हाळे – मा.महापौर साहेब, पीएमपीएलला बस खरेदीसाठी निधी देतोय. काही दिवसांपूर्वी अर्ज दिला होता. अंतर्गत रस्त्यावरुन बस रुट करावा. जसे मा.झामाबाई बारणे ताई बोलल्या त्याप्रमाणे स्वतः अधिकारी आले होते. याठिकाणी जागा नाही, जागा कमी आहे. बरीच कारणे सांगीतली. बसेस या कोणाच्या विचारातून खरेदी कराव्यात. अंतर्गत रस्त्यासाठी मिनी बस खरेदी करावी. त्यांचा सुद्धा हक्क आहे. प्रवास करण्यासाठी मोरया हॉस्पीटल पासून चाफेकर चौकातून बस जाण्यासाठी तीस ते चाळीस रुपये द्यावे लागतात. याचा विचार करावा अशी विनंती करतो.

मा.मंगलाताई कदम – मा.महापौर साहेब, अष्टेकर साहेब सन्मा. सदस्यांच्या भावना तुमच्यापर्यंत पोहोचल्या असतील असे मनापासून वाटते. याचे कारण आहे नगरसेवकांनी निवडून आल्यानंतर एक वर्ष झाले. पीएमपीएलच्या नावाने मंजूर शब्द उच्चारून, जरी त्याला विरोध केला असला तरी कुठे ना कुठेतरी ६०/४० या रेशियोप्रमाणे पैसे न देता तसेच पैसे सुद्धा दिले आहेत याचे वाईट वाटते. पीसीएमटी असताना सुद्धा हेच काम करत होतो. दरवर्षी महापालिकेत कुठेतरी वाटते आम्हाला कुठेतरी सावत्रपणाची भूमिका देता मग पैसे देताना प्रत्येक वर्षी टक्केटोणपे मारले तरीसुद्धा अशी भावना झाली आहे की, आपण आपल्या कामगारांना प्रत्येक वेळी पैसे देताना सभागृहात अशी चर्चा करतो. एक महिन्यापूर्वी पत्र दिलेले होते. पीएमपीएलसाठी शहरामध्ये ऑफीससाठी जागा द्या. नगरसेवकांच्या तक्रारी सोडवायला तिथे जातील. दर गुरुवारी महापालिकेत महापौर कार्यालयात मिटींग घेतो. वर्कींग अवर्समध्ये काम करतील त्यांच्या अडचणी सोडवल्या पाहीजेत. त्याच माध्यमातून खरेतर आयुक्त साहेब ऑडीट सुद्धा केलेले नाही. ब-याचशा गोष्टी आहेत. अनुकंपा तत्वावर घेण्याचा विषय मिटींगमध्ये ठेवला. जवळपास पाच महिने झाले, त्या बायकांना नोक-या देऊ शकलो नाही. तुमच्याकडे पाठवतो. खरेतर मिटींगला विषय घेताना संबंधितांनी पहिल्यांदा अनुकंपा तत्वाचे विषय प्राधान्याने घेतले पाहीजेत. नंतर नवीन भरतीचा विषय घ्यावा. कुठेतरी न्याय दिला जाईल. ब-याचशा कंपन्या उत्सुक आहेत. त्यांचा विचार करुन बसस्टॉप टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरासाठी वॉर्डातील नगरसेवक पदाधिकारी यांची इच्छा असेलतर त्यांच्या वॉर्डात चांगला बसस्टॉप बांधू शकतो. ते बांधण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत. आपले नागरीक आहेत. आपण ज्यांची क्षमता नाही त्यांना काम करायला सांगतो. त्यांना बोलवून उपयोग होईल असे वाटत नाही. कुठेतरी प्रयत्न केले पाहीजेत. बसेस स्वच्छ नसतात. मी वाघेरेंना नेहमी फोन करते. अक्षरशः गौरी पूजनाच्या दिवशी पुण्यातून येताना बस फेल झाली. बायकांना घरी यायला १० वाजले. त्यांनी याची पर्यायी व्यवस्था करायला पाहीजे होती. इथे येणा-या बसवर खास पिंपरी चिंचवड असे नाव टाकून घ्या. बसेस कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर देऊन टाका. सहका-यांनी सांगितले आपल्याकडील जागा पीएमपीएलला द्या. मी तर म्हणेन साहेब जागा मुळीच देऊ नका. बस व्यवस्थेचे विलीनीकरण केलेतरी काय झाले? जागा दिल्यातर डबल त्रास होईल. डेक्कन जिमखान्याला आधुनिक सुविधा चालू केलेल्या आहेत. बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये ज्या-ज्या जागा आहेत तिथे चांगल्या पद्धतीने आपण डेव्हलपमेंट करावी ही या प्रसंगी विनंती करते. लोकांची हीच मागणी

आहे. मा.दत्ता साने यांना बोलायचे आहे. त्यांचे म्हणणे आहे, सिग्नल शेजारी दहा फूटांवर बसस्टॉप आहे. येथे बारीकसारीक गोष्टी होतात. तुम्हाला आधी वाईट वाटले असेल. बसस्टॉप चांगल्या पद्धतीने करावा ही विनंती आहे. वयोवृद्ध, रिटायरमेंटला आलेले कर्मचारी यांना पुण्यात जाऊन थम्ब करावे लागते. राऊत नावाचा मनुष्य असा आहे, त्याची तब्येत अशी आहे तो कुठेही फिट नाही. माहिती अधिकारात काम केलेच पाहीजे. कुठेतरी सहकार्य करायला पाहीजे. काम न करणे योग्य नाही. त्याचे दुखणे चालूच राहते. पीएमपीएलकडे प्रॉफीट म्हणून बघत नाही. पाणीपुरवठा, शिक्षण मंडळ असेल तरी प्रॉफीट बघत नाही. धंदा केल्यावर प्रॉफीट मिळतोच. असा एकही धंदा नाही. गव्हर्नमेंट सुविधा आहे म्हणून सगळे चालते. आलबेलमध्ये चालते. उत्पन्नाची साधने म्हणून काय आहेत हे सगळ्यांना माहिती आहे. कोणाकोणाची निती कुठे वळते. पदाधिका-याचे गटस् कुठपर्यंत जातात. डिझेल, पेट्रोलचा खर्च किती आहे, तो तुम्ही तुमच्या कानाने ऐकला व पाहीला आहे. ऐकण्यासाठी इथे आलात. किरकोळ मागण्या मान्य करा. स्वच्छ बसेस द्या. नागरीकांची प्रामाणिक इच्छा आहे. हा विषय मंजूर करावा अशी विनंती करते.
यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र. २१८ दि.२०/०२/२०१३

मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ, ब, क, ड प्रभागासाठी चार

पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मिती करणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट अ प्रमाणे ७८ पदे, परिशिष्ट ब प्रमाणे २८ पदे अशी एकूण १०६ पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती आगावू (Advance Payment) च्या स्वरूपात मनपाने करावयाची असून ही बाब विचारात घेता अ)प्रस्तावात नमुद शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि मनपासाठी अनुज्ञेय असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणा-या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरूपात राज्य शासनाकडे / संबंधीत पोलिस आयुक्तालयाकडे भरण्यास ब)सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणा-या खर्चास व तो शासनाकडे/संबंधीत विभागाच्या पोलिस आयुक्तांकडे आगावू स्वरूपात भरण्यास क) सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्याखाली आवश्यक तरतूद प्रतिवर्षी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.
मा.अमिना पानसरे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करण्यात यावा अशी सूचना करते.

मा.रमा ओव्हाळ – सूचनेला अनुमोदन आहे.
यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -२४० विषय क्रमांक – ३
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. २१८ दि.२०/०२/२०१३

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
अनुकूल -६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२४१ विषय क्रमांक – ४
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे उदयान/४/कावि/६२/२०१३ दि. १४/२/२०१३.
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/०२/२०१३ ठराव क्र.२९२६ नुसार

सी.एम.ई.दापोडी व औंध मिलीटरी कॅम्प येथील मिलीटरी हद्दी मध्ये ७५,००० वृक्षारोपण करणे व त्यांचे तीन वर्षे देखभाल/संरक्षण करणेचे काम महाराष्ट्र वनविकास महामंडळ यांना प्रतिवृक्ष र.रू.३३०/- या दराने देणेस व त्याकामी येणा-या र.रू. २,४७,५०,०००/- (र.रू.दोन कोटी सत्तेचाळीस लाख पन्नास हजार) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, संबंधित अधिका-यांनी माहिती सांगावी, मिलिटरी हद्दीत कोणकोणत्या विभागात वृक्षारोपण केले आहे. किती झाडे अस्तित्वात आहेत. त्याच्यावर किती खर्च करण्यात आला आहे. महाराष्ट्र विकास महामंडळ यांना प्रति वृक्ष र.रु.३३०/- या दराने देतोय. महाराष्ट्र विकास मंडळाला देण्य़ाची गरज पिंपरी चिंचवड महापालिकेला का लागली. देखभाल दुरुस्ती करण्याबाबत सुद्धा सांगावे.

मा.प्रकाश कदम (अति.आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, शहराचा ३३ टक्के भाग ग्रीन कव्हर होण्याच्या दृष्टीने आपला उद्यान विभाग प्रयत्नशील आहे. आपण आत्तापर्यंत जवळपास २२ लाखांचे वृक्षारोपण केलेले आहे. ग्रीन कव्हरची टक्केवारी २८ टक्क्यांपर्यंत आहे. गेले काही वर्षे आपल्याला वृक्षारोपणासाठी जागा उपलब्ध नाही असे चित्र आहे. सर्व सदस्यांना सामील करुन मागील वर्षी मोठ्या

प्रमाणात वृक्षारोपणाची कामे हाती घेतली. तरीसुद्धा फक्त ७०,००० झाडे लावण्यात आली. मिलिटरी एरिया शहरातील एक भाग आहे. आर्मीच्या लोकांशी चर्चा केली असता त्यांनी प्रस्ताव दिला, आमच्या एरियामध्ये वृक्षारोपण केले तर शहराला उपयुक्त होईल. सीएमई, दापोडी इथे ७५,००० वृक्षारोपण करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. यात हे काम प्रत्येक ऑथोरीटीज, डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन महाराष्ट्र हे करणार असून राज्य शासनाचे कोऑपरेशन आहे. प्रामुख्याने त्यांनी या क्षेत्रात अनेक ठिकाणी काम केलेले आहे. आपल्या एरियात यापूर्वी वृक्षारोपणाचे काम केलेले आहे. १९९७ ते २००० दरम्यान वृक्षारोपणाचे काम समाधानकारक केलेले आहे. ३८०/- प्रती वृक्ष हा दर दिलेला आहे. पण अंदाजपत्रकीय दर तयार केला आहे. त्याप्रमाणे विचारणा करुन ३३०/- प्रति वृक्ष दर याप्रमाणे काम करण्याची तयारी दाखवली आहे. खड्डे खणणे, वृक्ष पुरवणे, ६ फूट उंचीचे वृक्ष पुरवले म्हणून कंपनी रेट प्रती रु.१००/- धरला आहे. त्याची वाहतूक, गार्डनिंग, देखभाल ३ वर्षांसाठी करणे म्हणून हा दर रु.३३०/- आलेला आहे.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, असेच याआधी वृक्षारोपण केलेले आहे. किती झाडे लावली व किती अस्तित्वात आहे याची माहिती पाहीजे.

मा.प्रकाश कदम (अति.आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, ५ वर्षांप्रमाणे मंजूर करणार आहेत. त्यातून लक्षात येईल.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, २१ लाख वृक्षारोपण केले आहे. त्यानुसार ३३:२७ २७ टक्के रेशियो आहे. महापालिका हद्दीत श्री.श्रीनिवास पाटील आयुक्त असताना वृक्षारोपण केले होते. मा.गुप्ता, मा.डिग्गीकर होते त्यावेळी देहूरोड मिलिटरी हद्दीत वृक्षारोपण केले होते. विषय अजेंडावर आलेला नाही. संबंधित विभागाला संपूर्ण माहिती दिली गेलेली आहे. शहरात वृक्ष लागवड करत असताना रस्ता रुंदीकरणात झाडे काढली जातात. काही झाडांचे वृक्षारोपण करतो. संबंधित ठेकेदाराला काही वृक्ष तोडता येत नाहीत. जाळायला वापरा, कशालाही वापरा अशा प्रकारे जवळपास वृक्ष संवर्धन कमिटीत झाडे तोडण्याबाबत ठराव झाला. किती झाडे तोडली. या विषयाला विरोध नाही. यापुढे अशा प्रकारे खर्च होत असताना एवढी मोठी रक्कम खर्च करत असताना लागवड केलेली झाडे टिकली पाहीजेत. त्याची संपूर्णपणे माहिती संबंधित विभागाला पाहीजे.
यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/श.अ.तां/१/कावि/१४८/२०१२, दिनांक २१/०८/२०१२

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५१, दिनांक २१/०९/२०१२

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२०६ दि.१२/०२/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व अनाधिकृत बांधकामास / बेकायदेशीर बांधकामास यापुढे सर्व सेवा सुविधा ( उदा. पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते, दिवाबत्ती इ.) देणे बंद करणेबाबतच्या निर्णयास तसेच यापुढे या महानगरपालिका हद्दीतील बांधकामांना विद्युत जोड देण्यापूर्वी महानगरपालिकेकडील बांधकाम चालू करण्याचा दाखला / महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडील ना हरकत दाखला सादर केल्यानंतरच विद्युत जोड देणेबाबत कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना कळविणेस तसेच ज्या ठिकाणी १००% अनाधिकृत बांधकाम झालेले असेल त्याच ठिकाणी रस्ते व दिवाबत्तीची सोय न करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.विनया तापकीर – मा.महापौर साहेब,सदर ठराव तहकूब करण्यात यावा अशी सूचना मांडते.

मा.मंदा आल्हाट – सूचनेला अनुमोदन आहे.
यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -२४२ विषय क्रमांक – ५

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/श.अ.तां/१/कावि/ १४८/२०१२, दिनांक २१/०८/२०१२

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५१, दिनांक २१/०९/२०१२

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२०६ [illegible].१२/०२/२०१२

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.साधना जाधव - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२४३ विषय क्रमांक – ६

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०९८/२०१२, दि.०८/१०/२०१२

२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.७९, दिनांक ०७/१२/२०१२

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२०७, दिनांक १२/०२/२०१३

मुख्यलेखापाल पदावरील नियुक्ती संदर्भात मे. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन स्टॅम्प क्रमांक २३३१७/२०१२ पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ X महाराष्ट्र शासन व पिंपरी चिंचवड महानगरपालिका असा दावा दाखल आहे. सदर दाव्याच्या अंतिम निर्णयास अधिन राहून श्री. प्रमोद भिमराव भोसले, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा (वरिष्ठ) गट–अ यांची मुख्यलेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्षे कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

मा.मंदा आल्हाट – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुकें/वि/३१/२०१३, दि.१९/०१/२०१३

२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१११ दिनांक ०१/०२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. २२८, दिनांक २०/०२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र से.२३ या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणेकामी येणा-या र.रु.१,३२,००,०००/-( अक्षरी र.रु.एक कोटी बत्तीस लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे - मा.महापौर साहेब,सदर ठराव तहकूब करण्यात यावा अशी सूचना मांडतो.

मा.गोरक्ष लोखंडे – सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -२४४ विषय क्रमांक – ७

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुकें/वि/३१/२०१३, दि.१९/०१/२०१३

२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१११ दिनांक ०१/०२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. २२८, दिनांक २०/०२/२०१३

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२४५ विषय क्रमांक – ८

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/ड/१५/१२/२०१३, दि.२४/०१/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१२० दिनांक ०१/०३/२०१३

स्थानिक सन्मा.नगरसदस्य व सन्माननीय नगरसदस्या यांची मागणी विचारात घेता जुनी सांगवी येथील जुनी ६ लाख लीटर क्षमतेची टाकी पंप हाऊस व संप पाडून नविन १५ लाख लिटर क्षमतेची नवीन उंच टाकी बांधणेकामी येणा-या र.रु.१,१५,९५,६३३/- (अक्षरी र.रु.एक कोटी पंधरा लाख पंच्याण्णव हजार सहाशे तेहतीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.अमिना पानसरे – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.स्वाती साने – मा.महापौर साहेब, मी आयुक्त साहेबांना सांगू इच्छिते, चिखली गावात कामगार वर्ग राहतो. पाण्याची समस्या खूप मोठी झालेली आहे. लोकसंख्या वाढली आहे. ग्रामीण भागात पाण्याची कमतरता असल्यामुळे स्वतः यात लक्ष घालावे. वारंवार सांगूनही कोणतेही काम होत नाही. मागील वर्षी अजितदादांसमोर सांगितले होते. फक्त १० लाखांची तरतूद केलेली आहे. यात टाकीचे काम पूर्ण होणार आहे का? ग्रामीण भागात एमएसईबीचा खूप मोठ्या प्रमाणात प्रॉब्लेम आहे. लाईटची व्यवस्था नाही. खूप वेळा लाईट जाते. जनरेटरची व्यवस्था करुन द्यावी. लवकरात लवकर व्यवस्था व्हावी अशी विनंती करते.

मा.दत्ता साने – मा.महापौर साहेब, मा.स्वाती साने यांनी मांडलेल्या विषयाला अनुमोदन आहे. गंभीर विषय आहे. पाटिल नगर, चिंचवडगाव, शेलारवस्ती, सोनवणे वस्ती इथे खूप मोठी समस्या आहे. रात्री २/३ वा. पाणी येते. आमचा भाग कामगार नगरीचा भाग आहे. महिला वर्गाला सुद्धा सकाळी उठून कामाला जायचे असते. रात्री दीड वाजता उठून पाणी भरावे लागते. पाटिलनगर इथे पंप बसवला आहे. तो चालू केला तरच काही ठिकाणी पाणी जाते. प्रत्येक वेळी पंप बंद असतो. लाईट सारखी जात असते. लोकांना वेळ दिलेली आहे. लाईट गेलीतर पाणीपुरवठा सुरळीत होत नाही म्हणून विनंती करतो. अनेक वेळा पाटिलनगरबद्दल चर्चा केलेली आहे. आपल्याला विनंती आहे, त्याठिकाणी टाकी बांधायचा प्रस्ताव केलेला आहे. त्याचे काम लवकर झालेतर प्र.क्र.१८/१९ मध्ये बांधलेल्या टाक्यांत पाणी साठेल. त्या भागात व्यवस्थितरित्या दिले गेलेतर कायमस्वरुपी प्रश्न सुटणार आहे. आयुक्त साहेबांनी सूचना करावी. ज्या-ज्या भागात पाण्याचा प्रश्न आहे, खरेच गंभीर प्रश्न आहे. महिला रात्री दीड वाजता पाणी भरत असतील तर त्यांनी कधी विश्रांती घ्यायची. पाण्याच्या सोयीची सुद्धा गॅरंटी नाही. त्या भागात टाकी बांधणे खूप महत्वाचे आहे. याबाबत काहीतरी निर्णय घ्यावा. टाकीसाठी मान्यता घ्यावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ९

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/ACAD/२५/२०१३, दि.२०/०२/२०१३

२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१२२ दिनांक ०१/०३/२०१३

MUHS-PCMC P. G. Institute साठी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेल्या ५४ पदनामाची ३३२ पदापैकी आवश्यक असणारा Teaching व Ancillary स्टाफ प्रपत्र ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण २६ पदनामाची १९८ पदे निर्माण केल्यास अंदाजे दरवर्षी र.रु.१३,७५,९२,०००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदरची पदनिर्मिती करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

मा.सुजाता पालांडे- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, सदर विषय तहकूब करणेत यावा.

मा.गोरक्ष लोखंडे – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -२४६ विषय क्रमांक – ९
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/ACAD/२५/२०१३, दि.२०/०२/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१२२ दिनांक ०१/०३/२०१३

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १०
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८१ दिनांक ०६/०३/२०१३

मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.३३ ते ३६ पै. मधून मोरया मंगल कार्यालयाकडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यापासून थेरगांव स्मशानभूमी पर्यंत १२ मी. रुंद रस्ता व स्मशानभूमी ते थेरगांव गावठान २४ मी. रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९ मी. रस्ता रुंद केल्यास नागरिकांची स्मशानभूमीकडे जाण्यासाठी त्या भागातील नागरिकांना रस्त्याची सोय होणार असल्याने सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.२५ व ३० मधून जाणारा १२ मीटर रस्ता सर्व्हे नं. २५ मध्ये अस्तित्वातील रस्त्याजवळ वाकडया वळणाचा असल्याने सदरचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने सरळ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, सदर विषय तहकूब करणेत यावा.

मा.गोरक्ष लोखंडे – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -२४७ विषय क्रमांक – १०
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८१ दिनांक ०६/०३/२०१३

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ११
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८२ दिनांक ०६/०३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८१०/२४५८/प्र.क्र.१६/११/नवि-१३, दिनांक १४/०५/२०१२ अन्वये मौजे किवळे येथील सर्व्हे नं.४० मधील मंजूर विकास योजनेमधील १५ मी. रुंदीचा दक्षिण उत्तर रस्ता तसेच (एम.४-२०) प्रमाणे शिफटेड रोड रद्द करुन सदर रस्त्याने बाधीत क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करण्याची मागणी संबंधीत सर्व जागेच्या मालकाची असल्याने व सदर जागेचे एकच जागामालक असून त्यांचे मागणीनुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, सदर विषय तहकूब करणेत यावा.

मा.गोरक्ष लोखंडे – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -२४८ विषय क्रमांक – ११
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८२ दिनांक ०६/०३/२०१३

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.संजय वाबळे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १२

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८३ दिनांक ०६/०३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेतील मौजे चिखली येथील देहू-आळंदी रस्ता, सोनवणे वस्ती २४ मी. व ३० मी. रस्त्यालगत ग.क्र. १६१२ पै., १६२० पै. या जागेवरील कमर्शियल झोन (सी.२) मंजूर झाली आहे. सदर ठिकाणी नगारिकांनी रहिवाश्यांकरिता घरे बांधली असून कमर्शियल झोन (सी.२) रद्द करुन सदरील झोन रेसिडेन्शियल झोन म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेश म्हेत्रे – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.स्वाती साने – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या सन २००९च्या भागशः मंजूर विकास योजनेनुसार मौजे चिखली येथील देहुआळंदी रस्त्यालगतच्या सोनवणे वस्ती परिसरातील जागेमध्ये कमर्शियल झोन C2 व आरक्षण क्र. १/९७ हॉस्पीटल मंजुर झालेले आहे. कमर्शियल झोन C2 ने बाधीत गट नं. १५६९पै, १६०५पै ते १६३२पै व ११९२ पै व इतर मध्ये नागरिकांनी रहिवासासाठी घरे बांधली असल्याने C2 झोन रद्द करुन रेसीडेन्शीयल झोन, असा फेरबदल भागशः मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. १/९७ हॉस्पीटल वगळुन करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

मा.शुभांगी बो-हाडे – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

मा.संजय वाबळे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - २४९ | विषय क्रमांक – १२ |
| दिनांक – २२.०३.२०१३ | विभाग – मा.आयुक्त |

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८३ दिनांक ०६/०३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेतील मौजे चिखली येथील देहू-आळंदी रस्ता, सोनवणे वस्ती २४ मी. व ३० मी. रस्त्यालगत ग.क्र. १६१२ पै., १६२० पै. या जागेवरील कमर्शियल झोन (सी.२) मंजूर झाली आहे. सदर ठिकाणी नागरिकांनी रहिवाश्यांकरिता घरे बांधली असून कमर्शियल झोन (सी.२) रद्द करुन सदरील झोन रेसिडेन्शियल झोन म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या सन २००९च्या भागशः मंजूर विकास योजनेनुसार मौजे चिखली येथील देहुआळंदी रस्त्यालगतच्या सोनवणे वस्ती परिसरातील जागेमध्ये कमर्शियल झोन C2 व आरक्षण क्र. १/९७ हॉस्पीटल मंजुर झालेले आहे. कमर्शियल झोन C2 ने बाधीत गट नं. १५६९पै, १६०५पै ते १६३२पै व ११९२ पै व इतर मध्ये नागरिकांनी रहिवासासाठी घरे बांधली असल्याने C2 झोन रद्द करुन रेसीडेन्शीयल झोन, असा फेरबदल भागशः मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. १/९७ हॉस्पीटल वगळुन करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुनिता वाघेरे – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १३

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त क्र.शिक्षण/आस्था/कावि/३८/२०१३, दिनांक १६/०१/२०१३.

२) मा.महापालिका आयुक्त क्र.शिक्षण/आस्था/कावि/१४/२०१३, दिनांक ०७/०१/२०१३.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.२०१, दिनांक ११/०२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी ज्युनिअर के.जी.पासून इ.१ ली ते ७ वी प्राथमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून देण्यासाठी १. मनपा शाळा, तपोवन मंदिराजवळ, पिंपरी, पुणे १७ व २. छत्रपती शाहुजी महाराज प्राथ.विद्यालय, कासारवाडी, पुणे ३४ या दोन शाळा दत्तक योजनेअंतर्गत थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह फाऊंडेशन व आकांक्षा फाऊंडेशन, शिक्षण मंडळ व पिंपरी चिंचवड मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक शाळा सन २०१३-१४ या वर्षात योग्य अटी शर्तीनुसार करार तीस वर्षाचा असेल तसेच शिक्षण मंडळ सभेचे ठरावानुसार सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.आशा सूर्यवंशी – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.महेश लांडगे – मा.महापौर साहेब, आम्ही महापालिकेकडून एक रुपयाची सुद्धा मदत घेत नाही. पिंपरी चिंचवडमध्ये मराठी शाळा चालवणे किती कठीण आहे. जिल्हा परिषदेने त्यांचा टॅक्स पूर्णपणे माफ केलेला आहे. त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरात ज्या खाजगी संस्था मराठी शाळा चालवतात, त्यासाठी उपसूचना देतो की, या शाळांचा सुद्धा टॅक्स कमी करु शकतो का? याबद्दल माहिती दिली तरी बरे होईल. मराठी शाळा कमी होत चालल्या आहेत. मराठी शाळा बंद पडता कामा नये. त्याठिकाणी येणारे सगळे विद्यार्थी एमआयडीसीत राहणारी गरीब घरांतली मुले शिकण्यासाठी येतात. आपल्याशी याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. अशा सगळ्या मराठी शाळांना टॅक्स माफ करावा अशी विनंती करतो. याची माहिती द्यावी.

मा.प्रशांत शितोळे – मा.महापौर साहेब, या विषयात मनपा शाळेचा उल्लेख आहे, त्या मजकूरानंतर श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे, हा मजकूर समाविष्ट करण्यात यावा अशी उपसूचना मांडतो.

मा.शत्रुघ्न काटे – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.सुनिता वाघेरे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.उल्हास शेट्टी – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे सूचना मांडतो – हा विषय नाव न देता मंजूर करावा.

मा.राजेंद्र काटे – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - २५०                    विषय क्रमांक – १३
दिनांक – २२.०३.२०१३                    विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त क्र.शिक्षण/आस्था/कावि/३८/२०१३, दिनांक १६/०१/२०१३.
२) मा.महापालिका आयुक्त क्र.शिक्षण/आस्था/कावि/१४/२०१३, दिनांक ०७/०१/२०१३.
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.२०१, दिनांक ११/०२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी ज्युनिअर के.जी.पासून इ.१ ली ते ७ वी प्राथमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून देण्यासाठी १. मनपा शाळा, श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे, तपोवन मंदिराजवळ, पिंपरी, पुणे १७ व २. छत्रपती शाहुजी महाराज प्राथ.विद्यालय, कासारवाडी, पुणे ३४ या दोन शाळा दत्तक योजनेअंतर्गत थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह फाऊंडेशन व आकांक्षा फाऊंडेशन, शिक्षण मंडळ व पिंपरी चिंचवड मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक शाळा सन २०१३-१४ या वर्षात योग्य अटी शर्तीनुसार करार तीस वर्षाचा असेल तसेच शिक्षण मंडळ सभेचे ठरावानुसार सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६७                    प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.आशा सूर्यवंशी– मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १४

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. नगररचना/अ-१/३००/२०१२, दिनांक २०/१२/२०१२.

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २१६ दिनांक १२/०२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हददीच्या विकास योजनेत मौजे तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर विकास योजनेच्या अनुषंगाने सन २००५ मध्ये सदर रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला असून सदर प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक क्रमांक १ पिंपरी यांच्या कार्यालयामार्फत सुरु आहे. सदर प्रकरणी संयुक्त मोजणी पुर्ण होऊन सुसंगत अहवाल भूसंपादन अधिकारी यांना देणेत आलेला असून प्रस्तूत प्रकरणातील मोबदला रक्कमेच्या २/३ र.रु.१४२३४३५०/- इतकी रक्कम भूसंपादन अधिकारी यांचेकडे जमा करणेत आलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३०/५/२००८ व दिनांक १८/८/२००९ च्या अधिसुचनेन्वये वाढीव हददीच्या विकास योजनेस भागश: मंजूरी प्रदान केलेली आहे. भागश: मंजूर विकास योजनेत सदर रस्ता कायम करणेत आलेला आहे. सदर ९० मीटर रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकांकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मीटर रुंद रस्ता प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटर ऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हददीतील स्पाईन रोड लाखो रुपये खर्च करुन विकसीत केला आहे मात्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील स्पाईन रोड विकसीत झाला नाहीतर त्यांना सदरच्या

रस्त्याचा वापर करता येणार नाही. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीत ७५.०० मीटर प्रमाणे आखणी करुन फेरबदलास एकदाच मान्यता घेणे आवश्यक आहे. याबाबत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या सभेत चर्चा होऊन त्यांना देखील सदर रस्त्याची आखणी मान्य आहे. तसेच सदर ठिकाणी ७५.०० मी.ची आखणी जुळवताना ९०.०० मी.च्या उत्तरेकडील बाजूच्या बाहेर आखणी जुळवावी लागणार आहे त्यानुसार वाहतूक सुरळीत करण्याचे दृष्टीने नकाशात दर्शविल्याप्रमाणे ७५.०० मी. रुंद रस्त्याची आखणी करण्यात आली आहे.

तसेच सदर रस्त्यात JNNURM अंतर्गत पाईपलाईन टाकावयाची जागा मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे सदरचे काम डिसेंबर २०१२ पुर्वी पुर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून मनपास जागेची तातडीची निकड आहे. त्यामुळे नकाशात दर्शविल्याप्रमाणे ७५.०० मी.रुंद रस्त्याच्या आखणीतील फेरबदलासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन प्रस्ताव शासनाचे मंजूरीकरीता पाठविणेसाठी मान्यता देणेस तसेच याबाबत पुढील कार्यवाही करणेस सदर फेरबदल प्रसिध्द करुन हरकती व सुचना मागवून शासनाकडे अहवाल मान्यतेकामी पाठविणेचे अधिकार आयुक्तांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.मंदाकीनी ठाकरे – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.महेश लांडगे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

म.प्र.न.अ. १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही करुन मौजे च-होली येथील पिं.चिं.म.न.पा.च्या हद्दीलगत च-होली स.न.३१५,३११,३१२,३१३,३१४ चे लगत ३० मीटर रुंदीचे रस्त्यास जोडरस्त्यास स.न.१३४,१३३,१३२, १३५ व इतर सर्वे क्रमांकाचे हद्दीवरुन जाणारे रस्त्याप्रमाणे योग्य तो रुंदीचा रस्ता करणेस व त्याकरीता वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

मा.शांताराम भालेकर – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.संदिप चिंचवडे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

पिं.चिं.नवनगर विकास प्राधिकरण व पिं.चिं.म.न.पा. या दोन्ही संस्थांच्या हद्दीतील असलेल्या ३४.५ मी. रस्त्याचे बाबतीत चिंचवड ते रावेत रस्त्याचे काम नवनगर प्राधिकरणाने सुरु केलेले आहे. नवनगर विकास प्राधिकरणाने

दि.२३.१.२०१२ रोजी दिलेला रस्ता आखणी नकाशा हा यापुर्वी पिं.चिं.म.न.पा.स दिलेल्या विकास योजनेच्या नकाशाशी सुसंगत नसल्याचे दिसुन येत आहे. अस्तित्वातील रस्ता नकाशात हिरवा रंगाने दर्शविलेला असुन त्याप्रमाणे ३४.५ मी. रस्ता आखणी करुन करण्यात यावा व पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील अस्तित्वात असलेला रस्ता पिं.चिं. नवनगर प्राधिकरणाच्या ३४.५ रस्त्यात समायोजित करण्यात यावा तसेच चिंचवड व रावेत या ठिकाणी देखील या रस्त्याची आखणी २४ मी. आहे त्या ठिकाणी देखील रस्त्याची आखणी जुळवावी लागणार आहे. दोन्ही बाजुच्या रस्त्याची आखणी २४ मी. असुन ती आखणी देखील ३४.५ मी. रस्त्याशी जुळवुन घ्यावी व त्याप्रमाणे रस्ता करण्यात यावा व विकास योजनेतील दोन्ही रस्त्यांचे एकत्रित आखणी करण्यासाठी म.प्रा.न.अ. १९६६ कलन ३७ अन्वये कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देणेत यावी.

मा.सदगुरु कदम – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.बाळासाहेब तरस - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

मौजे भोसरी (कासारवाडी) येथील आ.क्र.२२ माध्यमिक शाळा या प्रयोजनाने बाधीत क्षेत्र महापालिकेच्या टिडिआरने ताब्यात आले आहे. तरी आरक्षणाचे क्षेत्र पवनानदीच्या निळ्या पुररेषेने ७५% व्यापले जात असुन सदर निळ्या पुररेषेमध्ये बाधीत क्षेत्रात नियमानुसार कुठलेही बांधकाम/विकास अनुज्ञेय नाही. तरी सदर आरक्षणाचे प्रयोजनात म.प्र. व न.र.अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये माध्यमिक शाळाऐवजी खेळाचे मैदान असा फेरबदल करण्यास व फेरबदलावर पुढील कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेकामी सादर करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मौजे भोसरी (कासारवाडी) येथील आ.क्र.२१ प्राथमिक शाळा या आरक्षणाने बाधीत क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात असुन जागेवर शाळा बांधण्यात आली आहे. तथापि सदर आरक्षणाचे हद्दीवर सिमाभिंत बांधल्यास या आरक्षणाचे, उत्तर, दक्षिण व पश्चिमेकडील हद्दीवर फार पूर्वीपासून असलेली ७०० ते ८०० नागरिकांची घरे आहेत. व सदर सिमाभिंतीमुळे सदर नागरिकांना रस्ता उपलब्ध होणार नाही. सबब सदर नागरिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन आ.क्र.२१ प्राथमिक शाळा या आरक्षणाचे उत्तर,दक्षिण व पश्चिम हद्दीतून ६.० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यास म.प्रा. व न.र. अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल

करण्यास व फेरबदलावर पुढील कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मान्यतेकामी सादर करण्यास मान्यता देणेत यावी. मौजे सांगवी येथे सांगवी-बोपोडी या पुणे मनपा हद्दीत जाणारे मुळा नदीवरील प्रस्तावित पूलाकरिता पूलाचे रुंदीचे प्रमाणात जोडरस्ता करणेस म.प्र.न.र.अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही व्हावी तसेच प्रभाग क्र.१८ किवळे येथील श्री बापदेव चौक ते किवळे गावठाणापर्यंतचा रस्ता त्याच्या डी.पी.मध्ये काही रस्ता २४ मी. व १८ मी. दर्शविण्यात आला आहे. तरी तो संपुर्णतः १८ मी. करण्यास व फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथिल स.न. ५१०१/५१०२ पैकी आरक्षण क्र.२७९ नॉन कन्फर्मिंग इंडस्ट्री हे आरक्षण आहे. सदरच्या आरक्षणात बदल करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेअंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करुन Municipal Purpose असा बदल करण्यात यावा. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाहीकरीता मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात यावेत.

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, हा विषय त्रिवेणीनगर ते तळवडे हा ९० मी. रस्त्याचा ७५ मी. करण्याचा विषय आहे. यासंदर्भात आपल्याकडे एकदा आले होते. आपल्याला काही कागदपत्रे दाखवायचा प्रयत्न केला. आपण सांगितले, भदाणे मॅडम यांच्याशी त्याविषयी बोलून घ्या. त्यांच्याशी सविस्तर चर्चा केल्याप्रमाणे साईडला घेऊन सुद्धा केले पाहीजे. यात काही बारकावे आहेत. ६ ते ७ वर्षांपासून यावर चर्चा सुरु आहे. प्राधिकरणाच्या रस्त्याची गरज आहे. आम्ही ज्या बाजूने निश्चितपणे आहोत. दोन्हीकडे प्राधिकरण आले आहे. पलिकडे प्राधिकरण आहे. त्यांची अलाईनमेंट नाही. रस्ता सरळ व्हायला पाहीजे अशी सरळ सूचना आहे. प्रभाग सभेत ठराव केला. महापालिका सभेत चर्चा झाली. त्याचे विखंडण झाले. नवीन डी.पी. त्याचे अलॉटमेंट वरील बाजूला आले. परत याठिकाणी कागदपत्रे देऊ इच्छितो. माझ्याकडे मॅप आहे. तुमचा नाही. मनपाचा दाखवत नाहीत. त्यांनी दाखवलेला रस्ता सरळ होत नाही. मी गव्हर्नमेंटच्या सर्वेअरकडून काढून घेतला आहे. रस्ता सरळ-सरळ बरोबर आहे. मिलीमीटरचा फरक नाही. याप्रमाणे रस्ता केलातर तो बरोबर मिळत नाही. उत्तरेच्या बाजूला २२ मी. जागा मिळत नाही.

प्राधिकरणाची ब्लूलाईन, प्राधिकरणाचे मार्किंग आहे. माझे ९० मी.चे मार्कींग आहे. तोंडमिळवणी करण्यासाठी कृष्णानगरच्या अलिकडे यमुनानगर आहे. रस्ता ६० डिग्रीमध्ये टर्न दिसतोय. विभागीय आयुक्तांशी मिटींग झाल्याप्रमाणे महापालिकेच्या डी.पी.प्रमाणे रस्ता व्हावा. कोणाची घरे जावीत या बाजूने मी नाही. कोणकोणती घरे जाणार आहेत. अलिकडे कच्ची घरे आलीत. अलिकडे कलेक्टरकडून एन.ए. झालेली घरे आहेत. आमदार विलास लांडे यांचे पत्र आहे. शासनाकडे पत्रव्यवहार केला होता. सांगितले होते, रस्ता सरळ करण्यात यावा. नंतर आमदारांचे मत परिवर्तन झाले. निवेदनाप्रमाणे त्यांचा असलेला मुद्दा त्यांना सोडला. आता त्यांचे म्हणणे आहे, महापालिकेच्या डी.पी.प्रमाणे करा. या राजकीय हेतूने प्रेरीत घाट घातला आहे. प्राधिकरणाचे २००५चे पत्र आहे. नगररचना विभागाला दिलेले होते. विषयाचे प्रकरण दि.२२/४/१२ रोजी मा.सहाय्यकारी अधिकारी यांनी पिंपरी चिंचवडचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली. पाठीमागे २० मी. जाताना ७५ मी.च्या रस्त्यात सरळ दोष देण्यात आला. खालच्या दिशेने वळून घ्यावे असे काम करु नये. सध्याचा भाग पिंपरी चिंचवडच्या कार्यक्षेत्रात असल्यामुळे त्याचा विकासक्रम आहे. नियमानुसार पत्रव्यवहार केलेला आहे. खाल्च्या दिशेने जात असताना एकंदरीत रस्ता सरळ व्हायला पाहीजे होता. यापूर्वीचे नगररचनाकार यांना याविषयी माहिती होती. आयुक्त साहेबांना विषय माहिती आहे. एवढ्या कटकटी झाल्या आहेत, या विषयाला हात लावायला कोणी तयार नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करा. शासनापर्यंत तक्रार गेलेली आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी काही घरे पाडली, त्या लोकांना आजतागायत कोणताही मोबदला दिलेला नाही. सगळे नगरसेवक गप्प बसले तरी पाईपलाईन होणे गरजेचे आहे. त्यांच्यासाठी आजपर्यंत कोणताही मोबदला देऊ शकलो नाही. ठोस निर्णय द्या. राजकीय आश्वासन नको आहे. महत्वाचे आहे. आत्ता घरे पाडणार. अलाईनमेंट फायनल केल्यानंतर त्याने प्राधिकरण माध्यमातून त्या लोकांना घरे देण्यात यावीत. त्यामध्ये लिस्ट फायनल करायला पाहीजे. विषय आज झाला म्हणून घरे तोडायला जाऊन उभे राहणार नाही आहोत. तुम्हाला रस्ता पूर्ण करायचा आहे. त्याआधी प्राधिकरणाच्या मिटींगमध्ये फायनल विषय झाला. रेडी रेकनरप्रमाणे जी रक्कम होईल ती वर्ग करुन जेवढी घरे जातात ती देण्याची जबाबदारी प्राधिकरणाने घेतली पाहीजे. मुळात हा त्यांचा इश्यु आहे. तो हातात धरुन आहेत. आम्हाला काही करता येणार नाही, त्यांची घरे जात आहेत. एकंदरीत एन.ए. पास केलेली घरे आहेत. परत एकदा याचा बारकाईने विचार करावा. योग्य तो मोबदला द्यावा ही त्यांची मागणी आहे. आपण रस्ता

थांबवू शकत नाही. पाईपलाईनचे काम थांबवू शकत नाही. या लोकांना, सर्वसामान्यांना घरे मिळवून देण्यासाठी प्राधिकरणाची भूमिका, त्याची स्थापना झाली आहे. मागेपुढे प्लॉटींग करुन प्लाट विकले, त्याचे अलॉटमेंट झाले आहे. ६० अंशात आणून रस्ता कसा दिसणार आहे. मेजरमेंट बघा. महापालिकेच्या कागदावर वस्तुस्थिती नाही. साईटवर उभे राहील्यानंतर गेलेल्या दोन्ही चौकांतून ऑलरेडी डी.पी. सोडून जाणार आहे. तुमचे स्वतःचे प्रोसिडींगमध्ये म्हटले आहे. अक्विझिशन करणार आहोत. जागांसाठी गरीबांवर का अन्याय करतो आहोत? नियमाप्रमाणे सरळ रस्ता होऊ द्या. रस्ता वळवायची गरज नाही. प्राधिकरणाचे क्लॅरिफिकेशन घेतले पाहीजे. कोणाची घरे जात आहेत. प्राधिकरणाच्या डी.पी.प्रमाणे का महापालिकेच्या डी.पी. प्रमाणे जोडणार? प्राधिकरणाने ठराव केला आहे. घरे ज्यांना देणार त्यांच्या नावाची लिस्ट मिळाली पाहीजे. कशा प्रकारची घरे, कधी मिळणार आहेत? रेडिरेकनरप्रमाणे पैसे प्राधान्याने देणार आह्ेत का? घरे बांधायला त्यांची क्षमता असली पाहीजे. सगळी कागदपत्रे देऊ इच्छिते. मुख्यमंत्री काही शब्दांनंतर निरुत्तर झाले. त्यांच्याकडून अपेक्षा नाही. आपण न्यायाची भूमिका घ्या. उत्तर मिळाले नाही. या विषयावर ठरले आहे कोणत्याही परिस्थीतीत रस्ता करणे गरजेचे आहे. कोणावरही अन्याय होऊन रस्ता करु नये. चुकीच्या पद्धतीने डी.पी. टाकला. कोणीही म्हटले नाही ७५ मी. मध्ये ९० मी.चा रस्ता बसत नाही. पुढे मागे प्राधिकरणाच्या स्किमस् कलम ३७ नुसार भूमिका घेतली आहे. मागणी नसताना करा नाहीतर ९० मी. प्रमाणे केलातरी काही म्हणणे नाही. तुमची चूक लक्षात आल्यानंतर ७५ मी. करताय. त्याची खरी जबाबदारी आहे. प्राधिकरणाच्या मिटींगमध्ये विषय झाला, त्याला तुम्ही सुद्धा सदस्य आहात. ही लिस्ट बघा. सर्वांचे रिपोर्ट बघा. काय करणार याचे आश्वासन मिळेल. राजकीय आश्वासन नको आहे. आम्ही या लोकांना तयार करुन स्वतःहून हे लोक बाजुला होतील. तुमची सहकार्याची भूमिका असू द्या.

मा.सुरेश म्हेत्रे – मा.महापौर साहेब, सदर ठिकाणचा ९० मी.चा प्रस्तावित रस्ता ७५ मी. करण्याबद्दलचा विषय याठिकाणी आलेला आहे. त्याविषयासंबंधात आत्ता सन्मा.सदस्य सुलभा ऊबाळे यांनी चर्चा केली. त्याअनुषंगाने हा रस्ता सरळ करण्याचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून हा विषय थांबलेला आहे. परंतू यमुनानगर व कृष्णानगरची पूर्व पश्चिम दिशेने आखणी करताना सरळ रस्ता होणे त्याठिकाणी शक्य नाही. प्राधिकरणाने आपल्या हद्दीतील रस्ता पूर्ण केलेला आहे. कमीत कमी ६० अंश एवढा फरक पडत नाही. जास्तीत जास्त सरळ रस्ता होण्याच्या दृष्टीने हा

विषय सभागृहापुढे आलेला आहे. विषयामध्ये अनेक वर्षे प्रॉब्लेम असला तरी मिळकत धारकांची मानसिकता झाली आहे की, आम्हाला नुकसान भरपाई मिळून हा विषय मार्गी लावावा. अनेक वेळा बैठका घेतल्या. त्यावेळी त्यांनी मत व्यक्त केले आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या मिटींगमध्ये मागील महिन्यात सन्मा. आमदार विलास लांडे यांना ५०० स्क्वे. फुटाचा भूखंड यांना द्यावा असा विषय दिला होता. त्यानुसार प्राधिकरणाने विषय मंजूर केलेला आहे. त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव जाणार आहे. म्हणून ज्या मिळकत धारकांची मागणी आहे, त्यानुसार मागणी पूर्ण होणार आहे. रेडीरेकनर प्रमाणे नुकसानभरपाई मिळणार आहे. म्हणून सदर विषय आत्ताच्या मिटींगमध्ये मंजूर करण्याविषयी विनंती करीत आहे.

मा.अरुणा भालेकर – मा.महापौर साहेब, हा रस्ता होतो आहे. होणे गरजेचे आहे. परंतू पाईपलाईनसाठी बेघर झालेल्यांचे पुढे काय होणार आहे? ते रस्त्यावर राहत आहेत त्यांचा विचार करावा. त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहीजे. त्याची योग्य माहिती मिळाली पाहीजे.

मा.शांताराम भालेकर – मा.महापौर साहेब, हा विषय सातत्याने अनेक वेळा आलेला आहे. प्राधिकरण तळवडे परिसरात नाही. ९० मी. चा रस्ता प्राधिकरणाने त्याठिकाणी नकाशात नसताना सुद्धा तळवडे परिसरात महापालिकेची हद्द आहे. ९० मी. ऐवजी तो ७५ मी. करावा असा प्रयत्न अनेक वर्षांपासून सातत्याने करत आहोत. आयुक्त साहेब व महापौर साहेब एकच विनंती आहे की, बाधीत असलेल्यांना योग्य तो मोबदला देऊन योग्य ती कारवाई करावी. ९० मी. ऐवजी ७५ मी. चा रस्ता करायचे ठरले आहे. त्यानुसार करण्यात यावा. ९० मी. केल्यानंतर तांत्रिक अटींवर प्राधिकरणाच्या बिल्डींगी पाडल्या जातात. नकाशात प्रसिद्ध केल्याप्रमाणे विषय़ मार्गी लावावा. परिसरातील नागरीकांची मुख्य अडचण समजून घेऊन हा विषय मार्गी लावावा.

मा.आशा सूर्यवंशी – मा.महापौर साहेब, मा.बाळासाहेब तरस, मा.चिंचवडे व मा.महेश लांडगे यांनी दिलेल्या उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - २५१ | विषय क्रमांक – १४ |
| दिनांक – २२.०३.२०१३ | विभाग – मा.आयुक्त |

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. नगररचना/अ-१/३००/२०१२, दिनांक २०/१२/२०१२.

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २१६ दिनांक १२/०२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हददीच्या विकास योजनेत मौजे तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर विकास योजनेच्या अनुषंगाने सन २००५ मध्ये सदर रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला असून सदर प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक क्रमांक १ पिंपरी यांच्या कार्यालयामार्फत सुरु आहे. सदर प्रकरणी संयुक्त मोजणी पुर्ण होऊन सुसंगत अहवाल भूसंपादन अधिकारी यांना देणेत आलेला असून प्रस्तूत प्रकरणातील मोबदला रक्कमेच्या २/३ र.रु.१४२३४३५०/- इतकी रक्कम भूसंपादन अधिकारी यांचेकडे जमा करणेत आलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३०/५/२००८ व दिनांक १८/८/२००९ च्या अधिसुचनेन्वये वाढीव हददीच्या विकास योजनेस भागश: मंजूरी प्रदान केलेली आहे. भागश: मंजूर विकास योजनेत सदर रस्ता कायम करणेत आलेला आहे. सदर ९० मीटर रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकांकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मीटर रुंद रस्ता प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटर ऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हददीतील स्पाईन रोड लाखो रुपये खर्च करुन विकसीत केला आहे मात्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील स्पाईन रोड विकसीत झाला नाहीतर त्यांना सदरच्या रस्त्याचा वापर करता येणार नाही. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीत ७५.०० मीटर प्रमाणे आखणी करुन फेरबदलास एकदाच मान्यता घेणे आवश्यक आहे. याबाबत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या सभेत चर्चा होऊन त्यांना देखील सदर रस्त्याची आखणी मान्य आहे. तसेच सदर ठिकाणी ७५.०० मी.ची आखणी जुळवताना ९०.०० मी.च्या उत्तरेकडील बाजूच्या बाहेर आखणी जुळवावी लागणार आहे त्यानुसार वाहतूक सुरळीत करण्याचे दृष्टीने नकाशात दर्शविल्याप्रमाणे ७५.०० मी. रुंद रस्त्याची आखणी करण्यात आली आहे.

तसेच सदर रस्त्यात JNNURM अंतर्गत पाईपलाईन टाकावयाची जागा मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे सदरचे काम डिसेंबर २०१२ पुर्वी पुर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून मनपास जागेची तातडीची निकड आहे. त्यामुळे नकाशात दर्शविल्याप्रमाणे ७५.०० मी.रुंद रस्त्याच्या आखणीतील फेरबदलासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन प्रस्ताव शासनाचे मंजूरीकरीता पाठविणेसाठी मान्यता देणेस तसेच याबाबत पुढील कार्यवाही करणेस सदर फेरबदल प्रसिध्द करुन हरकती व सुचना मागवून शासनाकडे अहवाल मान्यतेकामी पाठविणेचे अधिकार आयुक्तांना देणेस मान्यता देणेत येत आहे. म.प्र.न.अ. १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही करुन मौजे च-होली येथील पिं.चिं.म.न.पा.च्या हद्दीलगत च-होली स.न.३१५,३११,३१२,३१३,३१४ चे लगत ३० मीटर रुंदीचे रस्त्यास जोडरस्त्यास स.न.१३४,१३३,१३२, १३५ व इतर सर्वे क्रमांकाचे हद्दीवरुन जाणारे रस्त्याप्रमाणे योग्य तो रुंदीचा रस्ता करणेस व त्याकरीता वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. पिं.चिं.नवनगर विकास प्राधिकरण व पिं.चिं.म.न.पा. या दोन्ही संस्थांच्या हद्दीतील असलेल्या ३४.५ मी. रस्त्याचे बाबतीत चिंचवड ते रावेत रस्त्याचे काम नवनगर प्राधिकरणाने सुरु केलेले आहे. नवनगर विकास प्राधिकरणाने दि. २३.१.२०१२ रोजी दिलेला रस्ता आखणी नकाशा हा यापुर्वी पिं.चिं.म.न.पा.स दिलेल्या विकास योजनेच्या नकाशाशी सुसंगत नसल्याचे दिसुन येत आहे. अस्तित्वातील रस्ता नकाशात हिरवा रंगाने दर्शविलेला असुन त्याप्रमाणे ३४.५ मी. रस्ता आखणी करुन करण्यात यावा व पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील अस्तित्वात असलेला रस्ता पिं.चिं. नवनगर प्राधिकरणाच्या ३४.५ रस्त्यात समायोजित करण्यात यावा तसेच चिंचवड व रावेत या ठिकाणी देखील या रस्त्याची आखणी २४ मी. आहे त्या ठिकाणी देखील रस्त्याची आखणी जुळवावी लागणार आहे. दोन्ही बाजुच्या रस्त्याची आखणी २४ मी. असुन ती आखणी देखील ३४.५ मी. रस्त्याशी जुळवुन घ्यावी व त्याप्रमाणे रस्ता करण्यात यावा व विकास योजनेतील दोन्ही रस्त्यांचे एकत्रित आखणी करण्यासाठी म.प्रा.न.अ. १९६६ कलन ३७ अन्वये कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मौजे भोसरी (कासारवाडी) येथील आ.क्र.२२ माध्यमिक शाळा या प्रयोजनाने बाधीत क्षेत्र महापालिकेच्या टिडिआरने ताब्यात आले आहे. तरी आरक्षणाचे क्षेत्र पवनानदीच्या निळ्या पुररेषेने ७५% व्यापले जात असुन सदर निळ्या पुररेषेमध्ये बाधीत क्षेत्रात नियमानुसार कुठलेही बांधकाम/विकास अनुज्ञेय नाही. तरी सदर

आरक्षणाचे प्रयोजनात म.प्र. व न.र.अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये माध्यमिक शाळाऐवजी खेळाचे मैदान असा फेरबदल करण्यास व फेरबदलावर पुढील कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेकामी सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे भोसरी (कासारवाडी) येथील आ.क्र.२१ प्राथमिक शाळा या आरक्षणाने बाधीत क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात असुन जागेवर शाळा बांधण्यात आली आहे. तथापि सदर आरक्षणाचे हद्दीवर सिमाभिंत बांधल्यास या आरक्षणाचे, उत्तर, दक्षिण व पश्चिमेकडील हद्दीवर फार पूर्वीपासून असलेली ७०० ते ८०० नागरिकांची घरे आहेत. व सदर सिमाभिंतीमुळे सदर नागरिकांना रस्ता उपलब्ध होणार नाही. सबब सदर नागरिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन आ.क्र.२१ प्राथमिक शाळा या आरक्षणाचे उत्तर,दक्षिण व पश्चिम हद्दीतून ६.० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यास म.प्रा. व न.र. अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास व फेरबदलावर पुढील कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मान्यतेकामी सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मौजे सांगवी येथे सांगवी-बोपोडी या पुणे मनपा हद्दीत जाणारे मुळा नदीवरील प्रस्तावित पूलाकरिता पूलाचे रुंदीचे प्रमाणात जोडरस्ता करणेस म.प्र.न.र.अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही व्हावी तसेच प्रभाग क्र.१८ किवळे येथील श्री बापदेव चौक ते किवळे गावठाणापर्यंतचा रस्ता त्याच्या डी.पी.मध्ये काही रस्ता २४ मी. व १८ मी. दर्शविण्यात आला आहे. तरी तो संपुर्णतः १८ मी. करण्यास व फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथिल स.न.५१०१/५१०२ पैकी आरक्षण क्र.२७९ नॉन कन्फर्मिंग इंडस्ट्री हे आरक्षण आहे. सदरच्या आरक्षणात बदल करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेअंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररनचा अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करुन Municipal Purpose असा बदल करण्यात यावा. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाहीकरीता मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहेत.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १५
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ–१)मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. नरवि/कावि/४क/४८८/२०१३ दिनांक २०/२/२०१३.

ताथवडे गावची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ नुसार तयार करण्यात आली असून अधिनियमानुसार प्रसिध्द करणेकरीता मा.महापालिका सभेपुढे सादर केली आहे सदर विकास योजना प्रसिध्दीनंतर प्राप्त होणा-या सुचनांबाबत सुनावणी देण्याकरिता अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये नियोजन समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने सदर समितीमध्ये मनपाच्या स्थायी समिती मधील ३ सदस्यांची नेमणूक करणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडतो.

मा.राजेंद्र काटे – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - २५२ विषय क्रमांक – १५
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ–१)मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. नरवि/कावि/४क/४८८/२०१३ दिनांक २०/२/२०१३.

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १६

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३५/कावि/२००/२०१३, दिनांक ०८/०३/२०१३

महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष मा.श्री.जे.पी.डांगे ( I.A.S.) यांनी त्यांचे शिष्टमंडळासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिनांक १०/०६/२०१२ रोजी भेट देऊन चौथ्या वित्त आयोगा संबंधी विविध विषयांवर चर्चा करुन ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार महापालिकेस जी १९ कर्तव्ये / जबाबदा-या नेमून दिल्या आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची ४ था वित्त आयोगासंदर्भात १० मुद्दांची विषयसुची तयार करुन सर्व संबंधित विभागांना पाठविणेत आली असून त्या विषय सुचीस मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.विलास नांदगुडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडतो.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - २५३ विषय क्रमांक – १६

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३५/कावि/२००/२०१३, दिनांक ०८/०३/२०१३

विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.शांताराम भालेकर-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २५४ विषय क्रमांक – १७

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

(अ) दिनांक १८/०१/२०१३ व ०१/०२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ब) दिनांक ०१/०२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(क) दिनांक १५/०२/२०१३ व २१/०२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.बाळासाहेब तरस – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.शांताराम भालेकर -मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २५५ विषय क्रमांक – १८

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

(अ) दिनांक ०९/०१/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ब) दिनांक २३/१/२०१३ व १३/२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.बाळासाहेब तरस – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.शांताराम भालेकर-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २५६ विषय क्रमांक – १९
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

(अ) दिनांक ०६/०२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.बाळासाहेब तरस – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.शांताराम भालेकर-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २५७ विषय क्रमांक – २०
दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.क्रिडा समिती</u>**

(अ) दिनांक ०२/०१/२०१३ व १६/०१/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ब) दिनांक १६/०१/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(क) दिनांक ६/२/१३, १३/०२/१३ व २१/२/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ड) दिनांक २०/०२/२०१३ व २१/२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.बाळासाहेब तरस – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २१वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २५८ विषय क्रमांक – २१

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

**<u>अ प्रभाग समिती</u>**

संदर्भ-१) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/२/कावि/४८६/२०११, दिनांक ०५/१२/२०११

२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.२७ दि.१०/०८/२०१२

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.२१५, दि.१२/०२/२०१३

अजंठानगर श्रेणीवाढ योजना येथील रिक्त ११ गाळे २५ वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने (लिजने) वितरीत करणेकामी मा.उपसंचालक नगररचना विभाग यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे निविदा मागविणेत आल्या असून गाळा क्र.इ-८ Si करीता श्री.चंद्रकांत सुर्यकांत संकपाळ यांचा सर्वोच्च निविदा दर र.रु.७,१५,०००/- (मनपा/शासन कराव्यतिरिक्त) लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार श्री.संकपाळ यांना गाळा क्र.इ-८ Si २५ वर्षाच्या लिजने देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.उल्हास शेट्टी – मा.महापौर साहेब, ११ गाळ्यांचे एकदा टेंडर काढले. एकाच व्यक्तीला रु.७,१५,०००/- रकमेवर २५ वर्षांसाठी गाळे देण्याचा विषय आहे. उरलेल्या १० गाळ्यांना टेंडर का आले नाही? भूमि आणि जिंदगी विभागात ए.सी. केबिनमध्ये बसून फाईलमध्ये असलेल्या गाळ्याचे वाटप करतात. त्याठिकाणी बाकी गाळ्यांमध्ये घुसखोरी झालेली आहे. हा माणूस कसा काय गाळे घेतो आहे हे खूप मोठे कोडे आहे. या गाळ्यांना फ्रंटेज नाही. १० गाळ्यांमध्ये महापालिकेची प्रॉपर्टी

आहे. एन्ट्री नाही. घुसखोरी, अतिक्रमण झालेले आहे. ऑफीसर लोकांना या गोष्टीचा टेंडर काढताना कधी विचार केला आहे का? गाळे मोकळे केले पाहीजेत. जागेवर गेल्यावर घुसखोरी असताना टेंडर कसे काय भरणार? महापालिकेच्या भाजीमंडईचा प्रश्न तुमच्याकडे आलेला आहे. उत्पन्न थांबलेले आहे. क्लिअर करुन पार्टीला नियमात जे काही आहे ते देणे गरजेचे आहे. पुनर्वसनाची बिल्डंग बांधली आहे. बांधून रेडी आहेत. खाली पार्कींगमध्ये छोटे-छोटे गाळे देणार आहेत. किराणा दुकान, डेटूडे लाईफमध्ये लागणा-या वस्तूंसाठी दुकाने काढणार आहेत. ते बांधून देत नाहीत. तांबे साहेबांना, पाटील साहेबांना याबद्दल सांगितले. हे लोक स्वतःच्या ऑफीससाठी ५०० स्क्वे. फूट पार्कींगमध्ये ऑफीस ठेवले आहे. आपल्याला दुकान बांधून देत नाही. कृपा करुन १५/२० दुकाने जास्त द्या. ब-याच वर्षांपासून खितपत पडले आहेत. पूर्ण टप्पा तयार झाला आहे. १० दिवसांत काम करतो असे सांगितले. या लोकांना लवकरात लवकर टेंडर देण्यात यावे. अजंठानगरमध्ये झोडपट्ट्यांचे पुनर्वसन झाल्यानंतर पत्राशेड टोटल क्लिअर करा. तिथे परत झोपडपट्टी वाढतेय. हे करण्याचा काही उपयोग होणार नाही. आपण पुन्हा सूचना द्याव्यात व हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २५९ विषय क्रमांक – २२

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. प्रशासन/१३अ/कावि/२८५/१३ दिनांक २०/०३/२०१३

शासन निर्णय क्र.पीसीसी-३०९७/२६२/प्र.क्र.२७/नवि-२२, दिनांक १८/०६/१९९८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त या

अभिनामाचे एक पद मंजूर असून, सदरच्या पदावर शासन सेवेतील अधिकारी कार्यरत आहे. महानगपालिकेची सन १९९८ व सन २०१३ मधील अंदाजपत्रकाची व आस्थापना खर्चाची स्थिती पुढीलप्रमाणे,

| क्र. | सन | अंदाजपत्रक र.रु. | आस्थापना खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १९९८-१९९९ | २६८.७६ कोटी | ३१.२७% |
| २ | २०१२-२०१३ | १७८९.०० कोटी | २०.३५% |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३९अ (१) मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे. "राज्य शासनास महानगरपालिकेत महानगरपालिका अतिरिक्त आयुक्ताची एक किंवा अनेक पदे निर्माण करता येतील आणि अशा पदांवर योग्य त्या व्यक्तिची नेमणूक करता येईल, जो आयुक्ताच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, आयुक्ताच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर करील आणि त्याची सर्व किंवा कोणतीही कर्तव्य व कार्ये पार पाडील."

सद्यस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. महापालिकेच्या सन २०११-२०१२ चे अंदाजपत्रक १६२७.३० कोटी व सन २०१२-२०१३ चे अंदाजपत्रक १७८९.१० कोटी इतक्या रकमेचे आहे. महानगरपालिकेमध्ये नवीन १७ महसूली गावांचा समावेश झाला असुन लोकसंख्या, कार्यक्षेत्र, अंदाजपत्रकामधील तरतुद यामध्ये वाढ झालेली आहे. तसेच सन २०१२ चे निवडणूकीनुसार महानगरपालिकेची सदस्य संख्या १२८ झाली असून, लोकसंख्या १८ लाखाचे वर पोहोचलेली आहे. तसेच कार्यक्षेत्रामध्येदेखील वाढ झालेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता वाढत्या लोकसंख्येला नागरी सुविधा पुरविण्यासाठी व या सर्व कारभारावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी दोन अतिरिक्त आयुक्त दर्जाच्या अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या एका शासन मंजूर पदावर शासन प्रतिनियुक्तीवरील अधिकारी कार्यरत आहे. अतिरिक्त आयुक्त दर्जाचे आणखी एक पद निर्माण करणे आवश्यक आहे.

सबब वरील सर्व परिस्थिती विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३९अ (१) मधील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी नव्याने आणखी एक अतिरिक्त आयुक्त या अभिनामाचे पद नव्याने निर्माण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.अमिना पानसरे – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, गेले २० वर्षांत अनेक पदे वाढवली. असिस्टंट कमिश्नर, अडीशनल कमिश्नर, त्यावरील खर्च सुद्धा वाढतो. कामाचे एक्झिक्युशन वाचून दाखवले. ३० टक्के एक्झिक्युशन आहे. एवढी पदे पाहीजेत. या लोकांना काही पॉवर्स नाहीत. तुमच्या अनुभवाने सांगा. सगळ्या पॉवर्स कमिश्नर यांच्याकडे आहेत. पदे वाढवून काय उपयोग? पक्ष आदेश आहे म्हणून ठरावाला विरोध करत नाही. कुठेतरी विचार करा. पदांना काहीतरी अधिकार दिले पाहीजेत. अधिकार देत नाहीत. अधिकारी म्हणतात, फाईल कमिश्नर यांच्याकडे आहे. डिपार्टमेंटमध्ये अडिशनल कमिश्नर, असिस्टंट कमिश्नर यांना पॉवर्स दिलेल्या आहेत. या पदांचा काही उपयोग नाही. एक्स्ट्रा खर्च करतो. नवीन पदनिर्मिती करताना छोट्या छोट्या मॅटर्सना फाईल रिक्वायरमेंट कमी आहे. बीपीएमसी अक्टमध्ये सांगितलेले आहे. फाईल तुमच्यापर्यंत येते, कामाचा लोड वाढतो. इतक्या फाईली असि.कमिश्नर, अडिशनल कमिश्नर यांच्यापर्यंत जाणार. अधिका-याला थोड्याफार पॉवर्स द्या. म्हणजे फाईल जास्त दिवस पेंडींग राहणार नाही. गेल्या मिटींगमध्ये सावंत साहेबांबद्दल विचारले होते. त्यांना दोष देत नाही. लॉ ऑफीसर म्हणून अपॉईंट करत असताना अधिका-याची पेंशन चालू होणार. त्यांना लॉ ऑफीसरचा १० वर्षांचा अनुभव आहे. सनद पाहीजे असे मेंशन केले असले तरी सनद नसताना लॉ ऑफीसर म्हणून अपॉईंट करत असाल तर मग सनदेशिवाय वकील वकीली करतो का? उठून कोण उत्तर देत नाही. हे खरे आहे का? अन्यथा पेपरवाल्याला नोटीस पाठवा. कुठूनही शिक्षा व्हायला पाहीजे. पेपरमध्ये बातमी येते. प्रशासनाची चूक नसेल तर पत्र पाठवा. त्यांच्याकडे सनद नव्हती, अनुभव नव्हता. एखादा रिप्रेझेंट करु शकत नाही. सावंत साहेबांना त्यावेळी अपॉईंट केले, ठरवून अंमलबजावणी केली. त्या अधिका-याची चूक आहे. परत असे झाले नाही पाहीजे. यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला पाहीजे.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, मी महापौर असताना स्वतः दादांसमवेत चर्चा केली आहे. त्यांना स्वतः सांगितले, सगळ्या महापालिकेचे रुल्स् फ्रेम करतोय. १८-२० लाखांपर्यंत अतिरिक्त आयुक्त, सह आयुक्त म्हणून अधिकार देऊ शकतो. ठराव करुन पाठवला आहे. कदम साहेबांना विचारू शकता. विषय प्रलंबित आहे. त्यावर अंमलबजावणी केली नाही. आज अतिरिक्त आयुक्त म्हणून देऊ शकत नाही. जॉईंट कमिश्नर म्हणून देतो. म्हणून नावानिशी ठराव केला आहे. तो मान्य केला. काय

घडामोडी झाल्या. कालपर्यंतचे नियम अचानक बदलले, कसे झाले? एखादा अतिरीक्त आयुक्त येत असेलतर वाढवायला हरकत नाही. मा.आर.एस.कुमार यांना सांगितले. माझे पूर्ण अनुमोदन आहे. त्याला संमती दिली पाहीजे. क्लॉज ४ची फाईल करताना आरोग्यची कामे कमिश्नर बघणार असतील तर तुमचा सुद्धा स्पीड राहणार नाही. डिसेंट्रलायझेशन ऑफ वर्क केले पाहीजे. २ अतिरीक्त आयुक्तांची पदे होणार असतील तर एक डेप्युटी कमिश्नर प्रमोशन होऊन जाणार म्हणून तसे ठेवले पाहीजे. शासनाचा एक अधिकारी व आमचा एक असे असले पाहीजे अशी सूचना मांडतो.

मा.उल्हास शेट्टी – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

मा.आयुक्त – मा.महापौर साहेब, सन्मा.सदस्य, पिंपरी चिंचवड महापालिकेत सुद्धा अतिरिक्त आयुक्ताचे एक पद मंजूर आहे. नांदेड महापालिकेची लोकसंख्या ५ १/२ लाख असताना तेथे एक पद मंजूर आहे. पुणे महापालिकेत ३२ लाख लोकसंख्येला ३ अतिरिक्त आयुक्ताची पदे मंजूर आहे. साडे पाच लाखासाठी एक पद अठरा लाख लोकसंख्येसाठी एकच पद. कामाचा लोड यंत्रणेवर आहे हे लक्षात घेता आणखी एक पद आवश्यक आहे. एक महिन्यापूर्वी राज्य शासनाला विनंती केली आहे. प्रशासनाला सूचना केली. महापालिका सभेत १के खाली विषय ठेवला. अधिका-यांच्या पॉवर्सची नोंद घेतली आहे. (३९ ए मधील तपशिलाचे वाचन केले.) या तरतूदीनुसार अपॉईंटमेंटचा अधिकार राज्य शासनाकडे ठेवला आहे की, अडीशनल कमिश्नर राज्य शासनाकडून अपॉईंट करण्यात यावा. महापालिकेने प्रस्ताव दिला होता. सावंत साहेबांचे यामुळे होऊ शकले नाही. महापालिकेच्या अधिका-यांना अधिकार दिले आहेत. अमेंडमेंटची ही प्रोव्हीजन १८ ऑगस्ट २०११ मध्ये केली होती. ती आत्ता आपल्याकडे आलेली आहे.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, माझी केलेली सूचना माघारी घेतो. तुम्ही पॉवर्स डेलिगेट करा. Decentralisation of power असे करा. फक्त २५२ कोटी खर्च करु शकलो आहोत. ९४४ कोटी खर्च करायचे ठेवले आहेत. हा विषय निश्चितच मंजूर करावा.

मा.महापौर – मा.योगेश बहल यांची सूचना माघारी घेणेस परवानगी आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.सुजाता पालांडे-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २३

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्रमांक ४७.

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड, मध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध, अपंग, व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडतो.

मा.गोरक्ष लोंखंडे – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - २६० विषय क्रमांक – २३

दिनांक – २२.०३.२०१३ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्रमांक ४७.

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

विषय क्रमांक २३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.महापौर – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/३७७/१३
दिनांक – ९/४/२०१३

प्र. नगरसचिव
पिंप्री चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

e drive\Nagersachiv1\GB-12-13 new\March-13 G.B.proceeding.doc